

१ ते १५ डिसेंबर २०२१ । किंमत २५ रु.

# परिवर्तनाचा वाटसरू





# मांसाची किंमत!

१९८३मध्ये चरण सिंह आणि अटलबिहारी वाजपेयी यांनी दिल्लीतील इंडिया गेटवर धरण्याचे नेतृत्व केले, ज्यामध्ये तूप भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या टॅलोच्या आयातीवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली. २०१४मध्ये मोदी सरकारने आता भारतात अतिरिक्त उत्पादन होत असलेल्या म्हैस टॅलोची निर्यात खुली केली. बीसीसीएल.

५



२०१९मध्ये, यूएईस्थित लुलू समूहाचे मालक एम. ए. युसुफ अली यांच्या उपस्थितीत मोदींना ऑर्डर ऑफ झाएद – यूएईचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळाला. लुलू समूहाच्या दोन कंपन्या फेअर एक्सपोर्ट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि अमरून फूड्स प्रायव्हेट लिमिटेड, म्हैस-मांस निर्यात करणाऱ्या सरकारी मान्यताप्राप्त दहा कंपन्यांमध्ये मोडतात.

हमाद अल-काबी / राष्ट्रपती कार्यालय / वाम / एपी फोटो मंत्रालय

# परिवर्तनाचा वाटसरू

वर्ष २१ / अंक १५
किं. २५ रु. / १ ते १५ डिसेंबर २०२१

ISSN: 2250-3145

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १,६०० रु., दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक २०० रु., सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : Pariwartanacha Vatsaru
बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014
Google Pay साठीचा मोबाईल नंबर : 8888708963
युपीआय पेमेंटसाठी बार कोड

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

**संस्थापक संपादक**
अभय कांता*

**संपादक**
प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**व्यवस्थापकीय संपादक**
प्रशांत पवार

**कार्यकारी संपादक**
देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**
प्रज्वला तट्टे, वीरा राठोड, कलीम अजीम,
मयुरी सामंत, अजित अभंग, राही श्रु. ग., वृषाली मगदूम

**सहव्यवस्थापक**
प्रकाश वाघमारे

**संपर्क पत्ता**
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट
दुकान नं. ७ ए, कसबा पेठ
फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
संपर्क : ९७६३२०६२१२
pwatsaru@yahoo.com
www.pvatsaru.com

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

## या

## अंकात

**समसामायिक**

**मांसाची किंमत!** ५



अथिरा कोनिक्कारा अनु. स्वातीजा मनोरमा

**साहित्यविषयक क्रांतिकारी भूमिकेची आवश्यकता** १८

रेणुकादास उबाळे

## विशेष लेख


**अक्षयुगातील मनुष्ये – संस्कृत आर्य** २७

कॅरेन आर्मस्ट्रॉँग अनु. शरद नावरे

**भारतातील लघुउद्योगांचा धोरणात्मक आढावा** ५१

निलिमा गावडे

**भीमबेटका व सिंधू संस्कृती :**

**दृश्य कलाकृतींमधील लिंगस्थाननिश्चिती** ८०

स्वाती राजन


## कविता


**बबरूच्या कविता** ९०


## सिनेमा


**जय भीम : क्रूर व्यवस्थेविरुद्ध कायद्याचे शस्त्र** १०८

प्रमोद अहिरे




समसामायिक

# मांसाची किंमत!

अथिरा कोनिक्कारा
अनु.
स्वातीजा मनोरमा

२ एप्रिल २०१४ रोजी, त्यावेळचे गुजरातचे मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या नेवाडा जिल्ह्यात एका निवडणूक रॅलीला संबोधित केले. 'यदुवंशी कृष्णाची पूजा करणारे, गो-पालन आणि गो-सेवा करणारे आज कोणाची साथ देत आहेत?' असा सवाल मोदींनी केला. ते पुढे विचारते झाले, 'त्यांचा नेता कोणाच्या सोबतीने राजकारण खेळतोय? अशा लोकांसोबत जे भारतात जनावरांची कत्तल करतात आणि त्याचा अभिमान बाळगतात'. यदुवंशी हा यादव समुदायाबद्दलचा उल्लेख आहे. जातीनुसार यादवांचा व्यवसाय हा गोपालनाचा होता आणि बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल आणि उत्तर प्रदेशात समाजवादी पार्टी यांच्यासाठी यादवांची मते ही त्यांच्या राजकारणाचा महत्त्वपूर्ण आधार आहेत. मुस्लिम मतदारांचा अनुनय करण्याबद्दल समाजवादी पक्षावर

---

लेखिका 'द कॅराव्हान' मासिकाच्या रिपोर्टिंग फेलो आहेत. तर अनुवादिका नारी अत्याचार विरोधी मंचच्या ठाणेनिवासीकार्यकर्त्या आहेत.
ईमेल- swatija@gmail.com

मोदी ताशेरे ओढत होते. गोरक्षणाला निवडणूक मुद्दा म्हणून पुढे आणत मोदींनी पुढे म्हटले, 'बंधू आणि भगिनींनो, दिल्लीतील सरकारला ना हरित क्रांती हवी आहे ना पांढरी क्रांती, त्यांना हवी आहे गुलाबी क्रांती'. मोदींनी स्पष्ट हेही स्पष्ट केले की 'गुलाबी क्रांती'ने त्यांना जनावरांच्या कत्तलीनंतरच्या त्यांच्या मांसाचा रंग अभिप्रेत आहे. मागील वर्षात भारताने मटण निर्यात करताना सर्वाधिक नफा कमावला होता असे 'अभिमानाने सांगण्या'बद्दल त्यांनी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, जर माझ्या यदुवंशी बंधूंना गाय पाळायची असेल तर त्यांना अनुदान मिळत नाही. पण दिल्लीतील सरकार गायींची कत्तल करणाऱ्यांना अनुदान देते. देशाच्या विविध भागांमध्ये कत्तलखाने कुत्र्यांच्या छत्र्यांप्रमाणे फोफावत असल्याचा दावाही त्यांनी केला.

मोदी सत्तेवर आल्यानंतर, गोरक्षण आणि शाकाहार हे भाजपसाठी लाडके प्रश्न बनले आहेत. मोदी आणि त्यांच्या सहकारी भाजप नेत्यांच्या सांप्रदायिक भाषणांमुळे गोमांस खाण्याच्या आणि ते खाणाऱ्यांच्या म्हणजे प्रामुख्याने मुस्लिमांच्या आणि दलितांच्या विरोधात हिंसक मोहिमेला सुरुवात झाली. मानवी हक्कांचा पाठपुरावा करणाऱ्या 'ह्यूमन राइट्स वॉच'च्या मते, मे २०१५ ते डिसेंबर २०१८च्या दरम्यान, गोरक्षणाच्या नावाखाली १२ भारतीय राज्यांमध्ये कमीतकमी ४४ लोक (त्यातील ३६ मुस्लिम होते) मारले गेले. त्याच कालावधीत, २० राज्यांमध्ये स्वयंघोषित आक्रमक गोरक्षण पथकांनी चालवलेल्या मोहिमेत शंभराहून अधिक वेगवेगळ्या घटनांमध्ये

सुमारे तीनशे लोक जखमी झाले.

परिघावरचे हे हिंसक गट, जे बऱ्याचदा संघ परिवाराशी संलग्न असत, वारंवार असा हिंसाचार करत असतानाच, भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारे मात्र कोणत्याही प्रकारे मांस उत्पादनावर बंधन आणणारे आर्थिक धोरण राबवत नाहीत. उलटपक्षी गेल्या काही वर्षांमध्ये केवळ मांसाच्या निर्यातीमध्ये वाढ झाली इतकेच नाही, तर सरकारने २०१४ आणि २०१९च्या दरम्यान कत्तलखान्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी देण्यात येणारे अनुदानही वाढवले. मांस निर्यात करणाऱ्या प्रमुख कंपन्यांनी सरकारच्या लाडक्या विकास प्रकल्पांसाठी दिलेला निधी, तसेच भाजपच्या बड्या नेत्यांशी त्यांची असलेली जवळीक यांवरून त्यांचे व सरकारचे घनिष्ठ सहकार्य स्पष्टपणे दिसून येते. आणि तरीही, यापैकी कशानेही गोमांस खाण्याशी संबंधित द्वेषपूर्ण वक्तृत्व किंवा त्यामुळे रस्त्यावर होणारा हिंसाचार याला खीळ बसलेली दिसत नाही.

गोरक्षकांशी (जे प्रत्यक्षात स्वघोषित आक्रमक कायदा हातात घेणारे गट असतात) संबंधित हिंसा ही धार्मिक भावना दुखावल्यामुळे होणाऱ्या सार्वजनिक संतापाची अभिव्यक्ती असते या नावाखाली भाजप त्याच्याकडे दुर्लक्ष करते. परंतु भाजपच्या दुतोंडी धोरणाशी भावनांचा फारसा संबंध असल्याचे दिसत नाही -- एकीकडे ते गोरक्षकांचे समर्थन करताना दिसतात आणि गोहत्या बंद करण्याच्या नावाखाली मते मागतात; दुसरीकडे, ते त्यांच्या आर्थिक मूल्यासाठी मांस, टॅलो (मेणबत्ती इत्यादींसाठी वापरली जाणारी घट्ट चरबी), आणि इतर मांसाधारित उत्पादनांच्या

निर्यातीला प्रोत्साहन देतात. राज्याच्या धोरणाच्या आणि गोरक्षकांच्याही दृष्टिकोनातून, गोरक्षण ही फारशी भावनिक समस्या नसून ती मुख्यतः इस्लामविरोधी भय (इस्लामोफोबिया) पसरवण्याचे सोयीस्कर साधन म्हणून वापरले जाते असे दिसते.

मोदींनी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीतील प्रचारादरम्यान ज्या गुलाबी क्रांतीवर प्रखर टीका केली होती तिला त्यांच्या पंतप्रधानकीच्या काळात चांगला वेग येत गेला आहे. कृषी आणि प्रक्रिया केलेली अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने (एपीईडीए) जानेवारी २०२०मध्ये जारी केलेले भारतीय मांस उद्योग रेड मीट मॅन्युअलमध्ये म्हटले आहे की, म्हशीच्या मांस उत्पादनात भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. देशाने २०१८-१९ दरम्यान ३.६१ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या किमतीचे १२.४ लाख मेट्रिक टन म्हशीचे मांस आणि सबंधित उत्पादने निर्यात केली आहेत. एपीइडीएच्या वेबसाइटने म्हटले आहे की म्हशीचे मांस भारतामधील एकूण पशु उत्पादनांच्या निर्यातीत प्रभुत्वस्थानी आहे कारण ते या निर्यातीत ८९.०८% पेक्षा जास्त योगदान देते. भारताच्या म्हैस-मांसाच्या निर्यातीसाठी मलेशिया, इजिप्त, व्हिएतनाम आणि सौदी अरेबिया या मुख्य बाजारपेठा आहेत. गेल्या दशकात, म्हशीच्या मांसाच्या निर्यातीत भारत सातत्याने जगातील पहिल्या पाच निर्यातदारांमध्ये राहिला आहे आणि ही वस्तुस्थिती भाजप सत्तेत आल्यानंतरही बदललेली नाही.

एपीइडीए मॅन्युअलमध्ये म्हटले आहे की, भारताच्या सामाजिक-आर्थिक जीवनात प्राणी उत्पादने महत्त्वाची भूमिका बजावतात. मांस आणि प्राणी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यात काहीही

चुकीचे नसले तरी यातून भाजपचा ढोंगीपणा मात्र स्पष्ट दिसतो. भाजप आणि त्याची पितृसंस्था, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, दीर्घ काळापासून उच्चजातीय धार्मिक शाकाहाराला प्रोत्साहन देत असले तरी, त्याचा भाजपच्या राजवटीत मांस उत्पादन आणि वापरावर कोणताही परिणाम झालेला नाही. सध्या देशात ३,६०० कत्तलखाने आहेत. भारतातील सर्वात मोठे म्हैस-मांसाचे निर्यातदार आणि सर्वात जास्त कत्तलखाने उत्तर प्रदेशात आहेत, आणि डेटा-जर्नालिझम वेबसाइट इंडियास्पेंडने म्हटले आहे त्यानुसार २०१२ ते २०१८च्या दरम्यान झालेल्या गोवंश कत्तलीच्या गुन्ह्यांची सर्वात जास्त संख्याही नोंदवली गेली आहे ती उत्तर प्रदेशातच. भारतातील २४ मांस प्रक्रिया कारखान्यांपैकी १३ हे प्रामुख्याने मांस आणि संबंधित उत्पादने निर्यात करण्यात गुंतलेले आहेत. एपीइडीएच्या वेबसाइटनुसार, गेल्या एका वर्षात, म्हशीच्या मांसाच्या प्रक्रियेच्या तीन नवीन निर्यात-केंद्रित युनिट्सना मंजुरी देण्यात आली आहे आणि ती अंमलात आणली जात आहे.

मांस निर्यात ही मोदी सरकारसाठी महत्त्वपूर्ण गुंतवणूक आहे हे स्पष्ट दिसते. अन्न-प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने माहितीच्या अधिकारांतर्गत दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, कत्तलखाने उभारण्यासाठी आणि त्यांच्या आधुनिकीकरणासाठी सरकारने २०१४ ते २०१९च्या दरम्यान १२०.९३ कोटी रुपयांची सबसिडी जारी केली जी सुमारे सोळा दशलक्ष डॉलर्स इतकी होते. दुसऱ्या यूपीए सरकारने दिलेल्या ९१.२३ कोटी रुपयांच्या सबसिडीमध्ये ही लक्षणीय वाढ केली आहे.

लोकानुनयी गोसंरक्षणवादी भाषणे देणाऱ्या सरकारच्याच राजवटीअंतर्गत होणाऱ्या मांसाच्या निर्यातीतील भरभराटीकडे कोणाचे लक्ष गेले नाही असे नाही. साल २०१८मध्ये कर्नाटकातील तत्कालीन काँग्रेस आघाडी सरकारमधील मंत्री रामलिंग रेड्डी म्हणाले होते की, कर्नाटकात सत्तेवर आल्यास भाजप गोहत्येवर बंदी घालेल असे त्यांचे म्हणणे आहे, पण त्याचवेळी आपला देश इतर देशांना गोमांस निर्यात करतो. भारतीय कायदा गायीच्या मांसाच्या निर्यातीस परवानगी देत नाही. तथापि, म्हशीचे मांस आणि त्याची उत्पादने निर्यातीसाठी मंजूर केली जातात आणि परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाच्या अधिकृत परवानगीने आयात केली जाऊ शकतात. यावर्षी फेब्रुवारीमध्ये, बी. एस. येडियुरप्पा यांच्या भाजप राज्य सरकारने कर्नाटक गुरांची कत्तल प्रतिबंधक वध आणि गुरांचे संरक्षण कायदा केला, ज्यानुसार १३ वर्षापेक्षा कमी वयाच्या म्हशींचा समावेश असलेल्या सर्व गुरांच्या कत्तलीवर कडक बंदी घातली. कर्नाटकातील बंदीचा परिणाम झाला शेजारच्या राज्यातील गोवा येथील गोमांस पुरवठ्यावर. गोव्यात भाजपचे सरकार आहे व तेथे गोमांस मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. या किनारपट्टी राज्याला आता मांस इतर राज्यांतून घ्यावे लागते. कर्नाटक विधानसभेने विधेयक मंजूर केल्यानंतर गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत म्हणाले, मीही गोमातेची पूजा करतो. पण आमच्या राज्यात ३० टक्के लोकसंख्या ही अल्पसंख्यकांची आहे. त्यांची काळजी घेणे हेही माझे कर्तव्य आहे. हे स्पष्ट आहे की, मोठ्या प्रमाणात मांसाहारी लोकसंख्या असलेल्या राज्यांमध्ये राष्ट्रीय

नेतृत्वाच्या राजकीय पवित्र्यांचा व धोरणांचा फारसा प्रभाव पडू शकत नाही, कारण या राज्यांच्या स्वतःच्या अशा राजकीय गरजा असतात.

म्हशींच्या टॅलोच्या निर्यातीला कायदेशीर परवानगी देण्याचीही कामगिरी मोदी सरकारच्या नावे आहे, ज्यामुळे आता तेजीत असलेल्या या व्यवसायाची वाट मोकळी झाली. प्राण्यांच्या टॅलोच्या प्रश्नाने वर्तमानपत्रांतले मथळे प्रथम गाजवले ते १९८३ मध्ये. तेव्हा वनस्पती तुपाच्या काही नमुन्यांमध्ये आयात केलेल्या स्वस्त गोमांस टॅलोची भेसळ आढळण्याने वाद निर्माण झाला होता. पुढच्या वर्षी निवडणुका होणार असल्यामुळे विरोधी पक्षांतील भाजप आणि जनता पक्षाच्या काही गटांनी खाद्य-तेल उद्योगाचे नियमन करण्यामधील काँग्रेसचा हलगर्जीपणा काँग्रेसविरोधी मोहिमेचा मुद्दा बनवण्याचा निर्णय घेतला. संपूर्ण हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा संसदेत वारंवार चर्चेचा विषय बनला आणि अटलबिहारी वाजपेयी यांनी त्याबद्दल दिल्लीतील इंडिया गेटवर धरणेही दिले.

इंदिरा गांधी सरकार त्वरित कृतीत उतरले. त्याने विविध वनस्पती-उत्पादन युनिटवर पन्नास छापे टाकले आणि काही नमुन्यांमध्ये प्राण्यांच्या मांसापासून बनलेला टॅलो असल्याचे आढळले. केंद्रीय अन्वेषण ब्युरोने वनस्पती भेसळीच्या ११ प्रकरणांची चौकशी केली आणि त्यातील आठ प्रकरणांमध्ये प्रथम माहिती अहवाल नोंदवला. एजन्सीने राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत दोन जणांना अटक केली. त्यापैकी एक होते जैन शुद्ध वनस्पतीचे व्यवस्थापकीय संचालक विनोद कुमार जैन,

ज्यांनी बेकायदेशीरपणे गोमांस आयात केल्याच्या आरोपाखाली तिहार तुरुंगात २ दिवस काढले. या प्रकरणाचा अखेर २०१४मध्ये निकाल लागला, जेव्हा सीबीआय न्यायालयाने भटिंडा केमिकल्सचे अध्यक्ष राजिंदर मित्तल आणि इतर तीन जणांना चार वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. त्यांना फसवणूक, षडयंत्र आणि पुरावे नष्ट केल्याच्या आरोपाखाली दोषी ठरवण्यात आले. जाता जाता सांगायचे तर, पंजाबमधील भाजप नेते दिवंगत हित अभिलाषी यांनी भटिंडा केमिकल्स कारखान्याची पायाभरणी केली होती.

इंदिरा गांधी सरकारमधील वाणिज्य मंत्री, भावी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह यांनी १ ऑक्टोबर १९८३ रोजी सर्व प्राण्यांच्या टॅलोच्या आयातीवर निर्बंध घालण्याची घोषणा केली. १५ नोव्हेंबर रोजी त्यांनी संसदेत सांगितले की, हा निर्णय लोकांच्या भावनांची कदर ठेवून घेण्यात आला आहे.

तथापि, तेव्हापासून जरी काही राज्यांनी अशी बंदी घातली असली तरी काँग्रेस आणि भाजप या दोघांच्या नेतृत्वाखालील विविध सरकारांच्या अंतर्गत गोवंश हत्याबंदीवर देशव्यापी बंदी नव्हती. २०१७मध्ये, पर्यावरण मंत्रालयाने म्हशीसह सर्व गोवंशीय प्राण्यांच्या कत्तलीवर बंदी घालणारी अधिसूचना जारी केली, परंतु अनेक राज्यांनी विरोध केल्यावर ती लवकरच मागे घेण्यात आली. गेल्या तीन दशकांमध्ये, भारत मांस आणि मांस उत्पादनांच्या सर्वात मोठ्या जागतिक उत्पादकांपैकी एक बनला आहे. याचा अर्थ असा होतो की, मांस प्रक्रियेचे एक उप-उत्पादन म्हणून निर्माण होणाऱ्या टॅलोचे अतिरिक्त उत्पादन होऊ लागले आणि

टॅलोची आयात करण्याची आवश्यकता राहिली नाही. ३१ डिसेंबर २०१४ रोजी मोदी सरकारने अधिसूचना जारी करून म्हशीच्या मांसाची निर्यात सरकारकडून मान्यताप्राप्त असलेल्या मांस निर्यातकर्त्यांसाठी खुली केली. १९८३नंतरचा टॅलोच्या संबंधातील आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचा हा पहिला सरकारी निर्णय होता. १९८३मध्ये भाजपच्या नेत्यांनीच टॅलोबद्दल घृणा व्यक्त केली होती व आपला जाहीर विरोध प्रदर्शित केला होता, परंतु २०१४मध्ये याच पदार्थातून नफा मिळवताना त्यांनी कुठलाही विधीनिषेध प्रकट केला नाही.

एपीइडीए मॅन्युअल टॅलोचे ऊर्जेचा समृद्ध स्त्रोत म्हणून वर्णन करते जे कोंबड्यांच्या वाढीसाठी आवश्यक फॅटी ॲसिड प्रदान करणारा खुराक आहे. तथापि, टॅलोचा वापर मुख्यतः अखाद्य उत्पादनांमध्ये केला जातो. वाणिज्य मंत्रालयाने संकलित केलेल्या माहितीनुसार, भारताने २०१९मध्ये १०२ कोटी रुपयांहून अधिक किंमतीचे इतर टॅलो निर्यात केले व एप्रिल ते डिसेंबर २०२०च्या दरम्यान ते नऊ महिन्यात ११७ कोटी इतके वाढले. जरी या आकडेवारीमध्ये म्हशीच्या टॅलोचा वेगळा उल्लेख नसला तरी भारतीय उत्पादनांचे वर्गीकरण करण्यासाठी वापरले जाते त्या व्यापार वर्गीकरण (हार्मोनाइज्ड सिस्टम) कोडशी तुलना करता असे दिसते की, डिसेंबर २०१४च्या अधिसूचनेमध्ये जे कोड वापरले आहे ते स्पष्टपणे म्हशीच्या टॅलोसाठी वापरल्या जाणाऱ्या कोडशी जुळते.

मार्चमध्ये, मी गुडगाव गोरक्षा दलाच्या धर्मेंद्र यादव यांच्याशी बोलले. या आत्मघोषित आक्रमक गोरक्षक दलाने २०१६मध्ये

दोन मुस्लिम पुरुषांना गोमांसाची तस्करी केल्याच्या आरोपावरून गोमूत्र आणि शेण खाण्यास भाग पाडले होते. मी यादव यांना विचारले की, त्यांना मोदी सरकारच्या म्हैस निर्यात करण्याबाबतच्या निर्णयाची जाणीव आहे की नाही. त्यावर यादव म्हणाले की, त्यांना या निर्णयाची जाणीव नव्हती. ते पुढे असेही म्हणाले की, गाय असो किंवा म्हैस त्यांच्या मांसापासून बनणाऱ्या टॅलोची निर्यात करण्याची परवानगी देणाऱ्या सरकारी धोरणाशी ते असहमत असतील. जर सरकारने ते सुरू केले असेल तर ते पूर्णपणे चुकीचे आहे, यादव म्हणाले. पुढे स्पष्टीकरण देताना ते म्हणाले की : असे होऊ शकते की ते फक्त म्हशीच्या टॅलोची निर्यात करत आहेत व असे केल्याने कमी गाईंची कत्तल होईल.

एपीइडीएच्या संकेतस्थळावरील सूचीमधील म्हशीचे मांस निर्यात करणाऱ्यांच्या यादीत मोदी सरकार आणि भाजपशी घनिष्ठ संबंध ठेवणाऱ्या कंपन्यांची नावे आहेत. सध्या देशातील सर्वात मोठी म्हैस-मांसाची निर्यात करणारी अल्लानासन्स प्रायव्हेट लिमिटेड यापूर्वी उत्तर प्रदेशातील मोदींच्या दत्तक घेतलेल्या जयापूरमधील पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसाठी चर्चेत होती. द कॅरव्हानने जानेवारी २०१७मध्ये दिलेल्या वृत्तानुसार अल्लानासन्सने मुसहर दलित समुदायासाठी १४ फ्लॅटची गृहनिर्माण वसाहत बांधली आहे, ज्याचे नाव ‘मोदीजी का अटल नगर’ असे ठेवले गेले आहे.

म्हशीच्या मांसाची निर्यात करणाऱ्यां सरकारी मान्यताप्राप्त कंपन्यांपैकी फेअर एक्सपोर्ट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि अमरून फूड्स प्रायव्हेट लिमिटेड या दोन्ही कंपन्या लुलू ग्रुप इंटरनॅशनलचा भाग आहेत. हा ग्रुप संयुक्त अरब अमिरातीमध्ये

केरळमधील व्यापारी एम. ए. युसूफ अली यांनी स्थापन केलेला बहुराष्ट्रीय कंपनीसमूह आहे. २०१९मध्ये, मोदींना अलीच्या उपस्थितीत यूएईचा सर्वोच्च नागरी सन्मान – ऑर्डर ऑफ झायद – मिळाला. डिसेंबर २०२०मध्ये, लुलू ग्रुपने जम्मू–काश्मीरमध्ये ६० कोटींची सुरुवातीची गुंतवणूक असलेला अन्न प्रक्रिया प्रकल्प उभारणार असल्याची घोषणा केली. भाजप शासित उत्तर प्रदेशात उत्तर भारतातील सर्वात मोठ्या मॉलपैकी एक बनवण्याची कंपनीची योजना आहे. द कॅरव्हानने २०१९मध्ये दिलेल्या वृत्तानुसार, लुलू समूहाचे प्रादेशिक संचालक, मोहम्मद अल्ताफ मुस्लियम वीटिल, हे केमॅन बेटावरच्या जीएनवाय एशिया, या हेज फंडचे एक संचालक आहेत. हा फंड राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांचे पुत्र विवेक डोभाल चालवतात. सरकार आणि लुलू गट यांच्यातील सहकार्य व्यावसायिकदृष्ट्या शहाणपणाचे आहे; आंतरराष्ट्रीय मांस बाजारपेठेतील पश्चिम आशिया ही महत्त्वाची बाजारपेठ आहे. भारतातील म्हशीचे मांस आयात करणाऱ्या पहिल्या दहा देशांमध्ये संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि सौदी अरेबिया हे दोन देश मोडतात.

डिसेंबर २०१४मध्ये भारत सरकारने म्हशीच्या टॅलो निर्यातीवरील बंदी उठवली आणि त्याचवेळी भारतातून येणाऱ्या म्हशींच्या मांसाच्या आयातीवर असलेली रशियातील प्रदीर्घ बंदी उठवली गेली. या दोन्ही घटना जुळून आल्या होत्या. म्हशीच्या मांसाची पहिली खेप २०१५मध्ये रशियाला नेणाऱ्या चार अधिकृत कंपन्यांमध्ये फेअर एक्स्पोर्ट्स इंडिया आणि फ्रिजेरियो कॉन्झर्व्ह अल्लाना प्रायव्हेट लिमिटेड, अल्लानासन्सचे एक युनिट

समाविष्ट आहेत.

शासकीय मंजुरी असलेले बहुतेक म्हशीचे मांस निर्यात करणारे उद्योग म्हशीच्या टॅलोच्या विक्रीमध्येदेखील गुंतलेले आहेत. २०१६पासून उपलब्ध आकडेवारीनुसार, फ्रिजेरिओ कॉन्झर्व्हा अल्लानाने नेपाळ, पाकिस्तान आणि युनायटेड स्टेट्समध्ये म्हशीची टॅलो निर्यात केली. मॅश ग्रो फूड्स, एचएमए ग्रो इंडस्ट्रीज आणि रुस्तम फूड्स यासारख्या इतर म्हशीचे मांस निर्यात करणाऱ्या कंपन्यांच्या निर्यातीच्या आकडेवारीनुसार, नेपाळ हा भारतातून म्हशीचा टॅलो आयात करणारा अव्वल देश असल्याचे दिसून येते. बिहारमधील सीमेवरच्या रक्सौल शहरातून मोठ्या प्रमाणावर त्याची वाहतूक केली जाते. जेव्हा मी कंपनीच्या टॅलो-निर्यात आकडेवारीची चौकशी करण्यासाठी मॅश ग्रो फूड्सच्या प्रतिनिधीशी संपर्क साधला, तेव्हा त्यांनी सांगितले की ते केवळ देशांतर्गत टॅलोचा पुरवठा करतात आणि ते निर्यातीत गुंतलेले नाहीत. अधिक माहितीसाठी त्यांनी मला कंपनीचे अध्यक्ष अदनान अस्लम यांच्याशी बोलण्याचे निर्देश दिले. हे वृत्त दाखल करेपर्यंत अस्लम यांनी संपर्क साधण्याच्या माझ्या प्रयत्नांना प्रतिसाद दिला नव्हता. रुस्तम फूड्स, अल्लानासन्स, फेअर एक्सपोर्ट्स आणि इतर अनेक मांस-निर्यात कंपन्यांना फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता मला कुठूनही उत्तर मिळाले नाही.

१९८३मध्ये टॅलोच्या आयातीच्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांत अग्रभागी असलेले सुब्रमण्यम स्वामी जे आता भाजपचे खासदार आहेत, त्यांनी २०१५मध्ये, मोदींना पत्र लिहून मागणी केली की, सरकारने मांस क्षेत्राला दिली जाणारी १३

प्रकारची अनुदाने काढून घ्यावीत जे गायीच्या मांसाच्या निर्यातीवर बंदी आणण्याच्या अंतिम दिशेने टाकलेले पहिले पाऊल असेल. जुलै २०१६मध्ये तत्कालीन वाणिज्य आणि उद्योग मंत्री आणि आता अर्थमंत्री, निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत सांगितले की, गोमांस निर्यातीसाठी कोणतेही अनुदान दिले जात नाही कारण ती गोमांस निषिद्ध आहे आणि त्याची निर्यात करण्यास परवानगी नाही.

सीतारामन यांनी २०१४मध्ये, जेव्हा त्या वाणिज्य मंत्री होत्या, तेव्हा म्हैस टॅलोची निर्यात सुरू करण्याच्या त्या त्यांच्या निर्णयावर टिप्पणी करण्याची विनंती करणाऱ्या ईमेलला त्यांनी उत्तर दिले नाही. जे. पी. नड्डा, भाजप अध्यक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयाला पाठवलेल्या ईमेलनाही कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गप्प राहिला आहे आणि सरकार एकीकडे हिंदुत्वाचे पाठीराखे असणारे त्यांचे मतदारसमूह आणि दुसरीकडे मोदींशी निष्ठावान राहिलेल्या दीर्घकाळ चालणाऱ्या कंपन्यांमुळे मिळणारा आर्थिक लाभ या कात्रीत सरकार अडकलेले दिसत आहे.

**संपादन सहाय्य** : सुहास परांजपे

**साभारः** हा लेख कॅराव्हान मासिकाच्या ३० एप्रिल २०२१च्या अंकात प्रसिद्ध झालेला आहे. (गो-तस्करीवरील मालिकेतील शेवटचा तिसरा लेख)

समसामायिक

# साहित्यविषयक क्रांतिकारी भूमिकेची आवश्यकता

रेणुकादास उबाळे

*प्रसाद वोंगळ चिवडिती।।*
*दंभाचे आवडी बहिराट अंधळे।*
*सेवटासिं काळे होईल तोंड।।*
*सोन्यासेजारीं तो लाखेची जतन।*
*संतत ते गुण जैसे तैसे।।*
*सेव्यसेवकता न पडतां ठावी।*
*तुका म्हणे गोवी पावती हीं।।*

– **संत तुकाराम** (अभंग क्र. १३९७)

**सालाबादप्रमाणे** ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची चर्चा प्रसारमाध्यमांमधून जोरकसपणे झडू लागली आहे. नुकताच ब्राह्मण महासंघाने या साहित्य संमेलनात गीतकार जावेद अख्तर व गुलजार यांना निमंत्रण देण्यास कडाडून विरोध

लेखक तुमसर, जि. भंडारा येथे एस. एन. मोर कला-वाणिज्य महाविद्यालयात मराठीचे सहाय्यक प्राध्यापक आहेत.
ईमेल- renukadas1983@gmail.com

दर्शविला आहे. याचे कारण सदरील व्यक्तींना हिंदू धर्माविषयी आदर नसल्याचे सांगण्यात येत आहे. मुळात साहित्य संमेलनाचा संबंध विशिष्ट धर्माचा आदर असण्याशी तसेच ब्राह्मण महासंघाने याबाबत निर्णायक भूमिका घेण्याशी कसा असू शकतो? असा भाबडा प्रश्न अनेकांना पडणे शक्य आहे. परंतु महाराष्ट्रातील साहित्यिक-सांस्कृतिक पर्यावरणाचा आजवरचा इतिहास व संबंधित साहित्यिक-सांस्कृतिक संस्था, घटक संस्था व संघटनांचे ब्राह्मणी चारित्र्य ज्यांना ठाऊक आहे त्यांना यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

मुळात स्वतःला 'अखिल भारतीय' व 'मराठीजनांचे प्रतिनिधी' म्हणवणाऱ्या मराठी साहित्य संस्थांच्या रचनेचा व अंतर्गत व्यवहाराचा गाभा आजतागायत ब्राह्मणी वर्चस्वाला पूरक राहिला आहे. या संस्थांची अंतर्गत रचना जरी उच्चजातकेंद्री व ब्राह्मणी संस्कारयुक्त असली तरी किमान बाह्य स्वरूप तरी सर्वसमावेशक असावे, हा मापदंड सुद्धा वरचेवर क्षीण होताना दिसत आहे. काही महिन्यांपूर्वीच मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक यशवंत मनोहर यांनी विदर्भ साहित्य संघाचा 'जीवनव्रती' पुरस्कार सकारण नाकारला. 'साहित्यिक कार्यक्रम हे सार्वजनिक असतात. त्यामुळे तेथे कुठल्याही एका धर्माचे प्रतीक मिरवणे गैर आहे. हे प्रतीक काढले जात नसेल तर मी पुरस्कार स्वीकारणार नाही. तो न स्वीकारणेच माझ्या आजवरच्या इहवादी, विज्ञाननिष्ठ भूमिकेशी सुसंगत ठरेल.' अशी विवेकशील भूमिका त्यांनी घेतली.

साहित्य व्यवहाराच्या निधर्मीकरणाची प्रक्रिया, साहित्यिकांच्या मूल्यनिष्ठेची चर्चा व समकालीन साहित्य-व्यवहाराची तटस्थ

चिकित्सा अशा व्यापक चर्चाविश्वाची सुरुवात खरं तर या घटनेतून होऊ शकली असती. परंतु मराठी साहित्यविश्वात ते घडू शकले नाही. विशेष म्हणजे मनोहरांनी सुरुवातीलाच या पुरस्कारासाठी संमती दर्शविणे कसे चूक होते, याची चर्चाही काही अंशी झाली. परंतु मनोहरांनी पुरस्कारास सुरुवातीलाच नकार देणे श्रेयस्कर होते हे जसे खरे तसेच ऐनवेळी नकार दिल्याने सरस्वती प्रतिमेचा मुद्दा ठळकपणे चर्चेत आला नसता हेही खरेच. त्यामुळे ऐनवेळी नकार देणे हा या घटनेतील चर्चकांसाठी नैमित्तिक परंतु अपघाती फायदा ठरला. कार्यक्रमात सरस्वतीची प्रतिमा ठेवावी की ठेवू नये याबाबतच्या वाटाघाटीसदृश्य चर्चेचा मनोहरांनी जो उल्लेख केला व त्या अटीवरच पुरस्कार स्वीकारण्याचा विचार केला यावर विश्वास ठेवला तर समजा, प्रतिमा ठेवली गेली नसती तर बाकी सारे आलबेल होते का? हा मनोहरांसह सर्वांनाच अंतर्मुख करणारा खरा प्रश्न आहे. खरं तर अशा मुद्यांची चर्चा ही घटनाकेंद्री न होता ती साहित्यिक पर्यावरणाच्या सहजभावाच्या (Common Sense) दृष्टिकोनातून होणे आवश्यक असते. वास्तविक पाहता, साहित्य-व्यवहारात प्रतीकांच्या सांस्कृतिक राजकारणाला जेवढे महत्त्व असते, तेवढेच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक महत्त्व साहित्याच्या आशयाची केंद्रे, साहित्य व्यवहारातील लोकशाही मूल्ये, जात-धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन, मानवमुक्तीच्या चर्चाविश्वाचा व्यापक परीघ आणि लेखकांची क्रांतिप्रवण तत्त्वज्ञानाशी असलेली कृतिशील बांधिलकी अशा असंख्य मुद्द्यांना असते, हे विसरणे आपल्याला परवडणारे नाही. व्यवस्था कायमच

बहुसंख्याकवादाच्या वेगवान घोड्यावर स्वार होऊन प्रस्थापित धर्माची प्रतीके ही धार्मिक प्रतीके नसून तीच खरी 'संस्कृती' असल्याचे निलाजरेपणाने भासवत राहते. कालांतराने हाच समाजाचा 'सहजभाव' होऊन निरपेक्ष व तटस्थ विचार करणाऱ्यांची मनसोक्त खिल्ली उडवली जात, बहुसंख्याकांना खूश करण्याचे सांस्कृतिक कट-कारस्थान फलद्रूप होत जाते. येथे भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. म्हणून सार्वजनिक ठिकाण हे सर्व जात-धर्मियांनी व भिन्न विचारप्रणालींच्या लोकांनी मुक्तिदायी चर्चेचा अवकाश शोधण्याचे हक्काचे ठिकाण असते, हे विसरले जाते. तसेच समाजातील विवेकशील लोकांनी सार्वजनिक संस्था, शिक्षण संस्था, सभा, संमेलने अशा सर्व ठिकाणी धर्मनिरपेक्ष संस्कृती रुजविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करायचा असतो, याचाही सोयीनुसार विसर पडलेला दिसतो. येथे 'बात का मतलब कोई नहीं समझता लेकिन मतलब की बात सब समझ लेते है' अशी स्थिती असते. उलट, सरस्वतीची प्रतिमा कार्यक्रमात ठेवणे हा आमचा 'कुलाचार' आहे, असे 'सार्वजनिक' असलेल्या साहित्य संस्थांकडून उर्मटपणे व जाहीरपणे सांगितले जाते. मुळात या संस्थांना विशिष्ट धर्माधिष्ठित 'कुलाचार' पाळण्याचे स्वातंत्र्य कुणी आणि केंव्हा दिले? हा महत्त्वाचा प्रश्न अनुत्तरित राहतो.

सांस्कृतिक मक्तेदारीच्या पायावर उभा असलेला ब्राह्मणी वर्चस्ववादी साहित्य-व्यवहार आपल्यापेक्षा स्वतंत्र आणि मुक्त विचार करणाऱ्या प्रत्येकाचे 'समायोजन' करण्यास आसुसलेला असतो. त्यांच्या मोहक आमंत्रणाला अनेक विचारशील, दिग्गज मंडळीसुद्धा सामोरे जात 'समरसतेचे वारकरी' बनतात. समरसता

मंचावर जाणाऱ्या पुरोगामी लेखकांना अधिकारवाणीने खडसावण्याचे नैतिक सामर्थ्य असणारे मनोहर हे न कळण्याइतके भाबडे नाहीत. यशवंत मनोहर हे आपल्या तटस्थ तत्वनिष्ठेसाठी व मूल्यनिष्ठेसाठी ओळखले जाणारे नाव आहे. त्यामुळे क्रांतिप्रवण साहित्यिक भूमिकेला त्यांच्याकडून मोठी अपेक्षा आहे. परंतु अनेक साहित्यिकांना पुरस्कारांचा मोह आवरत नाही. प्रस्थापित वाङ्मयीन संस्थांचे दातृत्व स्वीकारण्याचे आकर्षण जसे व्यक्तिगत महत्त्वकांक्षेतून निर्माण होते, तसेच ते 'कुणी गोविंद घ्या. कुणी गोपाळ घ्या.' (कुणी माडखोलकर घ्या. कुणी म्हैसाळकर घ्या.) टाईपातल्या मैत्रीच्या चोरपावलांनी सुद्धा येऊ शकते.

'सरस्वती प्रतिमा' प्रकरणानंतर झालेली चर्चा प्रस्थापित साहित्य संस्थांना अंतर्मुख करणारी नसली तरी परिस्थितीत व्यवस्थात्मक चैतन्य निर्माण करण्यासाठी पोषक व मर्यादित अर्थाने प्रतिक्रांती करण्यासाठी उद्युक्त करणारी घटना मात्र ठरली. शरणकुमार लिंबाळे या दलित लेखकाला 'सरस्वती सन्मान' देण्याची व त्यांनी तो आनंदाने स्वीकारण्याची घटना निव्वळ योगायोग म्हणून सोडून देता येत नाही. लिंबाळे केवळ पुरस्कार स्वीकारून थांबले नाहीत तर आपल्या मध्यममार्गी तडजोडीच्या भूमिकेची सविस्तर मांडणीही त्यांनी केली. हे करत असताना तटस्थ भूमिकांना 'उथळ' व 'जहाल' ठरवून इतरांना 'दलितांनी सरस्वती सन्मान का स्वीकारावा?' (पहा. दै. लोकसत्ता, ४ एप्रिल २०२१) अशी बतावणी केली. 'आमच्या नातेवाईकांमध्ये दोन महिलांची नावे 'सरस्वती' आहेत. त्यांना कुटुंबातून काढून टाकायचे का?' असे बालिश प्रश्न करत सवंग चर्चेला 'उथळ'

बनविले. शिवाय 'समाजापासून वेगळे राहून दुर्लक्षिले जाऊ!' अशी भीतीसुद्धा दाखवली. समाजापासून तुटणे म्हणजे नेमके कोणापासून तुटणे आहे? हे मात्र त्यांनी स्पष्ट केले नसले तरी त्यांचा मथितार्थ सुज्ञांना कळाला. कुठल्याही समाजात कार्यरत असणारी प्रस्थापित विचारप्रणाली ही विविध अंगांनी कार्यरत असते. समाजातील बदलत्या धारणांना नियंत्रित करण्याचे कार्य सुद्धा ती करीत असते. विचारप्रणाली केवळ मूल्य-संकल्पनांचा संच म्हणून राहत नाही; तर ती सर्व सामाजिक संबंधांमध्ये पाझरते. आर्थिक, सामाजिक, राजकीय व इतर व्यवहार व संस्था यांना ती आकार देते. मालक व मजूर, शासनसंस्था व नागरिक, पालक व पाल्य, शिक्षक व विद्यार्थी इत्यादींचे परस्परसंबंध विचारप्रणाली ठरविते.[१] राजेंद्र व्होरा यांच्या या विधानाप्रमाणे साहित्यिकांची व रसिकांची मते सुद्धा व्यवस्था समर्थक साहित्यिकांमार्फत घडविली जातात.

'लुईस अल्थ्यूसर' (१९१८-१९९०) या विचारवंताने प्रभुत्व निर्माण करण्यासाठी व ते टिकवून ठेवण्यासाठी भांडवली समाजात Repressive State Apparatus (दमनकारी राज्य उपकरण) आणि Ideological State Apparatus (विचारधारात्मक राज्य उपकरण)[२] अशा दोन रचना कार्यरत असल्याचे सांगितले आहे. यातील विचारधारात्मक राज्य उपकरणांमध्ये धर्म, शिक्षण, कुटुंबव्यवस्था, कायदे, संस्कृती यांचा समावेश केला आहे. साहित्य-व्यवहार हा संस्कृतीचा मुख्य आधार असतो. जात-धर्मीय वर्चस्वशाली समूहाच्या आहारी गेलेला मराठी साहित्य-व्यवहार आजच्या परिस्थितीतदेखील व्यवस्थापूरक समाजमानस घडविण्यात कळीची

भूमिका निभावत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे त्याचे दृश्यरूप असले तरी हिंदुत्ववादी, ब्राह्मणी, संघीय विचारप्रणालीचे साहित्यिक घटक-संस्थांवरील नियंत्रण व अंतर्गतरित्या सांस्कृतिक क्षेत्रांवर कार्यरत असणारा दबाव हे त्याचे खरे स्वरूप आहे. सरस्वती प्रतिमा प्रकरण असो, सरस्वती सन्मान प्रकरण असो, नयनतारा सहगल प्रकरण असो की 'संतसूर्य तुकाराम' प्रकरण असो, या सर्वच घटनांमध्ये साहित्यिक व्यवहारातील हा अदृश्य दबाव सक्रिय असतो, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

जोतीराव फुल्यांनी १८८५ सालीच अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोंवळा बनून आपल्या शूद्रादी अतिशूद्रास नीच मानणाऱ्या घालमोड्या दादांसोबतची युती अमान्य केली होती. सारांश, त्यांच्यात मिसळल्याने आम्ही शूद्रादी अतिशूद्रांचा काही एक फायदा होणे नाही, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे[३] असे निक्षून सांगत 'साधे होके बुद्धेका येह पहला सलाम लेव.' असा उमदा शेरासुद्धा दिला होता. फुल्यांच्या नकारामागील भूमिका ही प्रामुख्याने साहित्य क्षेत्रातील प्रतिनिधित्व, जातीप्रश्न, साहित्यातील आशय, परस्पर व्यवहार व लेखकांच्या वैचारिकतेविषयी होता. साहित्यिक पर्यावरणाची स्थिती आंशिक लवचिकता व चातुर्यपूर्ण लबाडीसह आजही तशीच कायम आहे. फुल्यांच्या पहिल्या सलामानंतर दुसरा तिसरा सलाम सुद्धा चर्चेतून शक्य झाला असता अथवा जोतीरावांची ती तयारी होती, असे दिसते. परंतु प्रस्थापितांनी ती चर्चा केली नसावी. इतक्या वर्षानंतर आजसुद्धा आपले मूळ

स्वरूप न बदललेल्या प्रस्थापित साहित्य संस्थांशी ही रचनात्मक चर्चा अशक्यप्राय वाटते. अशा अवस्थेत प्रस्थापित वर्चस्ववादी साहित्य-व्यवहाराच्या विरोधात जोतीराव फुल्यांच्या 'मराठी ग्रंथकार सभेस पत्र' या पत्रापासून ते दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त महासभा, दलित साहित्य संमेलन ते विद्रोही साहित्य संमेलन अशा अनेक स्वरूपात ठामपणे सांस्कृतिक प्रतिरोधाची भूमिका घेण्यात आली आहे. आजही ती घेतली जात आहेच. अनेकदा विचारशील भूमिका घेणाऱ्या साहित्यिकांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविण्यात धन्यता मानली. काहींनी एखाद्या मंडळात आपले बस्तान मांडले. काही मिरासदार पाटलांनी विशिष्ट परिसरात आपली मक्तेदारी पक्की केली. काही वेळा प्रगतिशील म्हणवणाऱ्या संघटनांमध्येही 'मी डावा नाही आणि उजवाही नाही' असे मध्यममार्गी पालुपद अळवणाऱ्या पंतोजींनी घुसखोरी केली. तरी सुद्धा पर्यायी सांस्कृतिक भूमिका घेणाऱ्या अनेक संघटना आपल्या भूमिकेशी बांधील आहेतच. परंतु एकंदरच साहित्यिक-सांस्कृतिक पर्यावरण गढूळ झाल्याने पुरस्कार पिपासू, आत्मकेंद्री, प्रसिद्धीलोलूप, कणाहीन व भूमिकाहीन जीवांची पिढी स्वतःला ख्यातनाम साहित्यिक वगैरे समजू लागली आहे. याची साक्ष कुठल्याही सांप्रदायिक, विषारी, प्रक्षोभक घटनांविरोधात 'ब्र' सुद्धा न काढता सोयीस्कर मौन बाळगणारी साहित्यिकांची पिढी देत असते. परिवर्तनवादी समूहात असूनही इतरांपेक्षा आमची भूमिका कशी सौम्य आहे, हे दाखविण्याची व प्रस्थापित सांस्कृतिक ठेकेदारांची मर्जी जिंकण्याची चढाओढ असंख्यांचे वैचारिक अपंगत्व व्यक्त

करते. जबाबदार साहित्यिक असण्याचे गांभीर्य केवळ कलाकृती लिहून येत नाही तर त्यासाठी व्यापक लोकहिताचे दीर्घकालीन भान, शोषण-शासनाच्या प्रत्येक व्यवस्थेला मुळापासून उखडून फेकण्याची प्रामाणिक उमेद व भोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व्यवस्थेतील अनागोंदीविरोधात प्रखर वैचारिक भूमिका यातून येत असते. तुकोबांचा वारसा प्रमाण मानणाऱ्या मराठी लेखकांनी प्रस्थापितांच्या पंखाखाली न विसावता, वेळप्रसंगी उपलब्ध हितसंबंधांना सोडण्याची हिंमत दाखविणे, धर्मनिरपेक्ष सर्जनशीलता सांभाळत आपला मानव-मुक्तिदायी वैचारिक भूमिकेचा कणा व खरे वाङमयीन शील सांभाळणे आज अत्यावश्यक झाले आहे. हा कणा व हे शील सांभाळण्याचे धारिष्ट्य जोपासण्यासाठी प्रागतिक पद्धतीने भाषा व साहित्य क्षेत्रात रचनात्मक कार्य उभं करण्याची आज आवश्यकता आहे. प्रतिक्रियावादाच्या भोवऱ्यात न अडकता निर्णायक, क्रांतिकारी व दीर्घकालीन कृतिकार्यक्रम त्यातूनच तयार करता येईल.

**संदर्भ :**

१. व्होरा, राजेंद्र - परामर्श, खंड ५ अंक ४, फेब्रुवारी १९८४, पृ. क्र. २३
http://www.unipune.ac.niqp PDF reference dated २४ ऑक्टोंबर २०२१
२. कोल, माईक - मार्क्सवाद और शैक्षिक सिद्धांत, अनुवादक - सत्यम श्रीवास्तव, ग्रंथशिल्पी प्रकाशन, दिल्ली, हिंदी संस्करण २०१२, पृ. क्र. ६८
३. फुले, जोतीराव- महात्मा फुले समग्र वाङमय, संपादक - हरी नरके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, २०१३, पृ. क्र. ३५६

विशेष लेख

# अक्षयुगातील मनुष्ये – संस्कृत आर्य

कॅरेन आर्मस्ट्राँग
अनु.
शरद नावरे

**ज्यावेळी** काही संस्कृत भाषिक आर्यांनी स्टेप्सवर उच्छाद मांडला होता, त्यावेळी इतर काहींनी दक्षिणेकडे स्थलांतर करायला सुरुवात केली. छोट्या छोट्या टोळ्यांतून ते अफगाणिस्तानमधून प्रवास करीत आले आणि शेवटी पंजाबमध्ये सिंधूच्या उपनद्यांमधील सुपीक प्रवेशात स्थिरावले. त्यांनी आपल्या नव्या वसतिस्थानाला सप्तसिंधू (सात नद्यांचा प्रदेश) असे नाव दिले. आर्यांच्या भारतातील वसतीस्थानाबद्दल वाद आहेत.[१] काही विद्वान हे घडलेच नाही, असे सांगतात. त्यांचे म्हणणे असे की, स्थानिक रहिवाशांनीच पंजाबमधील ही संस्कृती विकसित केली. आपल्या भारतातील सुरुवातीच्या इतिहासाबद्दल आर्यांनी कोणताच पुरावा मागे ठेवलेला नाही. त्यांचा समाज हा भटका

---

कॅरेन आर्मस्ट्राँग या धर्म आणि धर्मेतिहास या विषयांवर लिहिणाऱ्या जगप्रसिद्ध लेखिका आहेत. 'हिस्ट्री ऑफ गॉड' आणि 'एज ऑफ ट्रान्स्फरमेशन' ही त्यांची अतिशय गाजलेली पुस्तके आहेत. शरद नावरे कोल्हापूरस्थित असून शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञानाचे निवृत्त प्राध्यापक आहेत.
ईमेल– sharadnavare@gmail.com

समाज होता. लोक उघड्यावर राहत किंवा तात्पुरत्या छावणीमध्ये. आपल्याजवळ माहितीचे एकमेव साधन आहे. ते म्हणजे त्यांच्या विधी संहिता. त्यांची रचना संस्कृतमध्ये आहे आणि त्या सर्वांना मिळून वेदज्ञान असे नामाभिधान आहे. वेदांची भाषा अवेस्तनशी इतकी मिळती जुळती आहे आणि त्यांचे सांस्कृतिक समज इतके गाथाप्रमाणेच आहेत की जवळपास नक्कीच त्या आर्य संहिताच आहेत. आज बरेचसे इतिहासकार हे मान्य करतात की दुसऱ्या सहस्त्रकात स्टेप्समधूनच आर्य टोळ्यांनी घेऊन सिंधूच्या खोऱ्यात वसाहती स्थापन केल्या. पण हे स्थलांतर होते, सैनिकी आक्रमण नव्हे. युद्ध, प्रतिकार आणि व्यापक संहाराचा कोणताच पुरावा सापडत नाही. त्याऐवजी बहुदा विविध टोळ्यांचा सातत्याने चाललेला शिरकाव, असे या स्थलांतराचे स्वरूप असावे.

जेव्हा आर्य पहिल्यांदा भारतात आले त्यावेळी त्यांना सिंधू प्रदेशात आधीच्या एका संस्कृतीचे अवशेष आढळले असतील.[२] ही संस्कृती ज्या वेळी ऐन भरात होती त्यावेळी हे भारतीय साम्राज्य इजिप्त किंवा मेसोपोटेमियाहूनही विस्तीर्ण होते. त्याच्या दोन राजधान्या होत्या –आधुनिक सिंध प्रांतातील मोहनजोदडो आणि त्याच्यापासून पूर्वेकडे अडीचशे मैलांवरती हडप्पा. पण याशिवाय इतर शेकडो छोटी छोटी शहरेदेखील होती. तिथे पण उत्खनन झाले आहे. सिंधू नदीच्या काठाने ८०० मैल, त्यानंतर अरबी समुद्राच्या कडेने आणखी ८०० मैल. ही शहरे एकमेकांना हुबेहूब मिळती जुळती, जाळी पद्धतीने निर्मिलेली होती. सिंधू खोऱ्यातील संस्कृतीमध्ये अतिप्रगत व्यापारी नेटवर्क होते. ते सोने, तांबे, लाकूड, हस्तिदंत आणि कापूस मेसोपोटेमियाला

निर्यात करीत आणि ब्राँझ, जस्त, चांदी, नीलपाषाण आणि संगजीरा दगड आयात करीत.

दुर्दैवाने आपल्याला हरप्पन लोक किंवा त्यांच्या धर्माबद्दल काहीच ठाऊक नाही. अर्थात अशा काही रोमहर्षक शक्यता आहेत की, अक्ष युगानंतर ज्यांना महत्त्व प्राप्त झाले. अशा काही पंथांचे मूळ सिंधु संस्कृतीत होते. पुराणवस्तु संशोधकांना मातृदेवता, दगडी शिवलिंग आणि तीन शिक्के असे मिळाले की, ज्यांच्यावर एका योगासनात बसलेल्या आकृतीची प्रतिमा आहे. तिच्याभोवती प्राणी आहेत. हा शिव आहे काय? अभिजात हिंदू धर्मात शिव हा पशुपतिनाथ आणि आदियोगी आहे, पण तो आर्य देवता नाही. वेदांमध्ये कुठेही त्याचा उल्लेख नाही. पण अधिक ठळक पुराव्याअभावी आपण ठाम विधान करू शकत नाही. जेव्हा आर्य पहिल्यांदा भारतात आले तोपर्यंत हडप्पाचे साम्राज्य जवळपास लयाला गेले होते. पण भग्न शहरांमध्ये कदाचित अनधिकृत वस्त्या होत्या. अशा परिस्थितीत कदाचित संकर आणि देवाणघेवाण घडली असेल आणि काही आर्यांनी स्थानिक धारणा आत्मसात करून त्या स्वत:च्या धारणांशी जोडून घेतल्या असणे शक्य आहे

आर्य स्थलांतरितांना पुन्हा प्राचीन शहरे उभे करून साम्राज्याची पुनर्उभारणी करण्यात रस नव्हता. ते स्वत: भटके असल्याने स्थिरावल्या जीवनपद्धतीकडे तुच्छतेने पाहत. त्यांना छाप्यापूर्वी रथाला घोडे जोडण्यात जास्त रस होता. झरतुष्ट्रधर्मीयांप्रमाणे शांत जीवन त्यांना आवडत नव्हते. युद्धाचे रथ आणि बळकट ब्राँझ तलवारींचा त्यांना अभिमान होता. ते काऊबॉईज होते,

ज्यांची उपजीविका शेजाऱ्यांकडून चोरलेल्या गुरांवर चाले. ही त्यांची जीविका असल्याने त्यांच्या दृष्टीने खेळापेक्षाही जास्त असे काही त्यात होते. ती एक पवित्र क्रिया होती. विधींमुळे तिच्यात दिव्य शक्तीचा मिलाफ होत असे. भारतीय आर्यांना हवा होता तो एक गतिशील धर्म. त्यांचे अधिनायक म्हणजे दौडत जाणारे योद्धे आणि रथी. झरतुष्ट्रीयांकडून पूजले जाणारे असुर त्यांना हळूहळू कंटाळवाणे आणि निष्क्रिय वाटायला लागले. केवळ आपल्या आकाशस्थ राजवाड्यात बसून राहणारा आणि जगाचे लांबून नियंत्रण करणारा असुर वरुण कुणाला, कशी स्फूर्ती देणार? त्या ऐवजी त्यांना रथावरून भरधाव धावत असलेल्या साहसी देवांची भुरळ पडत असे.[३]

पंजाबमध्ये आर्य स्थिरावेपर्यंत असुरप्रमुख वरुणाचा पंथ ऱ्हासाला लागला होता आणि त्याची जागा सर्वोच्च देवता म्हणून इंद्राने घेतली होती.[४] इंद्राची रानटी अस्ताव्यस्त दाढी, पोटभर सोम पिऊन चिडलेला तो आणि त्याची युद्धाची अतोनात आवड. इंद्र हा आर्यांचा श्रेष्ठ आदर्श होता. त्याच्यासारखे होण्यासाठी प्रत्येक आर्य परमोत्सुक असायचा. कालारंभी त्याने हातातले वज्र भिरकावून, जीवनदायी पाण्याचा प्रवाह अडवून ठेवणाऱ्या आणि पृथ्वीवर दुष्काळ निर्माण करणाऱ्या, तीन शिरे असलेल्या दैत्याला ठार केले होते. इंद्राने हे जग जगण्याला लायक केले ते जबरदस्त संघर्षाला तोंड देऊन आणि भयंकर लढाया जिंकून. वरुणाप्रमाणे तो दूर आकाशातील प्रासादामधून व्यवस्था टिकवून ठेवणारा नुसता क्षीणशक्ती घरबशा नव्हता. वैदिक संहितांमध्ये वरुणाची सगळी गुणवैशिष्ट्ये –कायदा

प्रस्थापित करणे, सत्य उचलून धरणे आणि खोटेपणाला शासन करणे– ही वरुणाकडून इंद्राकडे जातात. पण तरीही एक त्रासदायक तथ्य उरतेच. त्याचे सर्व चकाकते वैभव गृहीत धरूनदेखील इंद्र हा खुनी होता. खोटारडेपणा आणि फसवणुकीच्या आधारे त्याने वृत्राचा पराभव केला. सदानकदा जीवावर उदार होऊन लढत राहणाऱ्या या समाजाचे हे हिंसापूर्ण आणि त्रासदायक सत्य होते. वैदिक स्तोत्रांमधे सगळे विश्वच मुळी दहशतपूर्ण संघर्ष आणि उत्कट शत्रुत्व याने भारलेले आहे. सुरासुर तुंबळ संग्रामाला करताहेत आणि आर्य पृथ्वीवर अस्तित्वाचा संघर्ष करत आहेत.[५]

हे तुटवड्याचे जग होते. सिंधू खोऱ्यात टिकून राहायचे तर घरबशा असुरांचे पार्थिव रूप असलेल्या एतद्देशीय समुदायामधील पशुधन चोरणे याला पर्याय नव्हता.[६] आर्य हे कष्टात जगणारे आणि बक्कळ पिणारे लोक होते. संगीत, जुगार आणि मद्याची आवड असणारे. पण या अगदी सुरुवातीच्या काळातदेखील त्यांच्यातील अध्यात्मिक प्रतिभा दिसून येते. पंजाबमध्ये शिरल्यानंतर काही काळातच त्यांच्यातील व्युत्पन्न अभिजनांनी ऋग्वेदातील अगदी सुरुवातीची सूक्ते रचली. वेदांमध्ये हा सर्वात प्रतिष्ठित भाग समजला जातो. संपूर्ण अवस्थेतील वेदांमध्ये १०२८ सूक्ते दहा मंडलांमध्ये विभागलेल्या रूपात आली. साहित्याच्या प्रचंड मोठ्या संग्रहाचा हा केवळ एक भाग होता. या साहित्यात अंतर्भाव होतो तो अनेक काव्यसंग्रहांचा, मंत्र आणि ते कसे उच्चारावेत या संबंधीच्या सूचनांचा. या संहिता आणि काव्ये स्फुरलेली आहेत. त्यांना श्रुती–जे ऐकले गेले आहे ते– अशी संज्ञा आहे. प्राचीन काळातील थोर ऋषिंना ती

प्रकट झाली. त्यांचे स्वरूप केवळ अधिकृत, मानवी संस्कारांनी न डागाळलेले, दिव्य व सनातन आहे.

वेदातील काही सूक्ते खरोखरी अतिप्राचीन आहेत, कारण आर्यांच्या टोळ्या भारतात जेव्हा पोहोचल्या त्या वेळेसच त्यांची भाषा पुरातन बनली होती. सात याजक कुटुंबांची वेद ही मालमत्ता होती. प्रत्येकाकडे त्यांचा स्वत:चा म्हणून संग्रह होता आणि यज्ञविधी काळात त्याचे पठण केले जायचे. कुटुंबातील सदस्यही स्तोत्रे मुखोद्गत करीत आणि पुढील पिढ्यांकडे मौखिक स्वरूपात सुपूर्द करीत. इसवी सनाच्या दुसऱ्या सहस्त्रकापर्यंत ती लिखित रूपात आली नव्हती. साक्षरतेबरोबर आपल्या स्मृती शक्ती थंडावल्या आहेत आणि इतकी विस्तृत सूक्ते केवळ मौखिक पद्धतीने लोक शिकत असतील यावर विश्वास ठेवणे आपल्याला कठीण जाते. पण वैदिक संहिता निर्दोष अचूकतेने पिढ्यान पिढ्या प्रसारित होत गेल्या आहेत. पुरातन संस्कृत जवळपास अनाकलनीय बनत गेली तरी आजदेखील वाणीच्या सुनिश्चित आघाता आणि विचलनासहित, विधिपूर्वक ठरवल्या गेलेल्या हातवारे आणि अंगुली निर्देशांसहित ती म्हटली जातात.

आर्यांच्या दृष्टीने ध्वनी हा नेहमीच पवित्र मानला गेला होता. ही पवित्र स्तोत्रे कानावर पडत असताना लोकांना आपल्यात दिव्यत्व शिरत असल्याची अनुभूति येत असे. स्मृतीमध्ये ती साठवताना त्यांची मने पवित्र अनुभूतिने भारली जात. वेदज्ञान हे तथ्याधारित कथन आत्मसात करणे, या स्वरूपाचे नसून दिव्य अनुभूतिच्या पातळीवरचे आहे. वेदांच्या कविता देवाबद्दलच्या सुसंगत कथा सांगत नाहीत किंवा यज्ञ बळीच्या विधीचे स्वच्छ

वर्णन करीत नाहीत, तर पडद्याआड दडवलेल्या आणि कूट पद्धतीने समुदायाला आधीच ठाऊक असणाऱ्याच पुराणकथा आणि दंतकथा यांच्याकडे निर्देश करतात. त्यातून जे सत्य आज व्यक्त करण्याचा प्रयत्न होतो, ते स्वच्छ तार्किक निरुपणात सांगता येत नाही. त्यांचा कवी हा ऋषि आहे. त्याने ही सूक्ते शोधलेली नाहीत. ती स्वत: जणू वेगळ्या जगातून येत असल्याप्रमाणे त्याला स्फुरली आहेत.[७] ऋषिला ही सत्ये प्रतीत झाली आणि सामान्यांना दिसणार नाहीत अशा प्रकारचे अनुबंध त्याला जाणवले. ज्याला कसे ऐकावे हे ठाऊक आहे, त्याच्यापर्यंत हे कसे पोहोचवावे याची दिव्य प्रज्ञा त्याच्यापाशी आहे. या स्फुरलेल्या कवितांचे सौंदर्य अशा प्रकारे त्याच्या श्रोतृ वर्गावर येऊन आदळत असे आणि त्यांच्यामध्ये अशा प्रकारे आश्चर्य, थक्कभाव, भय आणि आनंद निर्माण करीत असे की त्यांना स्वतःला दिव्य शक्तीचा स्पर्श झाल्याचे जाणवे. वेदांमधील पवित्र ज्ञान हे शब्दांच्या अर्थातून नव्हे तर त्याच्या ध्वनितून निर्माण होते. हा ध्वनि स्वत: एक देव आहे. स्तोत्रात दडलेल्या विचित्र व कूट संकेताकडे आणि विरोधाभासांकडे लक्ष देऊन ऐकत असताना ऋग्वेदातील द्रष्टे ज्ञान श्रोतृवर्गात हलकेच प्रविष्ट होत असे. त्यातून पूर्णतः असंबद्ध गोष्टींमधील संगती उलगडत जाई. ऐकताना त्यांना जग एकत्र ठेवणाऱ्या गूढ शक्तीच्या संपर्कात असल्याचा अनुभव येई. ही शक्ति म्हणजेच ऋत.[८] दिव्य व्यवस्थेचे मानवी वाणीत प्रकटलेले रूप. भौतिक पातळीवर पवित्र मंत्रोच्चारण झाले की क्रियमाण आणि जिवंत वास्तव बनून ऋत अवतरे. पंजाबातल्या तुटलेल्या आणि संघर्षमय वातावरणात ते क्रियमाण

होई. श्रोत्यांना जाणवे की, आपण अशा एका शक्तीच्या संपर्कात आहोत की जी ऋतूंचा क्रम नियंत्रित करते, ताऱ्यांना त्यांच्या कक्षेत ठेवते, पिकांना वाढवते आणि मानवी समाजातील विघटित तत्त्वांना एकत्रित करते. शास्त्रे कल्पनांच्या पातळीवर आकलनासाठी माहिती प्रदान करीत नाहीत, तर ज्यातून आयुष्याची दृष्ट मिती अदृष्टाशी जोडली जाते अशी साक्षात्कारी अनुभूति देतात.

ऋषिंना स्वतःला कायमपणे एका प्रेरित अवस्थेत ठेवण्याची सिद्धी प्राप्त झाली होती, जेणेकरून शब्द बाहेरून येत आहेत असे त्यांना जाणवे आणि त्याच वेळी आतून स्फुरत असल्याचीदेखील अनुभूति येई. त्यांनी कदाचित नेणिवेत डोकावण्यासाठी एकाग्रतेची तंत्रे विकसित करायला सुरुवात केली असेल. जर आपण स्वतःचे ध्यान विचलित करणारी व्यवधाने दूर केली, तर मनाची दारे उघडता येतात हे त्यांनी शोधून काढले[१] आणि जगातील प्रकाश आणि तल्लख वाणीचा उद्गाता अग्नि, त्यांनादेखील देवाची दृष्टी प्रदान करी. ऋषींनी भारतीय अक्ष युगाचा पाया घातला होता. मुद्दामहून अनुभवजन्य ओलांडून एका खोलवरील अधिक मूलभूत सत्याचा साक्षात्कार करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. इतक्या सुरुवातीला घेतलेली ही महान झेप होती.

अर्थात हेही खरे आहे की, आर्यांच्या समुदायातील ऋषि हे छोटे अल्पसंख्यांक होते. योद्धे आणि छापामार एका अगदीच वेगळ्या अध्यात्मिक जगात वावरत होते. त्यांचे आयुष्य मनुष्यवस्ती (ग्राम) आणि अरण्य यामध्ये विभागले होते.

मान्सूनच्या पावसात त्यांना असुरवृत्तीने तात्पुरत्या कामचलाऊ छावणीत वास करावा लागे. पण हिवाळी अयनानंतानंतर ते घोडे आणि बैल जुंपायचे आणि टोळीचे खर्चले गेलेले धन परत मिळवण्यासाठी म्हणून छापामारीच्या नव्या शृंखलेसाठी अरण्याकडे कूच करायचे. ग्राम आणि अरण्य यातील विरोध हा भारतामध्ये सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रांमधील एक प्रतिमान आहे.[१०] दोन्ही एकमेकाला पूरक होते. स्थिरावल्या समुदायातील लोक योद्ध्यांना आवश्यक असे धान्य आणि त्यांना लागणारे पशुदेखील पुरवत असत. तरीही त्यांना समाजाच्या सीमेवर वावरणाऱ्या गायीचोरांच्या हल्ल्याची नेहमी धास्ती वाटत असे. उष्णकटिबंधातील अरण्य ही अशी जागा होती की जिथे योद्ध्यांना आपले शौर्य दाखवण्याची आणि अज्ञाताला गवसणी घालण्याची संधी मिळे. पुढे अक्ष युगात संन्यासी अरण्यात अध्यात्मिक शोधासाठी म्हणून निघून जायचे. परिणामी आर्य अरण्यामध्ये हिंसा आणि अध्यात्म, दोन्हींचा अनुभव घ्यायचे. अगदी सुरुवातीपासून ही दोन्ही अतूटपणे जोडलेली होती. एखाद्या ऋषिप्रमाणे संयमपूर्वक आपले चित्त आणि हृदय रिकामे करून वाट पाहण्याऐवजी योद्ध्याला ठाऊक असायचे की अंतर्दृष्टीसाठी त्याला स्वतःला संघर्ष करावा लागणार आहे.

ज्या वेळी आर्यांनी स्टेप्समधे चोऱ्या करायला सुरुवात केली, तेव्हापासूनच त्यांनी त्यांच्या रोजच्या जीवनातील संघर्ष काल दर्शवण्यासाठी आपल्या विधींचा आकृतिबंध बदलला होता. झरतुष्ट्राने, त्याचे कुठे वर्णन केले नसले तरी गायीचोरांच्या या नव्या पद्धतीच्या यज्ञविधींमुळे तो अतिशय अस्वस्थ झाला

होता.'जे देवांनी प्रारंभी केले, ते आपण करावे'[११] नंतरच्या काळातील भारतीय विधी संहिता म्हणते. 'देवांनी असे केले, मनुष्य असे करतात'[१२] दुसरी संहिता म्हणते. आपल्या छाप्यांमध्ये आणि लढायांमध्ये आर्य योद्धे देव आणि असुर यांच्यातील संघर्षाचा पुनःप्रत्यय घेत युद्ध करतात. युद्ध करताना ते स्वतःला ओलांडून इंद्राशी तादात्म्य पावतात. हे विधी त्यांच्या लढायांना जणू एक आत्मा प्रदान करतात. आपला इहलोकातील लढायांचा संबंध दिव्य आदिबंधांशी जोडून ते त्यांना पवित्र बनवतात.

यज्ञ करणे हा म्हणूनच आर्यांच्या अध्यात्मिकतेचा गाभा होता, आणि दुसऱ्या बाजूला ते कृत्य अर्थ जीवनाशीदेखील निगडित होते. स्टेप्समधील शांतीपूर्ण विधी आता जास्तच आक्रमक आणि स्पर्धात्मक बनले होते. ते आता अमेरिकेच्या वायव्य भागातील पॉट लॅचशी साधर्म्य दाखवत होते. आपण जिंकलेल्या लुटीचे हे अमेरिकन गर्वाने प्रदर्शन करीत आणि मोठ्या संख्येने मेजवान्यांसाठी पशुंचे बळी देत. एखाद्या टोळीने गरजेपेक्षा जास्त धान्य आणि पशु लुटीतून गोळा केले तर तो अधिशेष नष्ट करणे आवश्यक असायचे. कायम भटकणाऱ्या समुदायाला ही लूट संचय करून ठेवणे अशक्यप्राय होते आणि त्यामुळे पॉट लॅच हा संपत्तीचे पुनर्वाटप करायचा एक सरधोपट मार्ग होता. हा विधी टोळी प्रमुख किती यशस्वी झाला याचेही प्रदर्शन मांडत असे आणि त्यातून त्याची प्रतिष्ठा वाढत असे.

भारतामध्ये राजा (प्रमुख) याच प्रकारे यज्ञ आयोजित करीत असे.[१३] तो स्वत:च्या टोळीतील जेष्ठांना आणि शेजारील टोळीच्या प्रमुखांना एका खास यज्ञभूमीला निमंत्रित करीत असे. तिथे

त्याच्या लुटीतील अधिशेष प्रदर्शित केला जाई. गायी, घोडे, सोम आणि धान्य. यातील काही भाग हवि रूपात देवांना प्रदान केला जाई, काही भाग भव्य समारंभात भरपूर हुल्लडबाजी करीत सेवन केला जाई. उरलेला सर्व भाग इतर राजांना भेट म्हणून वाटून टाकला जाई. यामुळे यजमानाच्या पाहुण्यांना नंतर त्याच्या परताव्याचे बंधन निर्माण होई. राजे लोक अधिक भव्य यज्ञ आयोजित करण्यासाठी म्हणून एकमेकांशी स्पर्धा करीत. देवांची स्तोत्रे गाणारा होता पुरोहित यजमानाचे ही स्तुतिपर गुणगान करी आणि त्यात त्यांचा खोडसाळपणा आणखी जास्त लूट घेऊन येईल असे आश्वासनदेखील असे! यजमान देवांना खुश करून इंद्राशी तद्रुप होऊ पाहत असता, त्याला स्वतःलादेखील अशी स्तुति आणि सन्मान अपेक्षित असे. जेव्हा तो मृत्युशय्येवर असे आणि आपले पार्थिव मागे सोडून आपल्या दिव्य प्रतिरूपाशी एकरूप होण्याची तयारी करे, त्याच वेळी तो स्वत: आक्रमकपणे स्वची प्रतिष्ठा कशी वाढेल, तेही पाहत असे. प्राचीन विधीतला हा विरोधाभास अक्ष युगातील सर्वच सुधारकांची डोकेदुखी होती.

यज्ञाने त्या भागात साथीसारखी पसरलेली हिंसा आणखीनच वाढीला लागे. यज्ञसमाप्तीनंतर यजमानाजवळचे गो धन संपुष्टात आलेले असे आणि आपल्या संपत्तीत झालेली घट भरून काढण्यासाठी त्याला युद्धाच्या नव्या मोहिमा आखाव्या लागत. आपल्याकडे या यज्ञांची समकालीन वर्णने नाहीत, पण नंतरच्या वाङ्मयात काही तुरळक संदर्भ मिळतात, त्यावरून तिथे काय चालायचे ते लक्षात येते. यज्ञ हा एक गंभीर प्रसंग तर खराच,

पण दुसऱ्या बाजूला तो हुल्लडबाजीचा भव्य उत्सवदेखील असे. मद्य आणि सोमरस मोठ्या प्रमाणात प्राशन केले जाई. परिणामतः लोक एक तर धुंदीत, अथवा गुंगीत असत. यजमान राजाने पुरवलेल्या दासींबरोबर नैमित्तिक लैंगिक व्यवहार केले जात. त्याच वेळी जोमदार आणि आक्रमक स्पर्धादेखील होत. रथांच्या शर्यती, धनुर्विद्येच्या स्पर्धा, नर्तक, गायक आणि वादकदेखील एकमेकांशी स्पर्धा करीत. मोठे पण लावून द्युत खेळले जाई. योद्ध्यांचे गट कृतक युद्ध करीत. सारे मनोरंजक असे, पण जोखमीचेदेखील. अशा स्पर्धात्मक वातावरणात धंदेवाईक योद्ध्यांमधील कृतक लढायांचे रूपांतर खऱ्या लढाईत होई. एखादा राजा एखादी गाय जुगारात पणाला लावी आणि पाहता-पाहता कळपच्या कळप हरून बसे. या प्रसंगी तो ईर्ष्येपोटी शत्रूवर हल्लादेखील करी. हा शत्रू म्हणजे त्याच्याशी वाईट वागलेला शेजारचा राजा, किंवा दुसरा कोणी वेगळा यज्ञ करणारादेखील. नंतरच्या साहित्यावरून असे दिसते की, देव आणि असुर बऱ्याचदा एकमेकांचे यज्ञ उद्ध्वस्त करीत आणि लूट व बंधक घेऊन जात. त्यावरून लक्षात येते की अशा प्रकारच्या अंतःक्रमण पृथ्वीवरदेखील होत असणार.[१४] एखाद्या राजाला यज्ञ समारंभाचे आमंत्रण नसणे ही फारच अपमानास्पद गोष्ट मानली जाई. त्या अपमानाचा बदला घेण्यासाठी शत्रूच्या गोटात शिरून तो लुटणे हा त्याचा हक्क मानला जाई. अशा पूजाविधीतून लोक मारले जाण्याचा संभव असे, आणि खरोखरी ते मारले जातदेखील! भव्य समारंभाच्या नेपथ्यातील हा यज्ञविधी आर्यांच्या शौर्यसंकेतातील गौरव आणि दहशतदेखील प्रदर्शित

करीत असे.[१५]

योद्ध्याचे संपूर्ण आयुष्य हे धनधान्य आणि संपत्तीसाठीची प्राणांतिक धडपड असे. बऱ्याचदा त्याची परिणती त्याच्या मृत्यूमध्ये होई. स्टेप्समधील त्यांच्या वास्तव्य काळात आर्यांची धारणा होती की त्यांच्यातील सर्वोत्तम आणि सधन हे मृत्यूनंतर देवांबरोबर स्वर्गात वास करतील. आता त्यांचा ठाम विश्वास बनला की समरांगणात धीरोदात्तपणे मृत्यु पत्करणारा वीर तात्काळ स्वर्गात प्रविष्ट होईल. म्हणून शौर्य संकेतामध्ये मोक्ष आणि वीरगती हे अभिन्न होते. एका प्राचीन कथेवरून हे स्पष्ट होईल :

योद्ध्यांचा एक गट एका दीर्घकाळ चालणाऱ्या यज्ञासाठी म्हणून जमला होता. अशा प्रसंगी जे बऱ्याचदा घडायचे ते घडले. एका विरोधी टोळीने त्यांना वेढा घातला आणि तिथे तुंबळ लढाई झाली. दुर्दैवाने त्या लढाईत त्यांचा स्थूर नामे करून प्रमुख मारला गेला. सगळे संपल्यानंतर योद्धे वर्तुळात बसून शोक करू लागले. त्यावेळी त्यांच्यापैकी एकाला साक्षात्कार झाला की स्थूर यज्ञ वेदीतील पवित्र अग्नित शिरतो आहे आणि नंतर सरळ स्वर्गाकडे निघाला आहे. त्याने आपल्या मित्रांना ओरडून सांगितले, 'शोक करू नका. ज्याच्यासाठी तुम्ही शोक करीत आहात तो तर यज्ञ वेदीतील अग्नितून स्वर्गात गेला आहे.'[१६] एका साहसपूर्ण विधीमध्ये स्थूराचा मृत्यू ओढवला, या एकाच कारणासाठी स्थूराला स्वर्ग प्राप्ती झाली. त्याच्या साथीदारांना हा तेजस्वी साक्षात्कार घडून आला याचे कारण त्यांचा नेता निरर्थक प्रकारे अकाली ठार मारला गेला.

काही योद्ध्यांना या शौर्य काळातील मृत्यूचे निरर्थकत्व जाणवे. ऋग्वेदातील शेवटच्या भागातील काही कवितांमधून हा थकवा आणि निराशा व्यक्त झाली आहे. लोक थकून जात. ऋषि तक्रार करतोय, 'दारिद्र्य, नागडेपण आणि थकव्यामुळे मी पार गांजून गेलोय. माझं मन एखाद्या पक्ष्याप्रमाणे फडफडतंय. घुशीने विणकराचे धागे कुरतडावेत, त्याप्रमाणे काळज्या मला खाऊन टाकत आहेत'[१७]

ही असुरक्षितता वेदोत्तर काळातील बदलांची सूचक आहे. तो त्रासदायक सामाजिक स्थित्यंतरांचा काळ[१८] होता. दहाव्या शतकात टोळीतील पुरातन साम्यवादी रचना कोसळत होत्या, आणि 'क्षत्रिय' या अभिधानाने ओळखल्या जाणाऱ्या योद्ध्यांचा उदय होत होता. त्याहून कमी प्रतिष्ठित वर्तुळातील लोक ('वैश्य' म्हणून ओळखले गेलेले)– त्यांनी छापेमारी सोडून शेती आपलीशी केली होती. ज्या वेळी क्षत्रिय रथाला घोडे जुंपून नव्याने लुटीच्या शोधात बाहेर पडायचे, त्या वेळी वैश्य मागे गावात थांबत. आर्य लोक शूद्रांप्रमाणेच आता असुरसदृश्य जीवन क्रमात घरबशे झाले होते. त्यांची लूट करणे आता सोपे होते.[१९]

काही टोळीप्रमुखांनी हळुहळू राज्ये स्थापन केली. राजा हा तहहयात नसे. प्रत्येक वर्षी राजसूय करणे त्याला बंधनकारक असे. दरवर्षी आपण राज्यपदाला लायक असल्याचे सिद्ध करण्यासाठी हा अभिषेक विधी होता. अर्थात त्याला आव्हान देणारा कुणी न कुणी पुढे येई आणि जुन्या राजाला एखादी यशस्वी युद्ध मोहीम आखून लूट जिंकून आणावी लागे आणि नंतर विरोधकाला द्युतामध्ये पराजित करावे लागे. जर तो हरला

तर त्याला अरण्यवास घडे, पण तो परत येई आणि प्रतिस्पर्ध्याला नव्याने राजसूयाचे आव्हान देई. भारतीय राज्यपदातील ही अस्थिरता इतकी अंगवळणी पडली होती की राज्यकारभारावरील एका ग्रंथाने राजाच्या शत्रूला शासनाचा एक विभाग म्हणून मुकर्रर केले होते![२०]

उत्तर वैदिक काळामध्ये स्थित्यंतराची एक नवी लाट आली. दहाव्या शतकात काही आर्य हळूहळू पूर्वेकडे सरकू लागले. त्यांनी गंगा आणि यमुना दरम्यानचा दुआब व्यापला. हा भूभाग आता आर्यावर्त (आर्यांचा प्रदेश) बनला. इथेदेखील लहान लहान राज्ये उभे राहिली. कुरूपांचालचे राजे गंगेच्या सपाटीच्या उत्तर-पश्चिम कडेला स्थिरावले. हस्तिनापूर ही त्यांची राजधानी. यादव कुळ दक्षिणेला मथुरे जवळ स्थिरावले. अनोख्या वृक्षसंपदेने भरलेली समृद्ध कुरणे म्हणजे जणू हिरवे नंदनवनच होते. पण आपापली छोटी शहरे उभारण्यासाठी जंगलातील वृक्ष जाळून भूमी स्वच्छ करणे हे प्रणेत्यांना आवश्यक होते. वसाहती करणाच्या या काळात अग्नि देवाला महत्त्व आले. नवीन वस्त्या करण्याची प्रक्रिया मंद आणि टप्प्या  टप्प्याने घडणारी होती. दरवर्षी हिवाळ्यात कुरूपांचाल अरण्यामध्ये योद्ध्यांची नवी तुकडी पाठवत असत. ते स्थानिक रहिवाशांना अंकित करून आधीच्या वर्षांपेक्षा आणखी पूर्वेकडे टेहळणी-नाके सरकवित.[२१] शूद्रांच्या शेतीवर ते हल्ले करीत. त्यांचे धान्य आणि पशुधन लुटत. आणि मान्सूनच्या आगमनाआधी आपली स्वतःची शेती करण्यासाठी परतून येत.[२२] हळुहळू आर्यांची आघाडीरेषा पद्धतशीरपणे पुढे सरकू लागली. मध्ययुगात आर्यांनी ज्या प्रकारे

अंतर्गत जगावर कब्जा केला त्याची तालीमच जणू या प्रक्रियेत बाह्य जगाच्या शिस्तबद्ध विजयातून झाली. पूर्वेकडील या हळुहळू होणाऱ्या यशःसिद्धीला मान्यता देणारे नवे विधी रचले गेले. भटकेपण ही अजूनही एक पवित्र संकल्पना होती. यज्ञभूमी एकदाच वापरली जायची आणि यज्ञविधी संपल्यानंतर तिचा त्याग केला जायचा. यज्ञभूमीच्या पश्चिम बाजूला शाकारलेली झोपडी तिथे स्थायिक होणाऱ्या गृहस्थाचे घर म्हणून कामाला येई.

यज्ञविधीत योद्धे या झोपडीतून पूर्वेकडे बंदिस्त कुंपणापर्यंत अग्नि नेत. तिथे उघड्यावर नवीन जागेत नवीन शेकोटी बनवली जाई दुसऱ्या दिवशी एका नव्या यज्ञभूमीची स्थापना होई, आणि पूर्वीचे सगळे विधी नव्याने केले जात. या विधीतून अग्निची विजयपताका नव्या प्रदेशात नेली जात असे. नंतरच्या काळात एक जण म्हणतो, या अग्निने आमच्यासाठी नवी भूमिका करावी. आमच्या शत्रूंना जिंकत हा अग्नि आम्हास पुढे नेवो. या अग्निने आमच्या शत्रूंना उताविळपणे जिंकावे. या अग्निने स्पर्धेतील बक्षिसे जिंकावी.[२३]

अग्नि हा वसाहतकारांचा आश्रयदाता होता. त्यांची वसाहत ही एक नवी सुरुवात असे आणि पहिल्या निर्मितीप्रमाणे अनागोंदीतून व्यवस्था ते निर्माण करीत. अग्नि हा योद्ध्याच्या भवतालावर ताबा मिळवण्याच्या क्षमतेचे प्रतीक असे. त्याचे अग्निशी खोलवरचे नाते होते. एखाद्या वैश्य शेतकऱ्याच्या शेगडीतून तो अग्नि चोरण्यात यशस्वी झाला तर तो गाईंनादेखील पळवत येऊ शके, कारण गुरे नेहमीच पेटत्या पलिताच्या मागे येतात.

एक संहिता म्हणते, 'त्याने आपल्या शत्रूच्या घरातून धगधगता अग्नि घ्यावा त्याद्वारे तो त्यांचे धन आणि मालमत्ता घेतो'.[२४] अग्नि हा योद्ध्याच्या शक्तीचे आणि यशस्वीतेचे प्रतीक आहे. तो त्याचा जिवलग दोस्त आहे. तो नवीन अग्नि तयार करतो, त्यावर नियंत्रण मिळवतो, त्याचे नियंत्रण करतो. अग्नि त्याच्या पुत्राप्रमाणे आहे. तो मृत्यू पावल्यावर, त्याला जाळले गेल्यानंतर अग्नि त्याला देवांकडे घेऊन जातो. अग्नि त्याचा आत्मा आहे.[२५] आग ही अग्नि असल्याने हा आत्मा पवित्र आणि दिव्य आहे.

अग्नि सर्वत्र होता, पण तो दडलेला होता. तो सूर्यात होता, मेघगर्जनेत होता, वादळी पावसात होता आणि पृथ्वीवर आग घेऊन येणाऱ्या विजेच्या लोळात होता. तो जलाशयात आणि जलप्रवाहात होता, नदी काठावरील मातीत होता आणि झाडांमध्ये (ज्यातून तो पैदा करता येतो)[२६] होता. या सगळ्या अग्निच्या दडायच्या जागा आहेत, आणि तिथून त्याला सन्मानपूर्वक काढायला हवे आणि मनुष्यांच्या सेवेस लावायला हवे. नवी वसाहत स्थापन केल्यानंतर योद्ध्याने अग्निसयना विधी करायला हवा. अग्नि साठी नव्या विटांची वेदी निर्माण करायला हवी. आधी नदीकाठची माती गोळा करायला जावे. तिथे अग्नि दडलेला असतो. विधिपूर्वक नवी भूमी काबीज करावी. जर नव्या कब्जाला तिथल्या स्थानिक रहिवाशांनी विरोध केला तर त्यांच्या बरोबर युद्ध करून त्यांना ठार करावे लागेल. यज्ञ भूमीवर परतल्यानंतर विजयी योद्ध्यांना पक्ष्याच्या रूपात आपली बेदी बांधायला हवी. पक्षी हे अग्निचे एक चिन्ह आहे. नवीन आग प्रज्वलित केल्यानंतर अग्नि प्रकट होतो,[२७] तेव्हाच नवी

वसाहत हे एक वास्तव बनते. एक उत्तरकालीन संहिता म्हणते 'जेव्हा कोणी अग्नि वेदी बांधतो तेव्हा तो वसाहतकार बनतो आणि जे कुणी अग्नि वेदी बांधतात तेच स्थिरावतात.'[२८]

छापेमारी हा आर्यांच्या विधींमधील समाविष्ट भागच होता. सोमविधीमध्ये ते पवित्र पेय प्यायल्यानंतर योद्ध्यांना देवांच्या दुनियेत गेल्याप्रमाणे वाटते. एकदा का देवांच्या दैवी शक्तीने ते भारले गेले, की त्यांना ही प्रचंड पृथ्वी आणि स्वर्ग दोन्ही ओलांडून गेल्यासारखे वाटते. पण हे सूक्त पहा : 'मी ठरवले होते की एखादी गाय मिळावी किंवा एखादा उमदा घोडा. मी सोमरस प्राशन केला आहे ना?'[२९] सोमविधीमध्ये यजमान आणि त्याचे अतिथी दोघांनाही –यज्ञभूमी सोडून जवळपासच्या वस्तीवर छापा मारून एखादा पशू आणि सोम यज्ञविधी साठी मिळवावा लागतो. राजसूयामध्ये नव्या राजाने सोम प्यायल्यानंतर त्याची रवानगी छापा मारण्यासाठी करण्यात येई. तो जेव्हा लूट घेऊन परत येई तेव्हाच यज्ञविधी करणारे पुरोहित त्याचे राजेपद मान्य करीत : 'राजन तू आता ब्रह्म आहेस!'[३०]

उत्तर वैदिक काळात आर्यांनी ब्रह्म ही अस्तित्वाच्या सर्वोच्च अंगाची कल्पना विकसित केली. ब्रह्म म्हणजे देव नव्हे तर देवांच्याही वर असलेली अधिक खोल आणि अधिक मूलभूत शक्ती. ती विश्वाच्या सर्व भिन्न विभागांना एकत्र ठेवते आणि त्याचे तुकडे होऊ देत नाही.[३१] ब्रह्म हे एक असे मूलतत्त्व आहे, की जे सर्व वस्तूंना बळ देते आणि त्यांना विकसित होऊ देते. ते जीवनाचे रूप आहे.[३२] ब्रह्माची व्याख्या करता येत नाही. किंवा त्याचे वर्णन करता येत नाही, याचे कारण ते सर्वव्यापी

आहे. मनुष्य त्याच्या बाहेर पडून त्याच्याकडे वस्तुनिष्ठ प्रकारे पाहू शकत नाही. पण विधींमध्ये त्याची अनुभूति येते. जेव्हा राजा त्याच्या छाप्याहून युद्धातील लूट घेऊन सुरक्षित परतला, त्या वेळेला तो ब्रह्मपदावर पोहोचला होता. आता तो अक्ष बनला आहे. चक्राचा आंस, जो सर्व राज्य एकत्रित ठेवेल आणि त्याची भरभराट व विकास घडवून आणेल. ब्रह्माची अनुभूति शांततेतदेखील येते. एखाद्या विधीच्या शेवटी ब्रह्माचे गूढ सांगणारी शब्दयोजना करण्याची स्पर्धा असे. जोपर्यंत दोघा स्पर्धकांपैकी एक निवृत्त होत नाही, तोपर्यंत ही स्पर्धा चालत राहते. जो निरूत्तर होऊन मौन होतो, त्याला स्पर्धेतून बाहेर पडावे लागते.[३३] ब्रह्मतत्त्व वाणीचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या निरूत्तर करणाऱ्या प्रश्नांच्या गूढ टकरावातून सिद्ध होईल. काही पवित्र क्षणांपुरती स्पर्धकांना सर्व जीवनाचा तोल सांभाळणाऱ्या गूढ शक्तीची अनुभूति येईल आणि विजेता आपण ब्रह्म असल्याचे सांगू शके.

दहाव्या शतकापर्यंत काही ऋषींनी एका नव्या धर्मशास्त्रीय निरुपणाला आरंभ केला होता. पारंपरिक देव फारच अपक्व असल्याचे जाणवू लागले होते. त्यांनी स्वत:च्या पलीकडे अंगुलीनिर्देश करायला हवा. ऋग्वेदातील काही सूक्ते अशा देवतेचा शोध घेत आहेत. ‘कोणत्या देवाची आम्ही हवि देऊन अर्चना करावी?’ असे एक ऋषि दहाव्या मंडलातील १२१व्या सुक्तात विचारतो ‘मनुष्य आणि पशुंचा खरा स्वामी कोण आहे? हिमाच्छादित शिखरांवर आणि महान सागरावर कुणाची मालकी आहे? कोण देव स्वर्गाला आधार देतो? या सूक्तात कवीला

असे उत्तर मिळाले की जे भारतीय अक्षयुगाची बीज कथा बनले. त्याला आदिम अनागोंदीतून एका निर्माणकर्त्या देवाचा उगम होतो आहे, असा साक्षात्कार झाला. ही आकृती म्हणजे ब्रह्माचे सगुण रूप. त्याचे अभिधान आहे प्रजापती –'सर्व'. प्रजापती हे विश्वाचे स्वरूप आहे. विश्वाला धारण करणारी ती जीवनशक्ती आहे. जाणीवेचे ते बीज आहे आणि जडद्रव्याच्या पाण्यातून फांकणारा तो प्रकाश आहे. पण प्रजापती हे विश्वाच्या बाहेर असणारे शुद्ध चैतन्यदेखील आहे. ते निसर्गाचे नियम ठरवते. अचल आणि केवलस्वरूपी. तो एकमेव देवांचा देव आहे आणि त्याच्याशिवाय कोणी नाही'

पण दुसऱ्या एका ऋषिला हे फारच सोपे आणि बटबटीत वाटले.[३४] 'प्रारंभी काहीच नव्हते' तो म्हणतो, 'तिथे अस्तित्व नव्हते, आणि नास्तित्वही नव्हते. मृत्यू नव्हता आणि अमरत्वदेखील नव्हते. होती ती केवळ स्वैर अनागोंदी. ही अनागोंदी, व्यवस्था आणि टिकाव धरू शकेल अशात कशी बदलली? कवी म्हणतो, 'या प्रश्नाचे उत्तर असू शकत नाही'.

कुणाला ठाऊक आहे आणि कोण सांगू शकेल? हे कुठून निर्माण झाले? कुठून झाली उत्पत्ति? देव या विश्वाच्या उत्पत्तिनंतरचे आहेत. हे प्रथम कुठून निर्माण झाले, या उत्पत्तिचा आदिम स्त्रोत असलेला तो कोण? त्याने हे निर्माण केले की नाही निर्माण केले? कोणते नेत्र सर्वोच्च लोकातून या विश्वाचे नियंत्रण करतात? त्याला खरेच ठाऊक आहे, की त्यालाही ठाऊक नाही?[३५] ही कविता ब्रह्मोदय या नावाने ओळखली जाते. ऋषि एका मागून एक अगम्य प्रश्न विचारतोय, आणि तो स्वत: व त्याचा श्रोतृवर्ग

अज्ञानाच्या मौनात विलीन होतात.

शेवटी प्रसिद्ध पुरुषसुक्त. एका ऋषिने आर्यांच्या प्राचीन उगम कथेवर ध्यान केले आणि भारताच्या अक्ष युगाचा पाया रचला.[३६] पहिल्या मनुष्याच्या बलिदानातून मनुष्यजात निर्माण झाली. आता तो हा आदिपुरुष स्वेच्छेने मुक्तपणे हिंडत असल्याचे सांगतो. तो यज्ञ भूमीतील ताज्या गवतावर झोपला आहे, आणि देवांना स्वतःला मारू देतो. स्वतःला समर्पित करण्याचे हे कृत्य विश्वाला गतिमान करते. हा पुरुष स्वत: विश्वरूप बनतो त्याच्या कलेवरातून सगळे निर्माण होते –पक्षी, प्राणी, घोडे, गायी. मनुष्यातील जाती, स्वर्ग आणि पृथ्वी, सूर्य आणि चंद्र, अग्नि आणि इंद्रासारखे महान देवदेखील त्याच्या शरीरातून निर्माण झाले. पण प्रजापती प्रमाणे तोदेखील केवलस्वरूपी आहे. त्याचा ७५ टक्के भाग अमर्त्य आहे आणि काळ व मर्त्यतेच्या पल्याड आहे. पुरुषाने विरोध न करता स्वतःला बळी दिला. योद्ध्यांच्या अज्ञेयवादी विधीप्रमाणे त्याच्या बळी जाण्यात संघर्ष नव्हता.

पुरुष आणि प्रजापती दोन्ही सावली सदृश्य दूरवरच्या आकृत्या आहेत. त्यांच्याशी पुराणकथा संलग्न नाहीत त्यांच्याबद्दल सांगण्यासारखे फारच थोडे आहे. असे म्हटले जाते की प्रजापतीचे खरे नामाभिधान एक प्रश्न रूप आहे– कोण? भारताच्या अक्ष युगाच्या निर्मिती क्षणी भारतातील द्रष्टे संकल्पना आणि शब्दांच्या पलीकडे जाऊन अनिर्वचनीयाच्या मूक आस्वादाकडे वळले होते. अर्थात पुरुषसूक्तावरून दिसून येते की ते अजूनही प्राचीन विधींच्या प्रभावाखाली होते. हे विधी इतके भयानक आणि हिंसक असूनदेखील भारतातील आमूलाग्र बदलाचे स्फूर्तिस्थान

बनून राहतील. दहाव्या शतकाच्या अखेरीस ऋषींनी चिन्हांची एक व्यामिश्र व्यवस्था निर्माण केली. त्यातून अक्ष युगाचे पहिले अध्यात्म निर्माण होणार होते.

## संदर्भ सूची


१. Edwin Bryant, The Quest for the Origins of Vedic Culture: The Indo-Aryan Debate (Oxford and New York, 2001; S. C. Kak, "On the Chronology of Ancient India," Indian Journal of History and Science 22, no. 3 (1987); Colin Renfrew, Archaeology and Language: The Puzzle of Indo-European Origins (London, 1987).

२. Keay, India, pp. 5-18; Hopkins, Hindu Religious Tradition, pp. 3-10; Flood, Introduction to Hinduism, pp. 24-30.

३. Shatapatha Brahmana (SB) 6.8.1.1, in J. C. Heesterman, The Broken World of Sacrifice: An Essay in Ancient Indian Ritual (Chicago and London, 1993), p. 123.

४. Mircea Eliade, A History of Religious Ideas, trans. Willard R. Trask, 3 vols. (Chicago and London, 1978, 1982, 1985), I:200-201; J. C. Heesterman, "Ritual, Revelation and the Axial Age," in S. N. Eisenstadt, ed., The Origins and Diversity of Axial Age Civilizations (Albany, 1986), p. 404.

५. Louis Renou, Religions of Ancient India (London, 1953), p. 20

६. J. C. Heesterman, The Inner Conflict of Tradition: Essays in Indian Ritual, Kingship and Society (Chicago and London, 1985), pp. 85-87.

७. Jan Gonda, The Vision of the Vedic Poets (The Hague, 1963), pp. 14-23.

८. Renou, Religions of Ancient India, pp. 10, 16-18; Michael Witzel, "Vedas and Upanishads," in Gavin Flood, ed., The Blackwell Companion to Hinduism (Oxford, 2003), pp. 70-71; Heesterman, "Ritual, Revelation and the Axial Age," p. 398

९. Rig Veda 9.10.6, as translated in Gonda, Vision of the Vedic Poets, p. 17.

१०. Heesterman, Inner Conflict of Tradition, pp. 118-24

११. SB 7.2.1.4, in Mircea Eliade, The Myth of the Eternal Return, or, Cosmos and History, trans. Willard R. Trask (Princeton, 1959), p. 21

१२. Taittiriya Brahmana (TB) 1.5.9.4, ibid

१३. Heesterman, Inner Conflict of Tradition, p. 206; Heesterman, "Ritual, Revelation and the Axial Age," pp. 396–98; Keay, India, pp. 31–33; Romila Thapar, Early India: From the Origins to ad 1300 (Berkeley and Los Angeles, 2002), pp. 126–30.

१४. Jaiminiya Brahmana (JB) 2.297; Heesterman, Broken World of Sacrifice, p. 52.

१५. Heesterman, Broken World of Sacrifice, pp. 2, 27, 76–79.

१६. JB 2.297–99, in Heesterman, Broken World of Sacrifice, p. 52; Heesterman, "Ritual, Revelation and the Axial Age," p. 397.

१७. Rig Veda 10.33.2–3. Griffith translation.

१८. Hermann Kulke, "The Historical Background of India's Axial Age," in Eisenstadt, Origins and Diversity of Axial Age Civilizations, p. 376; Flood, Introduction to Hinduism, pp. 67–68; Keay, India, pp. 37–40, 50–53

१९. Heesterman, Broken World of Sacrifice, pp. 136–3

२०. Arthashastra 6.13–15, in Heesterman, Inner Conflict of Tradition, p. 149.

२१. TB 1.8.4.1, in Heesterman, "Ritual, Revelation and the Axial Age," p. 403.

२२. SB 5.5.2.5, ibid.

२३. Mantra in Taittiriya Samhita (TS) 1.3.3, in Heesterman, Broken World of Sacrifice, p. 12

२४. Maitrayani Samhita 4.2.1.23:2, ibid., pp. 23–24, 134–37.

२५. SB 2.2.2.8–10, ibid., p. 24.

२६. Hopkins, Hindu Religious Tradition, pp. 17–1

२७. Kathaka Samhita (KS) 8.9.92–3; TS 4.1.2.2, in Heesterman, Broken World of Sacrifice, p. 113

२८. SB 7.1.1.1–4, in Eliade, Myth of the Eternal Return, pp. 10–11.

२९. Rig Veda 10.119.1, 7–8. Griffith translation

३०. Heesterman, Broken World of Sacrifice, pp. 171–73.

३१. Louis Renou, "Sur la notion de brahman," Journal asiatique

237 (1949).

३२. Jan Gonda, Change and Continuity in Indian Religion (The Hague, 1965), p. 200.

३३. Heesterman, Inner Conflict of Tradition, pp. 70-72, 126.

३४. Rig Veda 10.129.

३५. Rig Veda 10.129:6-7. Griffith translation.

३६. Rig Veda 10.90.

## ‘परिवर्तनाचा वाटसरू’साठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी ते सुवाच्च अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये श्रीदेव ७-०७०८ या अथवा मंगल, एरिअल युनिकोड, उत्साह, शिवाजी किंवा तत्सम युनिकोड फॉण्टमध्ये पाठवावे.

विशेष लेख

# भारतातील लघुउद्योगांचा धोरणात्मक आढावा

निलिमा गावडे

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेची प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय ही तिन्ही क्षेत्रे प्रमुख अंगे आहेत. अर्थव्यवस्थेचे प्राथमिक क्षेत्रातील शेतीवरील अवलंबित्व कमी करून द्वितीय क्षेत्रातील औद्योगिक क्षेत्राची वाढ होणं आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास होऊन अर्थव्यवस्थेच्या मूलभूत विकासाला चालना मिळाली की, मग तृतीय म्हणजे सेवा क्षेत्राचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढत जाणं हे संबंधित अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे लक्षण मानले जाते. अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा हा प्रवास पहिल्या जगातील विकसित देशांच्या बाबतीत झालेला आपल्याला दिसतो. परंतु विकसनशील देशांच्या विकासाच्या या मार्गात मात्र अनेक अडथळे निर्माण झालेले दिसतात. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून जगभरात नव्या आर्थिक धोरणांचा विस्तार झाल्यानंतर विकसनशील देशांमध्ये सेवा क्षेत्राचा

लेखिका पुणेस्थित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अर्थशास्त्राच्या पीएच्.डी. संशोधक आहेत.
ईमेल – gavadenilima@gmail.com

प्रभाव वाढल्याचे चित्र समोर येते. जसे, मलेशियातील औद्योगिक क्षेत्राचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २००९मध्ये ४०.९७ टक्के व सेवा क्षेत्राचा ४८.८४ टक्के होता; २०१९ रोजी हाच वाटा अनुक्रमे ३७.४२ टक्के आणि ५४.१७ टक्के झाल्याचे दिसून येते (statista.com). थायलंडच्या अर्थव्यवस्थेतील औद्योगिक क्षेत्राचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २००९मध्ये ३८.६१ टक्के व सेवा क्षेत्राचा ५१.०६ टक्के होता; जो २०१९मध्ये अनुक्रमे ३३.०४ टक्के व ५८.५९ टक्के झाला आहे (statista.com). अशा पार्श्वभूमीवर विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेतील या प्रत्येक क्षेत्राचा विकास कसा झाला आहे, त्यातील अडचणी काय आहेत हे समजून घेणे संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक ठरते.

औद्योगिक क्षेत्राच्या विकासाने जगाच्या विकासात ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर आज सेवा क्षेत्राचा बोलबाला असताना औद्योगिक क्षेत्रात काय घडामोडी होत आहेत हे पाहणे महत्त्वाचे ठरते. तसेच विकसनशील देशांच्या भांडवल कमतरता आणि सामाजिक – आर्थिक विषमतेच्या परिस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन, निर्यात, रोजगार यासंदर्भात लघुउद्योगांची भूमिका महत्त्वाची ठरते असे अनेक अभ्यास नमूद करतात. जसे, पाकिस्तान स्वतंत्र झाल्यानंतर त्यांच्या १९५५–६०मधील पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या दस्तैवजामध्ये लघुउद्योगांचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले आहे, Small industry has specific contributions to make to economic development. In the first place, it can

contribute to the output of needed goods without requiring the organisations of large new enterprises or the use of much foreign exchange to finance the import of the new equipment. Secondly, it can provide opportunities for employment beyond the narrow boundaries of urban centres. Finally, as history shows, it can perform an important function in promoting growth, providing training ground for management and labour and spreading industrial knowledge over the wide areas. (Malik, and others 1986, P. 789). कमी अधिक फरकाने सर्वच विकसनशील देशांच्या लघुउद्योगांबाबत पाकिस्तानसारखीच परिस्थिती आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील लघुउद्योगांचे महत्त्व म्हणून राजेश कुमार शास्त्री सांगतात इथे एक कोटी अठ्ठावीस लाख लघुउद्योगांच्या युनिट्समधून तीन कोटी दहा लाख रोजगार तयार झाला आहे; शिवाय आठ हजार विविध वस्तूंचे उत्पादन करून हे क्षेत्र निर्यातीतील ३५ टक्के वाटा उचलते (Rajesh Kumar Shastri and Others 2011, P. 81).

भारताची निर्यात १९३८ साली जागतिक निर्यातीच्या ४.५ टक्के होती जी १९९०पर्यंत येता येता ०.५ टक्के झाली. १९८७च्या सुमारास भारताच्या निर्यातीमध्ये परंपरागत कच्चा माल व शेतीमालाचा (३७ टक्के) प्रमुख वाटा होता. इंजिनिअरींग उद्योगाचा निर्यातीतील वाटा फक्त ८.५ टक्के होता. उर्वरित निर्यातीतील सर्व वाटा हा कापड, तयार कपडे, चामड्याच्या वस्तू, जडजवाहीर इत्यादी वस्तूंचा होता; आणि यांचे उत्पादन लघुउद्योगांच्या माध्यमातून होत होते. म्हणजेच निर्यातीतील सर्वाधिक वाटा हा येथील लघुउद्योगांचा होता (ब्रम्हे, व इतर १९९२). पार्थ प्रितम साहू (२००५) आपल्या भारतातील रोजगारासंबंधी संशोधनात

सांगतात की, असंघटित क्षेत्रातील असंख्य सूक्ष्म, लहान लघु उद्योग हे रोजगार निर्मितीचे चांगले स्त्रोत आहेत. वर्षाला दहा लाख रोजगार निर्माण करण्याची क्षमता ह्या उद्योगांमध्ये आहे. म्हणूनच असंघटित क्षेत्रातील हे उद्योग देशाच्या रोजगार निर्मितीच्या धोरणात महत्त्वाची भूमिका निभावतात (Thorat and others 2005). बाराव्या पंचवार्षिक नियोजनामध्ये (२०१२–२०१७) सरकारने दिलेल्या आकडेवारीनुसार, सूक्ष्म, लघु, मध्यम क्षेत्रातील ९४ टक्क्यांपेक्षा अधिक उद्योग हे अनोंदणीकृत आहेत (MSME Gov.in, P. 89). म्हणूनच अशा लघुउद्योगांच्या बाबतीत सरकारचे धोरण कशा प्रकारचे राहिले आहे हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

भारतात विशेषतः नव उदारमतवादाच्या काळात वाढत्या सेवा क्षेत्राच्या प्रभावामध्ये औद्योगिक क्षेत्र मागे पडत चालल्याचे तथ्य अनेक संशोधन निबंधातून तसेच विविध शासकीय अहवालांमधूनही समोर येते. स्वाती मेहता आपल्या संशोधन निबंधात संदर्भांच्या आधारे स्पष्ट करतात की, भारतात १९८० ते २००२ दरम्यान एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील औद्योगिक क्षेत्राचा वाटा १६ टक्के राहिला आहे (Mehata, 2011, P. 61). धनमंजिरी साठे एका संशोधनात सांगतात की, वस्तुनिर्माण (Manufacturing) क्षेत्राचा वास्तव वृद्धी दर १९९५–९६मध्ये १४.९ टक्के होता, जो १९९६–९७मध्ये ९.७% झाला; तसेच २०००–०१च्या भारतीय आर्थिक सर्वेक्षणानुसार हा वृद्धी दर ६.४ टक्के झाला (Sathe, 2002, P. 2990).

रोजगार निर्मितीमध्ये ग्रामीण आणि लघु उद्योगांचे योगदान

भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून दिसून येत आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण आणि निमशहरी भागात दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी सुशिक्षित तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे (Planning Commission, 1985-1990). म्हणूनच रोजगार निर्मिती करून दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी सरकारने लघु उद्योगांना प्रोत्साहन देऊन ग्रामीण भागातील बिगर शेती क्षेत्रावर आणि शहरातील असंघटित क्षेत्रावर आपले लक्ष केंद्रित करायला हवे असे नांजुन्दन म्हणतात (१९९६, P. १९१). परंतु नव्या आर्थिक धोरणाची पायाभरणी होताना त्या पंचवीस वर्षांच्या कालखंडात अर्थव्यवस्थेतील असंघटित क्षेत्र जवळपास ९० टक्क्यांनी वाढले. ग्रामीण भागातील शेती क्षेत्राची पण दुर्दशा झाली. शेतीवरील संकटांमुळे देशातील लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. लघुउद्योगांच्या बाबतीत निर्णय घेण्यासंदर्भात असलेले केंद्रीकरण हा पण धोरणाची अंमलबजावणी होण्यातील मोठा अडसर आहे असे नांजुन्दन म्हणतात (१९९४). तसेच औद्योगिक क्षेत्रातील माहितीचा अभाव हीदेखील ह्या क्षेत्रातील मोठी त्रुटी आहे. विशिष्ट आर्थिक वर्षात किती औद्योगिक युनिट्स बंद पडले, ते बंद पडण्यामागील काय कारणे आहेत, लघुउद्योगांच्या संदर्भातील ही प्राथमिक माहिती सहज उपलब्धच होत नाही.

**लघुउद्योग आणि विकसित – विकसनशील देश**

लघु उद्योग आणि लवचीक वस्तूनिर्माण पद्धती (Flexible manufacturing system-FS) यावर संशोधन करणारे हुबर्ट स्मिटझ

हे एक महत्त्वाचे संशोधक मानले जातात. यांनी लघु-उद्योगांच्या बाबतीत घानामधील कुमसी येथील लघु उद्योगांचा विशेषत्वाने उल्लेख केला आहे. येथील छोटे उद्योग हे अवघड परिस्थितीत समस्यांवर लगेच उत्तर शोधणे, नवनिर्मिती करणे आणि सामूहिक तत्परता असलेले म्हणून त्यांची क्षमता नावाजली जाते असे हुबर्ट स्मिटझ यांनी म्हटले आहे. त्यांनी काही आफ्रिकन, आशियाई आणि लॅटीन अमेरिकन देशांचा अभ्यास करून लघु उद्योगांसंदर्भात खालील निरीक्षणे मांडली आहेत -

विकसित देशांपेक्षा विकसनशील देशांमध्ये स्पर्धात्मकता टिकवण्यासाठी विघटनकारी (disruptive) परिणामांना सामोरे जाण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात हवी असते.

विविध क्षेत्रात असलेले लघुउद्योगांचे समूह सामूहिक तत्परता आणि लवचीकतेच्या माध्यमातून अडचणीतून मार्ग काढण्याची त्यांची क्षमता वाढवू शकतात.

विकसनशील देशांमध्ये लघुउद्योगांच्या समूहात नवे बदल त्वरीत स्वीकारण्याची तसेच नवनिर्मिती करण्यासाठीचे प्रयत्न होताना दिसत नाहीत. सार्वजनिक धोरणांच्या माध्यमातून सामूहिक तत्परता कशी वाढवता येईल हा एक प्रश्न ह्या देशांसमोर आहेच (Nanjundan, 1994, P. M²-48).

यावरून हे लक्षात येते की, आकाराने लहान मोठ्या असलेल्या कोणत्याही व्यवसायाच्या वाढीसाठी स्पर्धेला सामोरे जाण्याची क्षमता, आपापसातील समूह सामूहिक तत्परता, उत्पादन पद्धतीतील लवचीकता आणि नवनिर्मिती करण्याची क्षमता ही परिस्थिती आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेत असे वातावरण तयार

होणे हे देशाच्या सामाजिक आणि खाजगी धोरणांवर अवलंबून असते.

जगभरातच तंत्रज्ञान, व्यवस्थापनाच्या पद्धती आणि सेवा क्षेत्राची वाढती भूमिका यांमुळे लघु उद्योग क्षेत्राला पुनरुज्जीवन मिळाले आहे. विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्पर्धा, उत्पादकता आणि तत्परता यांमुळे लघु आणि मध्यम उद्योग महत्त्वाची भूमिका निभावतील असेही काही अभ्यास सांगतात. जसे, वस्तुनिर्माण क्षेत्रातील वाढती स्पर्धा, आधुनिक तंत्रज्ञान आणि तत्परता यांच्यासाठी माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीने मोलाची भर टाकली. त्यामुळे वस्तूनिर्माण क्षेत्रात उपभोक्त्यांना सेवा देण्यासाठी, उत्पादनाची विक्री करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने ह्या क्षेत्रातील व्यवहारांना गती मिळाली आहे. थोडक्यात वस्तूनिर्माण क्षेत्रात सेवा देणाऱ्या रोजगाराची पण भर पडली (Das, Deb and others 2013). इटलीमधील लघुउद्योगांमध्ये आधुनिक इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशनच्या माध्यमातून विविध औद्योगिक जिल्हे तत्काळ जोडले गेले. संगणकाच्या मार्फत होणाऱ्या व्यवहारांतून निर्यातीला चालना मिळाली (Nanjundan, 1994).

**स्वातंत्र्योत्तर भारतातील वस्तूनिर्माण क्षेत्राचा गोषवारा**

स्वातंत्र्योत्तर भारताने विकासाचे नियोजनबद्ध प्रारूप स्विकारले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये विकास प्रारूपाचे तीन पर्याय भारतासमोर होते. प्रथम शेतीचा विकास करायचा हा एक पर्याय. दुसरा म्हणजे औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला प्रथम

प्राधान्य देणे. त्यातही, औद्योगिकीकरणाचे प्रातिनिधिक क्षेत्र म्हणून कापड उद्योगाकडे अधिक लक्ष देणे. तर तिसरा पर्याय आधी औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देणे; परंतु औद्योगिकीकरणाचे प्रातिनिधिक क्षेत्र म्हणून भांडवली वस्तूंच्या उत्पादनाकडे अधिक लक्ष देणे. वरीलपैकी तिसरा पर्याय भारताच्या विकासासाठी निवडला गेला. त्यावेळी सार्वजनिक क्षेत्राचा विकास आणि सार्वजनिक उद्योगांसाठी तांत्रिक मदत तेव्हाच्या सोवियत युनियनकडून घेण्यात आली. त्याचवेळी खाजगी क्षेत्रातील उद्योगांनी भांडवलासाठी अमेरिका आणि युरोपची मदत घेतली (Kulkarni, 2011).

याचा परिणाम असा झाला की, वस्तूनिर्माण क्षेत्रात १९४८ साली २८ टक्के परकीय भांडवल होते ते १९६१मध्ये ३८ टक्के झाले. वस्तूनिर्माण क्षेत्रात कापड उद्योग, विद्युत उपकरणे व यंत्र सामुग्री यांची स्थिती सापेक्षरित्या स्थिर राहिली. परंतु अन्न, वाहतूकीची साधने, यंत्रे आणि यंत्रांची साधने (Tools) धातू आणि धातूची उत्पादने आणि रासायनिक व तत्संबंधित उत्पादनांमधील प्रगती सापेक्षरित्या मोठ्या प्रमाणात झाली. मात्र, अनियंत्रित नफा मिळविणारे उद्योग जसे, नवीन टेक्नॉलॉजीकल कॉम्प्लेक्स आणि पेटंट संरक्षित उद्योग, यंत्रे निर्मिती सारखे तंत्रज्ञान केंद्रित उद्योग हे परकीय कंपन्यांच्या नियंत्रणात राहिले.

थोडक्यात आपल्या वस्तूनिर्माण क्षेत्राचा मूळ गाभा हा आयातीवर अवलंबून होता. वस्तुनिर्माण करणाऱ्या मोठ्या आस्थापनांचे (Large Scale Industry) उत्पादन हे त्यांनी आयात केलेल्या कच्च्या मालाची जोडणी (Assembly) करणे हे होते.

ह्या कामासाठी भारत सरकार ह्या मोठ्या आस्थापनांना अनुदान देत होते. मोठ्या उद्योगांना सहाय्यक ठरणारे असंख्य छोटे छोटे उद्योग त्या सुमारास वाढले जे पूर्णपणे ह्या मोठ्या आस्थापनांवर अवलंबून होते (Nanjundan, 1996).

१९४८ ते १९६१च्या दरम्यान काही परकीय कंपन्यांनी (उदा. युनी लिव्हर (भारतात हिंदुस्थान लिव्हर) वगैरे) भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाची जागा घेतली होती. हिंदुस्थान लिव्हर सारखी बहुराष्ट्रीय कंपनी येथे उत्पादनाचे काम करण्याऐवजी व्यापार करण्याचे काम करूनच त्यांचा नफा मिळवत होती असेही निदर्शनास आले आहे (ब्रम्हे, व इतर १९९२). भारतातील परकीय भांडवल गुंतवणुकीतील वाढ ही १९६६मध्ये झाली. जेव्हा जागतिक बँकेच्या दबावाखाली भारत सरकारने आपल्या गुंतवणुकीचे निकष बदलले, रुपयाचे अवमूल्यन केले आणि परकीय भांडवलाला भारतीय संरक्षित उद्योगात गुंतवणुकीला परवानगी दिली. १९८०नंतर परकीय भांडवलाने भारतीय उद्योगांत फायदेशीर असणाऱ्या ग्राहकोपयोगी विद्युत उपकरणाच्या उत्पादनातही (टी.व्ही., संगणक) प्रवेश केला.

१९८५पर्यंत भारतात बहुराष्ट्रीय कंपन्या आणि काही बड्या भारतीय कंपन्यांना काही उद्योगांमध्ये प्रवेश करण्यास मनाई होती. त्यावेळी लघुउद्योगांसाठी ती विशिष्ट क्षेत्रे राखीव ठेवून त्यांना संरक्षण दिले जात होते. परंतु, राजीव गांधींनी लघुउद्योगांना असलेले हे संरक्षण काढून घेण्यास सुरुवात केली आणि नंतरच्या सरकारांनी या क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त प्रवेश दिला. त्यामुळे अनेक लघुउद्योग बंद पडले (ब्रम्हे, व इतर १९९२).

या सगळ्याचे विघातक सामाजिक परिणाम भारतीय समाजाला भोगावे लागले. थोडक्यात भारताच्या औद्योगिक क्षेत्राचा विकास बाजूला राहून भारताने १९९१पर्यंत व्यापार हे अर्थव्यवस्थेच्या वाढीचे इंजिन बनवण्यापर्यंत प्रवास केला.

## भारतातील पंचवार्षिक योजना, औद्योगिक धोरण आणि लघुउद्योग

१९५० सालच्या मध्यापासून लघुउद्योगांच्या विकासासाठीचा कार्यक्रम राबवला गेला. ह्या कार्यक्रमाचा परिणाम म्हणून १९७०पर्यंत हे लघु उद्योग क्षेत्र परवानाधारक मक्तेदारी असलेल्या मोठ्या उद्योगांच्या स्पर्धेचा भाग बनले. ह्या परवानाधारक मक्तेदारी उद्योगांकडे दुर्मिळ आयातीत कच्चा माल, उपकरणे आणि आर्थिक संसाधने होती. तांत्रिक शिक्षणाची पार्श्वभूमी असणाऱ्या उद्योजकांनी इलेक्ट्रॉनिकस, संगणक, रसायने, अभियांत्रिकी, अन्न प्रक्रिया उद्योग वगैरे सारखे उद्योग स्थापन केले. अशा उद्योगांत तंत्रज्ञानावर आधारित, कौशल्य वाढविणारे आणि ज्ञाननिर्मिती करणाऱ्या उत्पादनाची प्रक्रिया यशस्वी ठरली. परंतु अशा प्रकारचे नवनिर्मिती वर आधारित उत्पादन करणारे ग्रामीण भागातील उद्योग भांडवलाअभावी बंद पडले. परिणामी ग्रामीण असंघटित बिगर शेती उद्योगात काम करणाऱ्या असंख्य कामगारांना, उद्योजकांना भांडवला अभावी शहरी असंघटित क्षेत्राचा भाग बनावे लागले. शहरात आल्यावर ह्या उद्योजकांना शहरी परवानाधारक मोठ्या आस्थापनांशी स्पर्धा करावी लागली. त्यामुळे लघुउद्योगांमधून स्वतंत्र नवनिर्मितीच्या (सृजनशील

उत्पादन) जोरावर होणारे उत्पादन बंद पडले (Nanjundan, 1996). आणि ह्या शहरात स्थलांतरित झालेल्या छोट्या उद्योजकांनी मोठ्या कंपन्यांचे सेकंड किंवा थर्ड पार्टी म्हणून काम करणे स्वीकारले. परिणामी हे स्वतंत्र असलेले लघुउद्योजक शहरातील मोठ्या आस्थापनांवर अवलंबून राहिले. ग्रामीण भागातून आलेले असंख्य लोक मोठ्या आस्थापनांमधून कामगार म्हणून काम करू लागले. साहजिकच त्याने मोठ्या आस्थापनांचे महत्त्व अर्थव्यवस्थेत वाढू लागले आणि सरकारचे लक्ष पण तिकडे वेधले गेले आणि औद्योगिक धोरणात त्याप्रमाणे बदल होऊ लागले. थोडक्यात सरकारच्या औद्योगिक धोरणाची पकड ही लघु उद्योगांवरून मोठ्या उद्योगांकडे जात राहिली.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत (१९५१-५६) भारत सरकारने ग्रामीण आणि लघु उद्योगांच्या विकासावर भर दिला. लघुउद्योगांच्या विकासासाठी त्यांना सल्ला देणारे, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या विविध मंडळांची स्थापना करण्याची शिफारस केली. १९५४ साली केंद्रीय लघुउद्योग संस्था (Central Small Industries Organization) आणि लघुउद्योग मंडळ (Small Scale Industries Board) स्थापन करण्यात आले. ह्या लघुउद्योग मंडळाने १९५५मध्ये लघुउद्योगांची व्याख्या बनविण्याचे काम केले. त्यांच्या व्याख्येनुसार, ज्या उद्योगांची भांडवली मत्ता पाच लाखापेक्षा कमी आहे आणि ज्यांच्याकडे विजेच्या वापराशिवाय शंभर लोक काम करतात अशा औद्योगिक युनिटला लघुउद्योग म्हणावे (Gumma, 2009).

दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-१९६१) मूलभूत आणि

अवजड उद्योगांच्या विकासाला महत्त्व देते. ग्रामीण आणि लघु उद्योगांच्या विकासासाठी या योजनेत १८७ कोटी रुपयांची तरतूद केली गेली. औद्योगिक आस्थापने (Industrial estates) आणि कर्वे समितीची स्थापना हे ह्या योजनेचेच फलित होय. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली १९५५मध्ये समितीची स्थापना झाली. कर्वे समितीने केलेल्या शिफारशी - १. काही उत्पादने ही फक्त ग्रामीण आणि लघु उद्योगांसाठी राखीव ठेवावीत. २. मोठ्या उद्योगांच्या विस्तार क्षमतेवर मर्यादा ठेवायला हवी. ३. कच्चा माल पुरवठ्याचे व्यवस्थापन करावे.

ह्या समितीने उद्योगांची रचना पिरॅमिडसारखी ठेवण्यावर भर दिला होता. ह्या पिरॅमिडचा पाया ग्रामीण अर्थव्यवस्थेतील लघु उद्योग तसेच शेती आणि संबंधित सेवा यांवर आधारित होता. शिवाय ह्या अर्थव्यवस्थेचा विस्तार भारतातील सर्व छोटी-मोठी गावे आणि छोट्या शहरांनी व्यापलेला होता (Gumma, 2009).

दुसऱ्या महायुद्धापूर्वी महामंदीतून बाहेर पडण्यासाठी विशेषतः इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये केलेल्या उपायांमधून प्रेरणा घेऊन १९६० च्या दशकात भारतात लघु-उद्योगांच्या विकासाची लाट आली होती. औद्योगिक वसाहती, वित्तीय पुरवठा आणि औद्योगिक सेवांचा विस्तार ह्या त्रयींच्या मार्फत इंग्लंडमध्ये औद्योगिक वसाहतींचा विस्तार झाला. तसेच अमेरिकेमध्ये छोटे व्यवसाय व्यवस्थापन जसे, सरकारमार्फत खरेदीला प्राधान्य, उप-कंत्राटीकरण आणि छोट्या उद्योगांना सवलतीच्या दराने कर्जाची उपलब्धता यांच्या मार्फत लघु उद्योगांच्या विकासाला चालना मिळाली.

१९६०मध्ये लघुउद्योगांच्या व्याख्येत पुन्हा बदल झाले. आता लघुउद्योग कोणता हे ठरविण्यासाठी कामगारांच्या संख्येऐवजी भांडवल गुंतवणुकीची मर्यादा महत्त्वाची मानली गेली. ह्या परिभाषेनुसार एका लघुउद्योगात अनेक कामगार काम करू शकतात. त्यामुळे लघुउद्योग क्षेत्र हे संपूर्ण अर्थव्यवस्थेत कामगारप्रधान क्षेत्र बनले (Nanjundan, 1994).

जानेवारी १९६० ते डिसेंबर १९७७ या कालावधीमध्ये ॲन्सिलरी युनिट ही एक नवी संकल्पना तयार केली गेली. ॲन्सिलरी युनिट म्हणजे असा व्यवसाय, जो विशिष्ट उद्योगांसाठी आवश्यक वस्तूंचे उत्पादन करेल. त्यासाठी आवश्यक असलेल्या उच्च गुंतवणुकीची मर्यादा ठरविण्यासाठी विशेष तरतुदीची गरज निर्माण झाली.

तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१-१९६६) आणि चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९६९-१९७४) लघुउद्योगांची स्पर्धात्मक क्षमता वाढविण्यासाठी उत्पादनाच्या आधुनिक तंत्रज्ञान वापरावर भर दिला गेला. त्यांच्या उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर करण्यासाठी प्रयत्न केले गेले.

१९६६मध्ये लघुउद्योगांची व्याख्या पुन्हा बदलली. ह्या बदलाचे प्रमुख कारण तंत्रज्ञान होते. लघुउद्योगांची स्पर्धात्मक क्षमता वाढविण्यासाठी त्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाने अवगत होणे आवश्यक आहे असे मानले गेले. म्हणून त्यांच्या गुंतवणुकीची वरची मर्यादा आणखी वाढवली गेली. ह्या आकलनानुसार, ज्या औद्योगिक युनिट मधील सर्व मूलभूत गुंतवणूक (जागा, यंत्रे धरून) ही साडेसात लाखांपेक्षा जास्त नसेल असे ठरवले गेले.

त्याचवेळी 'ॲन्सिलरी युनिट'साठीची ही गुंतवणुकीची मर्यादा दहा लाख ठरवण्यात आली.

जुलै १९६७ साली सुबिमल दत्त यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील औद्योगिक परवाना धोरण चौकशी समिती बनविण्यात आली होती. भारतात परवाना पद्धती प्रत्यक्षात कशी कार्यरत आहे हे समजून घेण्याच्या उद्देशाने या समितीचे गठन झाले होते. जुलै १९६९ रोजी या समितीने आपला अहवाल सादर केला. हा अहवाल सांगतो की, परवाना अधिकाऱ्यांनी १९५६ सालच्या औद्योगिक धोरणात परवाना पद्धतीचे जे उद्दिष्ट होते त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. १९५६च्या औद्योगिक धोरणात सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव असलेली उत्पादने कालांतराने खाजगी क्षेत्रासाठी खुली झाली. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, गुजरात आणि तामिळनाडू या राज्यांमधून एकूण ६२% औद्योगिक परवाने वितरीत केले गेले. त्यामुळे औद्योगिकदृष्ट्या मागास राज्ये दुर्लक्षित राहिली. तसेच परकीय सहकार्याने उत्पादन करण्यासाठी परवानगी असलेल्या उत्पादनात अत्यावश्यक वस्तूंच्या ऐवजी अनावश्यक उपभोग्य वस्तूंना महत्त्व दिले गेले. सारांशात, औद्योगिक परवाना पद्धती नियोजित आर्थिक विकासाचे उदिष्ट पूर्ण करण्यात अपयशी ठरली. परिणामी सर्व आर्थिक ताकद काही उद्योजकांच्या हाती एकवटली गेली असे हा अहवाल नमूद करतो. समितीने तिचे निरीक्षण नोंदवताना म्हटले आहे की, परवाना देताना सार्वजनिक की खाजगी असा पर्याय समोर आला तेव्हा परवाना अधिकाऱ्यांनी महत्त्वाच्या ठिकाणी खाजगी क्षेत्राची निवड केली. त्यामुळे परवाना पद्धती औद्योगिक

विकासासाठी नकारात्मक साधन ठरल्याचे तथ्य समितीने अहवालात मांडले आहे (Datta, Ruddar and others 2009 P. 201). या अहवालाच्या पार्श्वभूमीवर पुढील पंचवार्षिक नियोजन आणि बदलत्या औद्योगिक धोरणाचा लघुउद्योगांवर काय परिणाम झाला याकडे चिकित्सकपणे बघणे आवश्यक ठरते.

पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या (१९७४-१९७८) कालावधीत मे १९७८मध्ये लघुउद्योगांसाठी राखीव असलेल्या वस्तूंच्या यादीत वाढ करून एकूण ८०७ वस्तूंचे उत्पादन राखीव करण्यात आले. नियोजन आयोगाने सहाय्यक उद्योगांच्या विकासासाठी सखोल कार्यक्रम सुरू केला. ज्यायोगे हे सहाय्यक उद्योग मोठ्या उद्योगांचे पुरवठादार बनतील. ह्या योजनेत औद्योगिक उत्पादनाला चालना देण्यासाठी खाजगी क्षेत्रावरील निर्बंध कायम ठेवले, एकाधिकारशाही उपक्रम आणि भारतीय उद्योगांतील गुंतवणुकीच्या शोधात असलेल्या परकीय भांडवलावरही नियंत्रण ठेवले (Gumma, 2009).

१९७४ साली लघुउद्योगांमधील गुंतवणुकीची मर्यादा वाढवून दहा लाख करण्यात आली. त्याचवेळी 'ॲन्सिलरी युनिट'साठीची ही गुंतवणुकीची मर्यादा पंधरा लाख झाली. लघुउद्योग मंडळाने लघुउद्योगाची व्याख्या करण्यासाठी एका उपसमिती नेमली होती. ह्या समितीने लहान उद्योगांना सामावून घेण्याच्या उद्देशाने केलेल्या शिफारशीनुसार ज्या युनिटमधील भांडवली मत्ता ही पाच लाख ते दहा लाखांपर्यंत असेल त्यांना लघुउद्योग म्हणावे असे सुचविले.

त्यानुसार १९७७ साली औद्योगिक धोरण ठरावाने (Industrial Policy Resolution) लघुउद्योगांमध्ये 'लघु क्षेत्र' (Tiny

Sector) या नवीन क्षेत्राची भर घातली. 'लघु क्षेत्र' म्हणजे, ग्रामीण भागात आणि छोट्या शहरात असलेले असे सर्व उद्योग ज्यांची मूलभूत यंत्रे वगैरे धरून गुंतवणूक एक लाख असेल, अशा सर्व उद्योगांचा समावेश ह्या लघु क्षेत्रात होईल.

सहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत (१९८०-१९८५) ९०% उद्योग हे लघु क्षेत्र या श्रेणीच्या अंतर्गत येणारे होते (Planning Commission). याच काळात औद्योगिक धोरणाच्या उदारीकरणांतर्गत मोठ्या उद्योगांच्या फायद्यासाठी परवाना धोरण शिथिल केले गेले. त्यांना परकीय चलन नियंत्रण कायदा आणि मक्तेदारी नियंत्रण कायद्यातून सवलती देण्यात आल्या. त्याचवेळी लघु उद्योगांची गुंतवणुकीची वरील मर्यादा वीस लाखांपर्यंत वाढवत नेली आणि 'ॲन्सिलरी युनिट'साठीची ही गुंतवणूक मर्यादा पंचवीस लाख ठरवण्यात आली. १९८५मध्ये पुन्हा यात बदल करून लघु उद्योगांची गुंतवणूक मर्यादा ३५ लाख आणि 'ॲन्सिलरी युनिट' साठीची ही गुंतवणूक मर्यादा ४० लाख करण्यात आली (Datta, Ruddar and others 2009).

सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९८५-१९९०) औद्योगिक उत्पादनाच्या वाढीस चालना देण्यासाठी पायाभूत अडचणी कमी करण्याचे ठरवले. औद्योगिक परवाना धोरणाचे उदारीकरण केले गेले, इलेक्ट्रॉनिक क्षेत्राचा वेगाने विकास करण्यासाठी आवश्यक प्रोत्साहन देण्यासाठी काही तरतुदी करण्यात आल्या. थोडक्यात सहाव्या व सातव्या योजनेच्या काळात जे औद्योगिक धोरण बनले त्याने सर्व उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे परवाना क्षमतेपेक्षा जास्त उत्पादनक्षमता वाढविण्यास प्रोत्साहन दिले.

अर्थातच मोठ्या उद्योगांनी या उदारीकरणाचे स्वागतच केले (Datta, Ruddar and others 2009 P. 200).

१९९१ साली भारताने नवीन आर्थिक धोरणाच्या अनुषंगाने औद्योगिक धोरण हे औद्योगिक परवाने, परकीय गुंतवणूक, परकीय तंत्रज्ञान धोरण, सार्वजनिक धोरण आणि मक्तेदारी नियंत्रण कायदा यांना केंद्रस्थानी ठेवून बनवले. त्यावेळी, लघु उद्योगांची गुंतवणुकीची वरील मर्यादा ६० लाखांपर्यंत वाढवत नेली आणि ॲन्सिलरी युनिट साठीची ही गुंतवणूक मर्यादा ७५ लाख ठरवण्यात आली. याच काळात निर्यातीचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व वाढत गेले. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात 'निर्यातभिमुख उद्योग' अशी एक नवी श्रेणी तयार झाली. उद्योगाच्या स्थापनेपासून तीन वर्षांपर्यंत ज्या उद्योगांची निर्यात त्यांच्या वार्षिक उत्पादनाच्या तीस टक्क्यांनी वाढली असेल अशा लघुउद्योगांसाठी मूलभूत सुविधा आणि यंत्रे धरून गुंतवणुकीची मर्यादा ७५ लाख रुपये असेल असे ठरले (Gumma, 2009).

आर्थिक उदारीकरणाच्या सुरुवातीच्या काळातील आठव्या पंचवार्षिक योजनेत (१९९२-१९९७) असा विश्वास वाटत होता की, विविध क्षेत्रातील वाढ ही आयात-निर्यात आणि परवाना पद्धतीवरील निर्बंधांपेक्षा औद्योगिक व्यापार, राजकोषीय धोरणं आणि करपद्धतीत बदल केल्याने होऊ शकते. त्यामुळेच जुलै १९९१च्या औद्योगिक धोरणामध्ये सार्वजनिक क्षेत्रावर टीका केली आहे. ह्या धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्राची कामगिरी अतिशय वाईट होती तर वाढीची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवण्यासाठी आवश्यक संसाधनांची निर्मिती करण्यास सार्वजनिक

क्षेत्र अक्षम ठरले त्याचवेळी खाजगी क्षेत्र मात्र चांगली कामगिरी करून अर्थव्यवस्थेत भर घालत आहे असे म्हटले गेले. उदारीकरणाचा नवीन दृष्टिकोन उद्योगांच्या स्पर्धेवर विश्वास ठेवून त्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे तत्त्वज्ञान मांडत होता.

१९९६मध्ये औद्योगिक मंत्री असलेल्या करुणाकरन यांनी लघु उद्योगांमधील गुंतवणुकीची मर्यादा साठ लाखांपासून तीन कोटींपर्यंत वाढवली. सतत वाढत जाणारी लघुउद्योगांच्या गुंतवणुकीची मर्यादा ही भांडवलप्रधान उद्योगांना अधिक फायद्याची ठरली. अशा भांडवलप्रधान उद्योगांना बँकांकडून कर्जाचे फायदे आधीपासूनच मिळत होते. त्यामुळे साहजिकच लघुउद्योगात गुंतवणूक असलेल्या अनेक गरजू उद्योजकांना कर्ज आणि सरकारी अनुदानाच्या लाभापासून वंचित राहावे लागले (Nanjundan, 1996).

नवव्या पंचवार्षिक योजनेनुसार (१९९७-२००२) ज्या सार्वजनिक उद्योगांचे पुनरुज्जीवन होऊ शकत नाही ते उद्योग बंद करण्याच्या दिशेने पावले उचलली गेली. लघुउद्योगांमधील तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण करून आणि ह्या क्षेत्राला कर्जपुरवठ्याची खात्री देऊन त्याची उत्पादकता आणि उत्पादन वाढविण्यावर भर देण्यासाठी ही योजना प्रोत्साहन देते. लघुउद्योगांना प्रशिक्षण देण्याची सुविधा देणे, कौशल्यात वाढ करणे, साधनांचा विकास करणे, एकमेकांवर आधारित छोट्या उद्योगांची उत्पादकता, उत्पादन आणि उत्पन्न पातळी वाढविण्यासाठी उत्पादनाची उपकरणे आणि उत्पादनाचे तंत्रज्ञान सुधारणे याबरोबरच ह्या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध प्रकारचे कौशल्य असणाऱ्या कामगारांच्या

उत्पन्नातही वाढ होईल ह्या हेतूने लघुउद्योगांच्या ह्या असंघटित क्षेत्रात क्लस्टर दृष्टिकोनाचा स्वीकार करण्यात आला.

अबीद हुसेन समितीच्या शिफारशीनुसार १९९७ साली भारत सरकारने लघुउद्योग आणि ॲन्सिलरी युनिटसाठीची मूलभूत सुविधा आणि यंत्रे धरून गुंतवणुकीची मर्यादा तीन कोटी रुपयांपर्यंत वाढविली. त्याच सुमारास लघु क्षेत्रासाठी ही मर्यादा पाच लाख रुपये करण्यात आली (Gumma, 2009).

दहाव्या पंचवार्षिक योजनेत (२००२-२००७) अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ८% करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. त्यासाठी औद्योगिक क्षेत्राच्या वाढीचा दर १० टक्क्यांपेक्षा जास्त असणे गरजेचे होते. पण अशा परिस्थितीत एक विरोधाभास होता. तो म्हणजे, १ एप्रिल २००१ पासून देशांतर्गत बाजारावर असलेले निर्बंध सैल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. परिणामी थेट परकीय गुंतवणुकीत वाढ होणार. त्यामुळे भारतीय उद्योगांना आपल्याच बाजारपेठेत आंतरराष्ट्रीय उत्पादनाशी स्पर्धा करावी लागणार. सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी झाल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापने/उद्योग हे निर्गुंतवणुकीच्या माध्यमातून खाजगी व्यवस्थापनाच्या नियंत्रणात आले. थोडक्यात, आंतरराष्ट्रीय वाटाघाटीसाठी ही सर्व प्रक्रिया एक महत्त्वाचा धोरणात्मक बदल ठरली. ह्या पार्श्वभूमीवर लघुउद्योगांना पाठिंबा देणारे धोरण बनविण्याचा प्रयत्न दहाव्या पंचवार्षिक योजनेत केला गेला; जसे की त्यांना वित्तीय सहाय्य मिळावे यासाठी बँकांना प्रोत्साहन देण्यात आले. १६ जून २००६पासून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा कार्यान्वित झाला. ह्या

कायद्यामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना तीन स्तरांवर परिभाषित करणारी एक कायदेशीर चौकट मिळाली. त्यानुसार, वस्तूनिर्माण क्षेत्रातील उद्योग ज्यांची जागा आणि तंत्रज्ञानावरील गुंतवणूक २५ लाख रुपयांपर्यंत आहे त्यांना सूक्ष्म उद्योग संबोधण्यात येईल. ज्या उद्योगांची जागा आणि तंत्रज्ञानावरील गुंतवणूक ५ कोटी रुपयांपर्यंत आहे त्यांना लघु उद्योग संबोधण्यात आले. तसेच ज्या उद्योगांची जागा आणि तंत्रज्ञानावरील गुंतवणूक १० कोटी रुपयांपर्यंत आहे त्यांना मध्यम उद्योग संबोधण्यात आले.

बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (२०१२-२०१७) पंतप्रधानांच्या एका कार्यकारी समितीने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रासाठीचे धोरण अधिक उदारवादी करण्याच्या दृष्टीने काही शिफारशी केल्या. जसे, दिवाळखोरीचा कायदा (Insolvency Act) करणे, कामगार कायद्यांचे उदारीकरण करणे, प्रशिक्षणार्थी (Apprenticeship) कायद्याचे उदारीकरण करणे. जिल्हा उद्योग केंद्र अधिक सक्षम बनविणे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राची वाढ करण्यासाठी ह्या क्षेत्रातील पर्यावरणाच्या दृष्टीने असलेली नियंत्रणे शिथिल करणे. कामगार कायदे उद्योजकांसाठी (वापरकर्त्यांसाठी) अधिक अनुकूल बनवणे. तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील सूक्ष्म आणि लघुउद्योगांची उत्पादकता व स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी कार्यक्रम बनवणे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा कायदा बनवणे. या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे धोरण सरकारने स्वीकारले (MSME Gov.in, P. 88).

मार्च २०२०पासून जगभरात कोरोना महामारीने थैमान घातले. त्यावरील नियंत्रणाचा भाग म्हणून भारतात जवळपास दोन महिने देशभरात टाळेबंदीचा निर्णय झाला; आणि नंतरही राज्यांच्या पातळीवर तो चालूच राहिला. परिणामी असंख्य लघुउद्योग बंद पडले. लाखो कामगार बेरोजगार झाले. अशा परिस्थितीत १ जुलै २०२० रोजी सरकारने सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगांची व्याख्या पुन्हा परिभाषित केली. आता त्यामध्ये गुंतवणुकीबरोबरच उद्योगाच्या वार्षिक उलाढालीला महत्त्व देण्यात आले. त्यानुसार जमीन, मशिन्स, आणि इतर साधने यांच्यावरील एकूण गुंतवणूक एक कोटी पेक्षा कमी आणि ज्यांची वार्षिक उलाढाल पाच कोटीपेक्षा कमी आहे अशा उद्योगांना सूक्ष्म उद्योग संबोधले गेले. जमीन, मशिन्स, आणि इतर साधने यांच्यावरील एकूण गुंतवणूक दहा कोटी पेक्षा कमी आणि ज्यांची वार्षिक उलाढाल पन्नास कोटीपेक्षा कमी आहे अशा उद्योगांना लघुउद्योग संबोधले गेले. जमीन, मशिन्स, आणि इतर साधने यांच्यावरील एकूण गुंतवणूक पन्नास कोटी पेक्षा कमी आणि ज्यांची वार्षिक उलाढाल अडिचशे कोटीपेक्षा कमी आहे अशा उद्योगांना मध्यम उद्योग संबोधले गेले.

## नवे आर्थिक धोरण आणि लघुउद्योग

नवे औद्योगिक धोरण हे लघुउद्योगांच्या संख्यात्मक वाढीस प्रोत्साहन देत आहे की, अस्तित्वात असलेल्याच लघुउद्योगांची प्रगती करण्यास प्रोत्साहन देणारे आहे याचा आढावा गर्ग त्यांच्या संशोधनातून घेतात. लघुउद्योगांमधील मोठ्या गुंतवणूकधारकांनी

श्रमाच्या बदल्यात भांडवलाचा वापर करण्यास सुरुवात केली. आकाराच्या निकषावर पाहता लघुउद्योगांमधील मोठी गुंतवणूक असणारे लघुउद्योग अधिक मोठे होत गेले आणि कमी गुंतवणूक असणारे लघुउद्योग लहानच राहिले. मोठ्या लघुउद्योगांमध्ये श्रमाची उत्पादकता वाढलेली दिसते, त्यावेळी लहान आस्थापनांमधून दुर्मिळ असलेल्या भांडवलाचा अधिक चांगला वापर केला गेला शिवाय ते श्रमप्रधानही राहिले. पारंपारिक उद्योग सुद्धा श्रमाधारित राहून चांगल्या क्षमतेनं परकीय चलन मिळविण्यात कार्यरत आहेत. १९७० आणि १९८०ची धोरणे अर्थव्यवस्थेत अनौपचारिक क्षेत्राची वाढ करणारी होती असे मत गर्ग इथे मांडतात; जे प्रत्यक्षात आलेले आपण पाहतो. तंत्रज्ञानाचा विकास आणि भांडवलाच्या जागतिकीकरणाने लघुउद्योगांसमोर काही नव्या संधी निर्माण केल्या तर काही नवी आव्हाने सुद्धा उभी केली (Garg, 1996).

तसेच, १९८०नंतरच्या सरकारच्या प्रोत्साहनात्मक संरचनेला प्रतिसाद म्हणून उद्योजकांना नवीन लघुउद्योगात गुंतवणूक करण्यास चालना मिळाली. त्यामुळे मोठ्या गुंतवणुकीच्या उद्योगांच्या तुलनेत लहान गुंतवणूक असलेल्या लघुउद्योगांची संख्या वाढीस लागली. म्हणूनच लघुउद्योगांचा आकार वाढविण्यात सरकारी धोरण फार फायदेशीर ठरले नाही परंतु लघुउद्योगांची एकूण संख्या वाढविण्यात ह्या धोरणाने नेतृत्व केले असे गर्ग म्हणतात. तसेच हे धोरण रोजगार, गुंतवणूक, उत्पादन आणि निर्यात वाढविण्यास फायदेशीर ठरले. त्याचप्रमाणे ज्या लघुउद्योगांना आर्थिक सहाय्य मिळाले. त्यामधील कामगारांची उत्पादकता

वाढीस लागल्याचे लघुउद्योग क्षेत्रात दिसून येत आहे. लघुउद्योगांनी त्यांच्या भांडवल उत्पादकतेत पण चांगली कामगिरी केल्याचे दिसून येते. १९९१नंतर निर्यात प्रोत्साहनाला लघुउद्योगांनी चांगला प्रतिसाद दिला. तथापि, आधुनिक लघुउद्योग आणि पारंपारिक उद्योग निर्यात आणि रोजगार निर्मितीच्या बाबतीत मागे राहिल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या संदर्भात सरकारी हस्तक्षेपाच्या गरजेचे परीक्षण करताना पारंपारिक उद्योगांमध्ये असलेली उच्च रोजगार निर्मिती आणि निर्यातीची शक्यता पाहता ते उद्योग नष्ट होता कामा नयेत असे मत गर्ग नोंदवतात.

भारतातील आर्थिक सुधारणांचा परिणाम अभ्यासताना एम. एच. बालासूब्रमण्य म्हणतात की, ह्या सुधारणांमुळे १९९१पासून सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक, रोजगार आणि उत्पादनाच्या तुलनेत अत्यंत कमी झाली. सार्वजनिक क्षेत्र हे लघुउद्योगांचे मोठे ग्राहक राहिले आहे. दुसरे म्हणजे, वाढत्या प्रत्यक्ष गुंतवणुकीने फक्त वाढत्या स्पर्धेचीच भीती निर्माण केली नाही तर, नाशवंत उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग आणि टिकाऊ उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग तसेच भांडवली वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या लघुउद्योगांनाही मिळणाऱ्या संधीमध्ये घट होण्याची भीती निर्माण केली. फक्त लघुउद्योग क्षेत्रातच उत्पादित होणाऱ्या राखीव वस्तूंचे प्रमाण १९९१मध्ये ८४२ होते जे २००३ मध्ये ६७५ झाले. १९९०मध्ये लघुउद्योगांसाठी असलेल्या कर्ज दरातील सवलतीची रक्कम मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आली. उत्पादन वाढीचा दर १९८०च्या उत्तरार्धात वाढला होता जो १९९०च्या सुरुवातीस आणि नंतर घटत राहिला. तर

१९९०च्या पूर्वार्धात निर्यातवाढ स्थिर दराने होत होती जी १९९०नंतर अत्यंत घटत गेलेली दिसून येते. १९८०च्या संरक्षण काळात लघुउद्योगांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढला होता परंतु १९९०च्या संक्रमणाच्या काळात तो कमी झाला (Bala Subrahmanya, 2004).

नव्या आर्थिक धोरणाने लघुउद्योगांना मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागले कारण लघुउद्योगांसाठी खात्रीशीर आणि कार्यक्षम पायाभूत सुविधांचा विकास झाला नाही. त्यामुळे त्यांची स्पर्धेची क्षमता वाढू शकली नाही. दुसरे कारण म्हणजे वित्त. १९८०च्या दशकात लघुउद्योगांसाठी बँकांच्या पतपुरवठ्यात झालेली वाढ ही १९९०च्या दशकात घटत गेल्याचे दिसून येते. लघुउद्योगांच्या मोठ्या अडचणींपैकी विपणन ही एक महत्त्वाची मोठी समस्या म्हणून समोर येते. लघुउद्योगांच्या दुसऱ्या सेन्ससनुसार, लघुउद्योगांचे अनेक युनिट्स बंद पडण्यामध्ये त्यांची विपणनाची समस्या हे महत्त्वाचे कारण होते. (Bala Subrahmanya, 2004). देशांतर्गत झालेल्या आर्थिक उदारीकरणाच्या बदलांनी लघुउद्योग क्षेत्रांसाठी संरक्षित असलेल्या विशिष्ट सेवा, सवलतींमध्ये घट केल्यामुळे भारतातील लघुउद्योगांना आपापसांमध्येच तीव्र स्पर्धात्मकतेला सामोरे जावे लागले. परिणामी ह्या क्षेत्राची एकूण आस्थापने, रोजगार, उत्पादन आणि निर्यातीतील वाढ कमी झाली.

परंतु त्याचवेळी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय धोरणातील बदलांमुळे भारतीय लघुउद्योग क्षेत्रापुढे नव्या संधी आणि नवी बाजारपेठ खुली झाली. जागतिक स्पर्धेचे विविध आयाम, त्याचे नकारात्मक

परिणाम तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या सकारात्मक संधी यांना सामोरे जाण्यासाठी तंत्रज्ञान हस्तांतरण किंवा तंत्रज्ञानातील बदलांमुळे तसेच आस्थापनामधील अंतर्गत फायदे मिळविणे आणि याच्या माध्यमातून तांत्रिक विकास घडवून आणण्याचे महत्त्व लघुउद्योजकांना पटवून द्यावे लागेल. त्यासाठी स्थानिक पातळीवर विविध कार्यशाळा आणि परिषदा भरवाव्या लागतील. त्याचप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या बदलासाठी तयार असणारा, आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक असणाऱ्या लघुउद्योग क्षेत्राला राष्ट्रीय उत्पन्नात, रोजगार आणि निर्यातीत शाश्वत वाढ घडवून आणण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे असा सल्ला बालासुब्रमण्य आपल्या संशोधनातून देतात.

थोडक्यात जागतिकीकरणाने उद्योगांना तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि माहिती क्षेत्रातील क्रांतीवर आधारित उत्पादन करण्यास प्रोत्साहन दिले. परिणामी माहितीवर आधारित वस्तूनिर्माण, विपणन (मार्केटिंग), सेवा देणे याला भांडवल किंवा श्रम केंद्रित उत्पादन करण्यापेक्षा अधिक महत्त्व आले. त्यामुळे उत्पादनाचा खर्च हा सर्वसाधारणपणे उपभोक्ता देत असलेल्या किंमतीच्या २५% येऊ लागला. हे वाढलेले मूल्य फक्त श्रमामुळे नव्हे तर, संशोधन आणि विकास (R D), अभियांत्रिकी, वित्तीय आणि विपणनाच्या कौशल्यामुळे तसेच वितरण, साठवणूक, किरकोळ विक्री, सेवा अशा विविध प्रक्रियांचे एकत्रीकरण यांमुळे मिळालेले होते. हे सर्व घटक आता व्यवसायाचा कायदेशीर भाग बनलेले होते ज्यांनी वस्तूनिर्माणापेक्षा इतर प्रकारचे विविध रोजगार तयार केले.

**समारोप**

कर्वे समितीने १९५५ साली लघुउद्योगांसाठी केलेल्या शिफारशी महत्त्वाच्या होत्या. सुबिमल दत्त यांच्या अध्यक्षतेखाली औद्योगिक परवाना धोरण चौकशी समितीने १९६९ साली दिलेल्या अहवालात परवाना धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीची चिकित्सा केली होती. तरीदेखील त्यानंतरच्या सर्व पंचवार्षिक नियोजनांमध्ये बदललेल्या औद्योगिक धोरणांचा प्रत्यक्षात काय परिणाम झाला, बनवलेल्या योजनांचे फायदे कोणाला आणि किती प्रमाणात मिळाले हे व्यापक संशोधनातून समोर येण्याची गरज आहे. लघुउद्योगांच्या बदललेल्या परिभाषांमधून गुंतवणुकीची मर्यादा सतत वाढवत नेल्याचे समोर येते. यामधून असेही लक्षात येते की, लघुउद्योग क्षेत्रातही जास्त गुंतवणूक करणारे आणि कमी गुंतवणूक करणारे असे गट तयार झाले. १९७७च्या परिभाषेत एक लाखपर्यंत गुंतवणूक असलेले लघु क्षेत्र तयार केले. त्याचबरोबर लघुउद्योगांची गुंतवणुकीची मर्यादा पण वाढवली. साहजिकच तुलनेने अधिक गुंतवणूक असलेल्या उद्योजकांना बँकाही सहाय्य करण्यास उत्सुक असतात. शिवाय सरकारी योजनांसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता पण हा अधिक गुंतवणूक केलेला वर्ग करू शकतो. त्यामुळे योजनेचा फायदा तुलनेने दोन लाखांच्या आत अतिशय कमी गुंतवणूक असलेल्या गुंतवणूकदारांना मिळतो का हा प्रश्नच आहे. तसेच पीएच.डी.च्या निमित्ताने पुणे शहरात केलेल्या प्राथमिक अभ्यासातून असेही लक्षात आले की, लघुउद्योगांची गुंतवणूक मर्यादा वाढवत नेल्याने जास्त गुंतवणूक असलेले अनेक उद्योग सूक्ष्म-लघु

आणि मध्यम क्षेत्राचा भाग बनले. त्याचबरोबर लघुउद्योग म्हणून कार्यरत असताना फॅक्टरी ॲक्टप्रमाणे असलेल्या कायद्यांचे पालन करण्याचे बंधन लघुउद्योगात राहत नाही; परंतु सूक्ष्म-लघु-मध्यम क्षेत्रासाठी बनवलेल्या योजनांचा फायदा मात्र मिळतो. लघुउद्योगांची परिभाषा बदलल्याने असा दुहेरी फायदा घेणारे मोठे गुंतवणूकदार फायद्यात राहिले. त्याचवेळी एखादं विजेवर चालणारं लेथ मशीन किंवा साधं सी. एन. सी. मशीन घेऊन काम करणाऱ्या छोट्या उद्योजकांपर्यंत योजनेचा लाभ पोचतच नाही.

आतापर्यंतच्या औद्योगिक धोरणांनी मोठ्या गुंतवणूकदारांचाच फायदा झाला आहे. त्यामुळे छोट्या गुंतवणूकदारांच्या नावाने आलेल्या योजना मोठ्या गुंतवणूकदारांच्या फायद्यापुरत्या मर्यादित राहिल्या. परिणामी लहान उद्योजकांवर नकारात्मक प्रभाव तर पडलाच, पण त्याबरोबरच त्यांच्याकडून मिळणाऱ्या नवनिर्मितीच्या योगदानापासून पण औद्योगिक क्षेत्र वंचित राहिले. लघुउद्योग क्षेत्र म्हणून गुंतवणूक, रोजगार वाढ निर्यात वाढ असा संख्यात्मक विकास करण्याकडे धोरणांचा कल राहिलेला दिसतो. परंतु लघुउद्योग क्षेत्रातील योजनांचा सर्व गुंतवणूकदारांना समान उपभोग मिळेल, लघुउद्योगांत सुरक्षित रोजगार तयार होईल, त्यांच्या उत्पादनाला सुरक्षित बाजारपेठ मिळेल असा गुणवत्ता वाढविणारा विकास होताना दिसत नाही. म्हणूनच कमी उत्पन्न गटातील उद्योजकांना सार्वजनिक धोरणांचे संरक्षण दिल्याशिवाय विकसनशील देश म्हणून आपल्या अर्थव्यवस्थेतील औद्योगिक क्षेत्राचा पाया मजबूत होणार नाही असे वाटते.

## संदर्भ

**पुस्तकं :**

1. Datt, Ruddar, Sundharam K.P.M. (2009): Indian Economy, S. Chand Company Ltd., New Delhi, P. 201.
2. Gumma, Vijay Nagesh (2009): The Impact of Globalisation on Small Scale Industries, Regal Publications, New Delhi.
3. Kulkarni, Yogesh (2011): Performance of Indian Industrial Sector, Shri Niwas Publication, Jaipur.
4. Sahu, Parth Pritam (2005) : Labour and employment in India, Employment in small and tiny enterprises post reform trends and dimensions, Sukhdeo Thorat, Jayprakash Pradhan, Vinoj Abraham, (Edited) Industrialization economic reforms and regional development - essay in honor of Prof. Ashok, Shilpa publication.
5. ब्रम्हे, सुलभा व अजित अभ्यंकर, क्षिप्रा बेडेकर (संपा) (१९९२) : बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विळख्यात भारत, शंकर ब्रम्हे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे.

**लेख :**

1. Bala Subrahmanya M. H. (2004): Small Industry and Globalisation Implications, Performance and Prospects https://www.jstor.org/stable/4414966 -ccessed on 18 Feb. 2019.
2. Das Deb, Erumban Abdul Azeez, Sengupta Sreerupa, Aggarwal Suresh Chand (2013): Revisiting the service A led growth in India understanding India's service sector productivity growth https://www.researchgate.net/publication/332523048š -ccessed: 8 Jul. 2021.
3. Garg, Charu C. (1996): Growth of Small Scale Industries in India: Some Policy Issues http://nipfp.org.in/media/medialibrary/2013/04/wpš1996š10.pdf Accessed on 31 May 2016.
4. Goldar, Bishwanath (2004): Indian Manufacturing: Productivity Trends in Pre and Post-Reform Periods https://www.jstor.org/stable/4415808 -ccessed on 20 May 2019.
5. Malik Muhammad Hussain, Cheema Aftab Ahmad, Havinga Ivo C. (1986): The Role of Small-scale Industry in Pakistan's Economy and Government Incentives (With Comments), P. 789. https://www.jstor.org/stable/41258791 -ccessed: 07 Jan. 2019.
6. Mehata, Swati (2011): Economic Reforms, Technological Intensity and Industrial Development in India https://www.epw.in/journal/2011/17/special-articles/economic-reforms-technological-

intensity-and-industrial-development -ccessed on 18 Feb. 2019.
7. S. Nanjundan (1996): Economic Reforms and Small - Scale Industry https://www.jstor.org/stable/4403704 -ccessed on 7 Jan. 2019.
8. S. Nanjundan, (1994): Changing Role of Small-Scale Industry: International Influences, Country Experiences and Lessons for India https://www.jstor.org/stable/4401264 -ccessed on 7 Jan. 2019.
9. Sathe, Dhanmanjiri (2002): Industrial Slowdown and Small Scale Sector https://www.epw.in/journal/2002/29/commentary/industrial-slowdown-and-small-scale-sector.html -ccessed on 3 May 2020.
10. Shastri Rajesh Kumar, Tripathi Ravindrs and Ali Murad, (2011): Liberalization and Its Impact on Small Scale Industries https://academicjournals.org/journal/IJVTE/article-full-text-pdf/25FF0F7730 -ccessed on 20 May 2019.

## संकेतस्थळं :

1. https://msme.gov.in/faqs/q1-what-definition-msme Accessed on 5 Jul. 2021.
2. https://msme.gov.in/know-about-msme -ccessed on 5 Jul. 2021.
3. https://msme.gov.in/sites/default/files/12fypšvol2.pdf Accessed on 5 Jul. 2021.
4. https://niti.gov.in/planningcommission.gov.in/docs/plans/planrel/fiveyr/5th/5planch5.html Accessed on 8 Jul. 2021.
5. https://niti.gov.in/planningcommission.gov.in/docs/plans/planrel/fiveyr/7th/vol1/7v1ch3.html Accessed on 8 Jul. 2021.
6. https://www.statista.com/statistics/318732/share-of-economic-sectors-in-the-gdp-in-malaysia/ Accessed on 8 Jul. 2021.
7. https://www.statista.com/statistics/331893/share-of-economic-sectors-in-the-gdp-in-thailand/ Accessed on 8 Jul. 2021.

विशेष लेख

# भीमबेटका व सिंधू संस्कृती : दृश्य कलाकृतींमधील लिंगस्थाननिश्चिती

स्वाती राजन

**संक्षिप्त गोषवारा**

प्रागैतिहास आणि प्राचीन भारतीय इतिहासाचे पुरातत्त्वीय पुरावे म्हणजे तत्कालिन दृश्य कला म्हणजेच चित्रकला, शिल्पकला, दगडावरील चित्रकला, स्थापत्य, शिलालेख, ताम्रपट इत्यादी साधनांच्या आधारे इतिहासलेखन केले जाते. समकालीन सामाजिक, धार्मिक, आर्थिक मापदंडाचे निकष आणि विश्लेषण लिंग या महत्त्वपूर्ण घटकाद्वारे केले जाते. स्त्रीवादी विकासाच्या टप्प्यांमधील कला क्षेत्र व त्यातील स्त्री चित्रण हा एक महत्त्वपूर्ण चर्चेचा विषय राहिला आहे. प्रागैतिहासिक भारतातील कलाकृतींमध्ये स्त्रीचे स्थान कोणत्या आशयाभोवताली बद्ध केले आहे, याचा विश्लेषणात्मक अभ्यास आणि अन्वयार्थ स्त्रीवादी अभ्यासविषयाचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे.

लेखिका पुणेस्थित तुकाराम जगन्नाथ महाविद्यालयात इतिहास विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक आहेत.

ईमेल - swatipungaliya@gmail.com

## गृहीतक

प्रागैतिहासिक भारतीय सभ्यतेतील दृश्य कलाकृतींच्या माध्यमाद्वारे स्त्रीच्या सहभागाची नोंद इंद्रियजन्य सुसज्जता आणि त्या अनुषंगाने येणारे प्रजनन आणि मातृदेवता यांवर केंद्रीत होऊन स्त्रीच्या अन्य सामाजिक-सांस्कृतिक योगदानाप्रती अदृश्यतेची चिकित्सा करण्याचा छोटेखानी आणि प्राथमिक स्वरूपाचा प्रयत्न आहे. स्तंभलेख, मुद्रालेख, शिल्प आणि रेखाटने (चित्र) यांच्या नोंदीतून इतिहासातील स्त्रीचा सहभाग आणि प्रतिनिधित्व यांवर प्रकाश टाकता येतो. कलाकृतींच्या माध्यमांतून आढळणारे स्त्री अस्तित्व एकसंध अथवा अखंड न आढळता निरनिराळ्या श्रेणींच्या अनुषंगाने अधिक जटिल व व्यामिश्र आहे, अशा अन्वयार्थाच्या शक्यता तयार होतात. स्त्री प्रतिमा आणि रेखाटनांचा अभ्यास बहुस्तरीय गतिशिलतेच्या मर्यादांमध्ये होण्याच्या शक्यता संभवतात.

## प्रास्ताविक

प्राचीन भारतीय कलाकृतींसंबंधित अभ्यासाच्या दिशांचा विकास होण्याच्या शक्यतांची चर्चा या माध्यमातून होऊ शकते. स्त्रीवादी विचारसरणीच्या विकासाच्या टप्प्यांतील स्त्रीचे कलाकृतींच्या माध्यमातून होणारे चित्रण हा चर्चिला जाणारा महत्त्वपूर्ण विषय राहिला आहे. प्रागैतिहासिक भारतीय काळातील बहुतकरून सर्व कला माध्यमांतून स्त्रीची प्रतिमा इंद्रियजन्य सुसज्ज (विषयासक्त) अशी दर्शविली गेली आहे. १९व्या शतकापासून पुढे सामाजिक-सांस्कृतिक आक्षेपार्ह विषय म्हणून त्याचा अभ्यास

केला जाऊ लागला. समकालीन विश्वात स्त्री चित्रणाविषयीच्या कथानकांमध्ये मूलभूत बदल  होत गेले आणि अधिक अर्थपूर्ण आकृतिबंधात स्त्री-चित्रण साकारले जाऊ लागले. भौतिक कला-कृतींमधून साकार झालेली स्त्री-चित्रणे ही स्त्रीच्या स्थानाविषयीचे ऐतिहासिक प्रतिनिधित्व करतात.

प्रस्तुत संशोधन विषय प्रागैतिहासिक भारतातील कला-कृतींतून हाताळले गेलेले स्त्रीसंबंधी विषय आणि त्यांच्या संदर्भ चौकटींच्या आधारे स्त्री प्रतिमांसंबंधी प्रश्नांचे विवेचन प्राधान्याने करणे आणि त्यामागील विचारधारांचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. प्रागैतिहासिक कला-कृतींच्या प्रस्थापित अभ्यासपद्धतीच्या पलीकडे अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकून अन्वयार्थाच्या कक्षा रूंदावत नेत मानवी जीवनाशी निगडित समतेचे मूल्य केंद्रस्थानी ठेवणे हा या अभ्यासाचा मूलाधार आहे.

## भारतातील प्रागैतिहासिक आणि प्राचीन कालखंडातील स्त्रीची  दृश्यमानता

मानवी समाजाची जोपासना व जपवणूक ही स्त्रीतील सहनशिलता व स्त्री जीवनाशी निगडित अनेक पैलूंशी संबंधित आहे. स्त्रीचे सहनशीलतेचे अंग हे अतर्क्य आहे. स्त्रीत्वाचा स्थितीदर्शक गर्भितार्थ विशिष्ट कालखंडातील दृश्यकला-कृतींच्या माध्यमातून मांडला जाऊ शकतो. या संदर्भात साहित्य, कला, मूर्तीशास्त्र, स्तंभलेख, स्थापत्य आणि धार्मिक हस्तलिखिते यांचा समावेश होतो. कारण या माध्यमातूनच समाजाचे, समाजस्थितीचे, संस्कृतीचे दृश्य प्रतिनिधित्व करण्याची प्रथा

विकसन पावली. कोणतीही कला अथवा कलाकृती सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेतील प्रवृत्ती, अभिमुखता (orientation), पूर्वग्रह (biases), स्वभाववैशिष्ट्ये अधोरेखित करत असतात. एका अर्थी सर्व कलाकृती त्या त्या समाजाचे प्रतिबिंबच असते. म्हणूनच प्रागैतिहासिक आणि प्राचीन भारतातील स्त्रीचे स्थान व स्त्री भूमिकांचा अभ्यास करण्यासाठी कला, मूर्ती, स्थापत्य, शिलालेख, खडकांवरील चित्रकला यांसारख्या प्रभावी माध्यमांचा उपयोग केला जाऊ शकतो. कोणत्याही स्वरूपाची कला-माध्यमे ही मानवी सामाजिक-सांस्कृतिक प्रवृत्ती, समाजव्यवस्था आणि स्वभाववैशिष्ट्ये यांच्याशी दृढपणे जोडली गेलेली असतात.

प्रारंभिक इतिहास काळात, विशेषतः प्रागैतिहासिक काळात चितारलेली गुहांमधील चित्रे म्हणजे, मानवाच्या उत्क्रांत अवस्थेत मानवाने विकासाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल होते, असे मानले जाते. (Misra, २००१). या दृष्टिकोनातून, गुहांमधील चित्रांचा प्रारंभिक टप्पा म्हणून शोध घेतल्यास असे ध्यानात येते की, काही अपवाद वगळल्यास लिंग ओळखीतून महत्त्वपूर्ण काही अर्थांचा शोध घेणे कठीण होते, कारण भिंतींवर भौमितीय आकृत्यांचे रेखाटनातील रेखाकृतींमध्ये लिंग दृश्यमान नसते. परंतु जगभरातील सर्वसाधारणपणे खडकांवरील चित्रकलांमध्ये प्रजनन आणि त्याच्याशी निगडित तत्त्वप्रणाली चित्रीत केल्याचे दाखले मिळतात. (Kleiner, २००८)

भारतीय संस्कृतीच्या संदर्भात प्रागैतिहासिक काळापासून मातृदेवता आणि नंतर सिंधू संस्कृतीमध्ये मातृदेवताशी निगडित झालेल्या संकल्पनेचा विस्तार आणि विकास आढळून येतो.

(Mathpal, १९८४, Kamat १९९७) सिंधू खोऱ्याच्या सभ्यतेत चिकनमातीच्या मूर्ती म्हणजे छोटेखानी स्त्री प्रतिमा, कांस्य शिल्पांच्या आणि शिक्क्यांवर असलेल्या प्रतिकात्मक दर्शवलेली चित्रे यांची साक्ष देतात. (Mcintosh, २००८) वैदिक कालखंडात कला ही उपासना आणि अध्यात्माचे माध्यम होते. पावित्र्य, ऋचा, ग्रंथ या संकल्पनांचा वापर आर्यांच्या काळापासून सुरू झाला. पहिले भाषिक अभिलेख ऋग्वेदकाळातील उपलब्ध झाले आहे. (Khanna, २००७) उपलब्ध पुराव्यांच्या अहवालांनुसार या काळातील कला-कृतींची निर्मिती खूप मर्यादित होती, असे दिसते. पुढे अजिंठा आणि वेरूळ येथाल लेण्यांमधून दिसणाऱ्या भित्तीचित्रांमध्ये धार्मिक विचारांच्या संवर्धनासंबंधी स्त्री प्रतिमा सुशोभित, आकर्षक, मोहक आणि भव्य आहेत. या लेण्यांमधून दिसणाऱ्या भित्तीचित्रांचा स्त्रीवादी परीप्रेक्ष्यातून झालेल्या अभ्यासांद्वारे प्राचीन भारतातील स्त्रीची स्थाननिश्चिती अधिक दृश्यमान होते आणि समकालीन लिखित पुराव्यांच्या आधारे विस्तृत विश्लेषणात्मक अभ्यासाच्या व्याप्तीस सखोलता प्राप्त होते.

## भीमबेटका : स्त्रीचित्रांमधील प्रतिमा

भीमबेटका गुहांमधील चित्रांचे, अथवा सिंधू खोऱ्यातील संस्कृतीमध्ये सापडलेल्या टेराकोटाच्या मूर्ती, शिक्के आणि कुंभारकाम यांचे स्त्रीवादी सिद्धांकनांच्या आधारे परीक्षण कुतूहल निर्माण करणारे आहे. भीमबेटका येथील प्रतिमांचे विषय प्रामुख्याने 'प्रजनन क्षमता' होय. स्त्रीचे प्रतिनिधित्व करणारी चित्रे खूप

कमी आहेत. प्रजनन संबंधी विषय गर्भवती स्त्रीच्या प्रतिमांद्वारे ओळखली जाऊ शकतात. या गुहेतील चित्रांविषयी सखोल चिंतन मठपाल यांनी त्यांच्या 'प्रीहिस्टोरीक रॉक आर्ट ऑफ भीमबेटका' या ग्रंथात केले आहे. पुस्तकाच्या पूर्वार्धात रेखांकनाची छायाचित्रे तर प्रत्येक रेखांकन प्लेटचे विवेचन ग्रंथाच्या उत्तरार्धात केले आहे. विशेषतः पूर्व– ऐतिहासिक काळातील मुख्य ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य प्रदेशातील भीमबेटकाच्या शिल्प चित्रांशी संबंधित आहे. दुसऱ्या एका प्रतिमेत एक स्त्री विश्रांतीच्या आसनावस्थेत दाखविली आहे ती सुद्धा गर्भवती आहे, हे तिच्या शरीररचनेतून स्पष्टपणे दिसते. उर्वरित चित्रांचा आशय विस्तृतपणे पुरुषकेंद्री असून पुरुष वर्चस्वाचे प्रतिनिधित्व करणारे आहे. पुरुष हा वर्चस्ववादाचे प्रतिनिधित्व करणारा सामर्थ्यशाली, जोमदार, जो जगण्यासाठी शिकार आणि अन्न गोळा करणारा असे चिन्हांकीत केले आहे. याशिवाय अलौकीक वीरपुरुष असेही चित्रण केलेल्यासंबंधीची चर्चा मठपाल यांनी केली आहे. (Mathpal, १९८४) तर, उलटपक्षी स्त्रीला गर्भवती स्थिती आणि प्रासंगिक दिनक्रमांमध्ये बद्ध केल्याचे मठपाळ यांनी प्रतिपादन केले आहे. (Mathpal, १९८४) दुसरी आणखी एक प्रतिमा मातृदेवतेची असून त्यात स्तनांचा आकार शरीराच्या आकारबद्धतेपेक्षा अधिक मोठा करून त्यातून दुधाचे कारंजे पृथ्वीवर पडत असल्याचे दर्शविले आहे. अशाप्रकारे मातृदेवतेच्या प्रतिमा अशाप्रकारच्या मातृदेवतांच्या प्रतिमा प्राचीन भारतातील चित्रणांमध्येही आढळतात. प्रागैतिहासिक कालखंडातील स्त्रीला शिकार आाणि अन्न गोळा करण्याच्या

कामांमधून वगळले जाऊन केवळ त्यांची प्रजननक्षमता दर्शवली गेली आहे. कामत यांनीही मठपाल यांच्या मांडणीस दुजोरा मिळेल असे युक्तीवाद केले आहेत. सारांशरूपाने, प्रागैतिहासिक काळातील खडकांवरील चित्रणांमधून समाजातील स्त्रीचे स्थान फारसे महत्त्वाचे नसून केवळ पुनरूत्पादन करणारी मानवशक्ती, तिच्या वास्तव आणि तथ्यात्मक अस्तित्वाच्या ओळखीपेक्षा अधिक साजरी केली जाते.

## सिंधू संस्कृती : मातृदेवता, जन्म देण्याच्या अदभूत सामर्थ्याचे दैवीकरण

प्राचीन भारतातील पहिली संस्कृती म्हणजे सिंधू खोऱ्यातील संस्कृती होय, ज्याठिकाणी टेराकोटाच्या मूर्ती, शिक्के आणि कुंभारकाम अशा विविध तंत्रज्ञानातून कलात्मक नावीन्यपूर्ण निर्मितीचा विकास झाला. पुरातत्त्व सर्वेक्षणातून विविध प्रकारचे शिक्के आणि टेराकोटाच्या मूर्ती सापडल्या आहेत. या मूर्तींमध्ये नग्न मातृदेवतांचे वारंवार चित्रण केले गेले. (Coburn १९९१) या संस्कृतीतील स्त्रीचित्रणांचे शिक्के आणि टेराकोटाच्या मूर्ती असे दोन भागांत वर्गीकरण केले जाते. लैंगिक अवयव, जड स्तन आणि रूंद नितंब अधिक चित्तवेधक अशा नग्न स्त्री आकृती (प्रतिमा) सापडल्या आहेत. (Muesse, २०११) चिकणमातीचे लहान पुतळे स्त्री लैंगिकता चिन्हांकीत करण्याशी निगडित असण्याचे कारण असे असावे की, जन्म देण्याचे सामर्थ्य हे केवळ स्त्रीला निसर्गाकडून प्राप्त झालेले वरदान आहे. अशाप्रकारे लैंगिकता चिन्हांकीत करण्याची मीमांसा ही स्त्रीकडे असणाऱ्या

जन्म देण्याच्या अद्भूत सामर्थ्य आहे आणि त्याचे दैवीकरण करून पुजण्याची प्रथा सुरू झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यातून अधिक ठळकपणे मातृदेवता या संकल्पनेचा जन्म झाला असावा. लैंगिक उपासना ही काही स्त्री देवतांशी संबंधित असून, तिचा अर्थाअर्थी सामान्य स्त्रीच्या जीवनाशी काहीएक संबंध स्थापित केला जाऊ शकत नाही. स्त्री नर्तकी हे कांस्य शिल्प पुरुषांच्या करमणुकीशी स्त्रीच्या गुंतवणुकीचे प्रतिनिधित्व करणारे आहे. नर्तकीचे सडपातळ शरीर हे कदाचित वय या घटकाचे निदर्शक असावे. किशोरवयीन मुलीसारखे तिचे शरीर दिसते. मार्टीन यांनी नमूद केल्यानुसार, जगभरातील असंख्य ठिकाणी सिंधू संस्कृतीच्या काळात असलेली लैंगिक उपासना खूप लोकप्रिय होती.

## निष्कर्ष

मानवी संस्कृतीची गतिशिलता अधिक सामर्थ्यशाली करण्यात स्त्रीची भूमिका महत्त्वपूर्ण असते. आळतेकरांच्या मते, 'एखाद्या सभ्यतेचा आत्मा समजून घेण्यासाठी आवश्यक श्रेष्ठता व मर्यादा यांचा साकल्याने अभ्यास त्यांमधील स्त्रीच्या स्थानाने निश्चित होतो.' (Altekar, १९३८) 'प्रारंभापासून, सामाजिक रचना स्त्रीभूमिका आणि स्थाननिश्चिती यांमध्ये स्थित्यंतरे घडवून आणण्यासाठी जशी सक्रीय राहीली, त्याप्रमाणेच काळाच्या ओघात देशाच्या प्रगतीत अडचणी निर्माण झाल्या आणि अडथळ्यांना सामोरे जावे लागले आहे. प्राचीन भारतीय ग्रंथांनी स्त्रियांच्या दृश्यमानतेवर लक्ष केंद्रीत केले, तर इतिहासकारांनी

भूतकाळाची पुनर्रचना करतेवेळी स्त्रियाकरता काही निश्चित अवकाश निर्माण केला आणि विशिष्ट मापदंडांच्या आधारे स्त्रीची स्थाननिश्चिती केली गेली.' (Chakravarti Uma and Roy Kumkum, १९८८) उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांचा युक्तीवाद, खडकांवरील चित्रकला, शिल्पकला आणि स्थापत्य यांसारख्या भौतिक माध्यमांपर्यंत व्याप्ती वाढवत नेली, तर हे स्पष्ट होते की, भीमबेटका येथील स्त्री प्रतिमा आणि सिंधू संस्कृतीतील टेराकोटाच्या छोटेखानी मूर्त्यांद्वारे स्त्रीच्या सहभागाची नोंद इंद्रियजन्य सुसज्जता आणि त्या अनुषंगाने येणारे प्रजनन आणि मातृदेवता यांवर केंद्रीत होऊन स्त्रीच्या अन्य सामाजिक-सांस्कृतिक योगदानाप्रती अदृश्यतेची प्रचिती येते. भारताच्या इतिहासातील घडामोडींद्वारे स्त्रीकेंद्रीत अभ्यासप्रणाली स्त्रीचे सामाजिक-सांस्कृतिक स्थान अधोरेखित करून तिचे दृश्य आणि अदृश्य अस्तित्वाचा शोध घेण्याच्या प्रक्रियेचे सखोल विश्लेषणात्मक विवेचन करून क्लिष्टता आणि गुंतागुंत यांच्या सोडवणुकीसाठी बद्ध राहते.

## संदर्भ :


**1.** Altekar, A. S., 1938, 'The Position of Women in Hindu Civilization: From Prehistoric Times to the Present Day', Banares Hindu University Press, India.

**2.** Chakravarti Uma and Roy Kumkum, 1988, 'In search of our past: A Review of the limitations and possibilities of the Historiography of Women in Early India', Economic and Political Weekly, Vol. 23, no. 18, pp WS2-WS10.

**3.** Coburn, Thomas B. 'Encountering the Goddess: A Translation of the Devi Mdhatmya and a Study of Its Interpretation. SUNY Series in Hindu Studies. Wendy Doniger, editor. Albany, NY: State University of New York Press, 1991. (Published in India by Sri Satguru Publications, Delhi, 1992)

**4.** Kamat, L. K. 1997, 'Prehistoric Rock Paintings of Bhimbetaka' First Online: January 01, 2009.[ http://www.kamat.com/kalranga/rockpain/betake.htm, accessed

01/02/2020]

**5.** Kleiner Fred S., 2008, Art Through the Ages: A Global History: Volume II: 2, Wordsworth Publishing Co. Inc. 13th Ed.

**6.** Marshall John, 1996, Mohenjo-Daro and Indus Civilization: being an official Account of Archeological Excavations at Mohenjo-Daro carried out by the then Government of India between years 1922 and 1927. New Delhi: Asian Educational Services.

**7.** Mathpal Yashodhar, 1984, Prehistoric Rock Art of Bhimbetka, New Delhi: Abhinav Prakashan. [books.google.co.in/books, mathapal y; Accessed on 29-01-2020]

**8.** Mcintosh Jane R., 2008, 'Understanding Ancient Civilization: The Ancient Indus Valley', New Perspectives, USA:ABC-CLIO Inc.

**9.** Misra V. N., 2001, 'Prehistoric Women Colonization of India', Indian Academy of Science, 26 (4), 491-531.

**10.** Muesse Mark W., 2011 'The Hindu Traditions: A Concise Introduction', Fortress Press Pennsylvania.

परिवर्तनाचा
वाटसरू

**वर्गणीचे दर**

वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १६०० रु.,
दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वा. व. २०० रु.,
सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर इ मनी ऑर्डर,
चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी.
'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

'गुगल पे'साठी नंबर : 8888708963

कविता

## बबरूच्या कविता

बबरू

# अभिजनांनो

बाप हो, हाणतो तुमच्या ढुंगणावर सणसणीत लाथ
थुत् तुमच्या गांडू सभ्यतेवर
साल्यांनो रक्त शोषून पिढ्यान् पिढ्या
मुडद्यांवर रचले इमले काव्याचे, कलांचे
नागडं करतो झाडून सगळ्यांना
माझ्या पितरांचे शिव्याशाप नाही भोवले तुम्हाला
पण पेकाटात माझी एक लाथ पडताच
भुईसपाट होईल सारे
तोंडातून पचकन कचकचीत शिवी बाहेर यावी
तसा निचरा होईल तुम्ही ठासून मारलेल्या साऱ्या गोष्टींचा
पाताळात बळी दिलेला माझा सूर्य
पुन्हा तळपू लागेल साऱ्यांवर समानतेने

---

लेखक सातारास्थित असून बबरू हे त्यांचे टोपणनाव आहे.
ईमेल – babaruchyakavita@gmail.com

आम्ही तर तरारूच त्याच्या सम्यक प्रकाशात
पण हरामखोरांनो, तुम्हालाही परत देऊ तुमचे मूळ गोत्र
माणसाशी माणसासारखे वागणाऱ्या माणसाचे

बोचतीय, किळस आणतीय आमुची मऱ्हाटी मायबोली
मग घ्या ह्या
तुम्हाला झेपेल तेवढंच वास्तव मांडणाऱ्या
अशिष्टशब्दविरहित आत्मकविता:
आटपाट खेड्यात गावकुसाबाहेर होती काही खोपटं
त्यातील एकातील एका मुलाची ही गोष्ट ....

## पांग

ठिगाळलेल्या धडुत्यातील हाडांचं गाठोडं
चरकातनं काढल्या चिपाडावाणी
मर मर मरायचीस
तरी बी करायचीस
उपास, लई कडाक
सोमवार, गुर्वार, रविवार
फडाडा बोलायचो म्या तुला
अस्सल ठेवणीतल्या श्या
तुझ्या उपासान्ला तुझ्या तोंडाव
तू गप-गुमान उगी उभी

तोंडातल्या तोंडात पुटपुट
माजं देव वेगळं हायेत बाबा.
आता कळतंय आये
सोताच्या पोटी पानी वतून
निवेद्याचं चार घास
तू आमा पोरास्नी दावायचीस
तुझेच उपास खरे गं आये

पण कोणी प्रसन्न नाही होणार त्यांच्यामुळे
आणि देणार नाही कोणी कोणता वर
पण फेडीन मी तुझे पांग आये
उपाशी राहून उपास करणाऱ्या
साऱ्या कष्टकरी बायांसाठी झटून

## ठणाणा

नगं करवादू पोरा त्याच्यावं
लई सुकाचे दिस दावल्याती तेनं.
लगीन लावलं तवा कसा हत्तीवाणी व्हता.
आई बाची बाजू घेनार, आन माजा ठणाणा
कवाबी बगा डुलत असायचा
पाव्ह तवा गुंजेवाणी डोळ, जड जीभ
श्या एकाव एक जबरी
एका झापडीत चड्डी वली

पोरास्नी कवा लिमलेट नाय, का बिस्कुट नाय
कवा खांद्याव वचलून नेलं नाय
का जत्रंतली मजा दावली नाय
दिसभर दारोदारी फिरून घाणीमंदी काम
रातच्याला कुनाच्या घराम्होरलं किडूक-मिडूक
नायतर लोखंडी पट्ट्या, अँगल
हाती गावल ते विकूनशान गुत्याव
टाईट हूनच घराकडं
लई भ्याचो म्या त्याला
लई राग करायचो, मनात लई बुकलायचो
गेला हायस्कुलात व्हतो तवा
लिवर फुटली म्हणं

त्याचा राग नाही येत आता, आतडं तुटतं
संताप संताप होतो
जिवाच्या आकांतान मान वर उभारायला धडपडणाऱ्यांना
जहरी नशेत बुडविणाऱ्यांच्या
नावान केला पाहिजे ठो ठो ठणाणा

## ताई

नाही मला साजरी करता येत दिवाळी मनापासून
राग राग येतो आम्हाला गावकुसाबाहेर ठेवणाऱ्यांच्या सणांचा
तरीही मी दरवर्षी नेमाने साजरी करतो भाऊबीज

न चुकता ताईच्या घरी जाऊन
नसेल माझा भाऊबीजेवर विश्वास
पण तिचा विश्वास आहे ना तिच्या भावावर
बाप गेला आणि ताईची साळा सुटली
गुर्जी नेहमी म्हनायचं
तुझी ताई फार तेज
आई जायची रोजानं काबाडकष्ट कराया
ताई भाकऱ्या बडवून, घरचं आवरून
मला आणि धाकट्याला साळत सोडाया याची
म्हातूर शेवटच्या वळणाआंदी माघारी फिरायची
थोडी मोठी झाल्यावर तीही जाऊ लागली आईबरोबर
अर्ध्या मजुरीवर भांगलणीला, खुरपणीला
धाकट्याला साळंत काय बी जमायचं नाही
सारखं धरून बडवायची त्याला
शिकाया मिळतंय तर शिकंना असं कावायची
निकालाच्या दिवशी हळूच हातावं गुळाचा खडा ठेवायची

मी शिकलो, शहरात गेलो, कामाला लागलो
सोळाव्या वर्षी तिचं लगीन लागलं
दाजी तसे बरे आहेत, पण आमचं जुळत नाही
लांबून चांगलं म्हणायचं
मी जातो दर भाऊबीजेला तिच्याकडे, न चुकता
तिला साडीचोळी, दाजींना ड्रेस, मुलांना कपडे आणि खाऊ
दुसऱ्या दिवशी निघताना भिजल्या नजरेनं सांगते

भाऊ, जरा लवकर ये हो. पोरांना साळंत गोडी नाय रं
तू सांगितलं तर ऐकतिला जरा.
डोळ्यांतलं पाणी लपवत मी पाठ फिरवतो
झटकन पुढे चालू लागतो
पुढच्या वर्षी परत भाऊबीजेला येण्यासाठी.

## दोस्त

राम्याची आणि माझी दोस्ती कशी झाली कोणा ठाव
तेंचं घर माह्या घराजवळ, साळच्या वाटेवं
ल्हान व्हतो तवाधरनं आमी बराबरच साळंत जायचो
जाता-येता, उगा म्या तेंच्या घरी घुटमळायचो
आत घरात शिरूनशान च्या-बटर ओरपायचो
बेबीबराबर खेळायचो, तिला चिडवायचो
राम्याचा बा आमास्नी पुनांदा म्हनायचा,
पोरांनु, शिका, पुडं जावा. गावच्या आणि शेरातल्या पोरांस्नी
मागं टाका.
आमी हो, हो करायचो आन सटकायचो
दहावीनंतर मी शिकायला शहरात गेलो
राम्याने आयटीआयचा रस्ता पकडला
बेबीची पत्रिका द्यायला तो आठवणीनं माझ्या खोलीवर आला
आग्रहाने बोलावून गेला
म्हणाला, बेब्याला तुजी लय सय येते.

मला उगीचच गलबलून आले
तिच्यासाठी त्यांनी शोधला होता
थोराड, अशिक्षित, हातावर पोट भरणारा जातीतला मुलगा

## वसतिगृह

एसेस्सी झाल्यावर सरांनी विचारलं
पुढं काय?
म्या म्हनालो, काय की.
शहरात कॉलेजला प्रवेश घे. आपलं वसतिगृह आणि शिष्यवृत्ती मिळून जाईल.
आपले वाघमारे सर करतील सर्व मार्गदर्शन.

वसतिगृहाची बिल्डिंग एकदम अंगावर आली
रोज रातच्याला कांबरूणात तोंड खुपसून रडायचो
जेवनखान बरं होतं, पन घशाखाली उतरायचं नाय
काही दिसांनी मोठी पोरं आली
काय, कुठला, कोनाचा, कॉलेज विचारून झालं
दोन पोरं येऊन म्हणाली,
आजपासून तू आमच्याबरोबर यायचं
संध्याकाळी हॉलीबॉल खेळायला
नकळत मी मान हलवली
खेळ संपल्यावर गप्पा, चर्चा, रविवारची मीटिंग

नजर वर अन छाती ताठ
आरंला कारं कराया लागलो
आवाजाची पट्टी चढली
समूहगीतं ओठात रूळली
सुरू झाल्या वस्तीतील बैठका
मीटिंगा, सभा, अधून-मधून मोर्चा
कोन तरी हाय म्या, काय तरी करून दावीन
समद उलथीन असं वाटाया लागलं
तशी चर्चा सुरू झाली
‘वसतिगृहानं झपाटलं याला’

## कार्यकर्ती

तेज, तडफदार आहे ती
यायला पहिली, जायला शेवटची
न थकता पडेल ते काम उचलणार
झाडू मारण्यापासून वाद घालण्यात पुढे
तिन वाचलेल्या पुस्तकांची नावं पण कानावरून गेलेली नसायची
सरांच्या घरची साप्ताहिक बैठक संपल्यावर
एकदा तिनं जाहीर केलं
आज आम्ही मुली आणि वैनी बैठकीत बसणार
पुरुषांनी चहा करून द्यायचा अन कपबशा विसळायच्या
सगळी पोरं हसायला लागली

शेवटी सरांनी चहा करून आणला
मग हळूहळू यायची बंद झाली ती
ती आज आहे
नेक कार्यकर्ती, स्वतंत्र, स्वयंभू, एकांडी शिलेदार
अन्याय दूर करण्यासाठी धडपड, धडपड करणारी
मागे सरेन पण हरणार नाही
असे ठणकावणारी
भेटलो तर ओळख दाखवेलही
निर्मळ नजरेनं, निवाडा न करता

## आग्या म्होळ

'आग्या म्होळ हाय म्या
डिवचाल तर पळता भुई थोडी'
तुझं तोंड आग ओकायचं आग
नका त्याच्या वाटंला जाऊ
वसतिगृहात कुजबूज चालायची
नेतेमंडळी यायच्या आधी
गीत, घोषणा, आणाभाका
सारं पब्लिक तुझ्या गारुडात गुंग
रस्त्यावर तू दिसला आन
नेत्यांची गाडी गाचकन थांबली नाय

असं कधी झालंच नाय.
आदल्या राती सांगावा आला
चिन्ह फिरवा
नोटा, बाटल्या, साड्या वस्तीवर पोचल्या बी
तवा बगितलं तुला
पेटलेला; आग, आग झालेला
भिंगरीगत घरोघर फिराया लागलेला
‘क्रांतीची मशाल विझणार नाय
आमचं मत फिरणार नाय’
रातोरात अटक झाली तुला
नोटांची बंडल मिळाली तुझ्या अंगावर
खडी फोडाय गेलास
परत दिसलाच नाय
कुठल्या जंगलात असशील, कोणास ठाऊक?

## मैत्रिण

शेरडांसंगट डोंगरावं उंडारायला
चिच, जांभळ, कैरी एका टिपरीत पाडायला
जाळीत घुसून करवंद हादडायला
लई ग्वाड लागायचं
शहरातील कॉलेजवर ‘ट्रेकिंग क्लब’ जॉईन केला मी
आपल्यासाठी नसतं हे

वसतिगृहातील पोरं म्हणाली
'बघू तर जाऊन' म्हणून घुसलो
मजा यायची राव
निसर्ग-वारे, जंगल-झरे, चंद्र-तारे
आरडाओरडा, भेंड्या, एकत्र फस्त केलेले डबे
मित्र-मैत्रिणींचा आनंदोत्सव

एकदा काय झालं
धो धो पाऊस पडत होता
परत यायला रात्र झाली, सगळीकडे अंधार
स्टेशनसमोर रिक्षा नव्हती
मी मैत्रिणीला म्हटलं,
तू तुझा रेनकोट चढव
मी येतो तुझ्याबरोबर
माझ्या वसतिगृहाच्या पुढच आहे तुझं घर
सोडीन मी तुला.
म्हणाली, भावाला मेसेज केलाय.
तेवढ्यात गाडी घेऊन भाऊ आला
फरकन पाणी उडवत आमच्यासमोर थांबला
अर्धवट बाय करून
दरवाजा उघडून ती गाडीत बसून गेलीसुद्धा
घनघोर अंधारातही ज्ञान-सूर्य उगवला
'आपल्यासाठी नसतं हे'

# खाडकन उतरली माझी

आंबट-गोड चवीची
पहिल्या धारेची
हातभट्टीची
एक खंबा गापकन रिचावल्यावं
पारा कसा झरारा चढतो मर्दा
कविता तशीच डोस्क्यात फणा उभारते यार
'जय हो' म्हणून कोणाच्या तरी नावं ठो ठो करीत
घसा खरवडून बोंबलल्यावर
आडबाजूच्या धाब्यामागे शेतात
मटन, दारू खच्चून हाणल्यावर
फुटण्यागत शब्द फुटायचे
शिव्यांच्या लाखोल्या वाहून XXXची सारी संस्कृती
पार रसातळात बुडवायचो
क्रांतीची गाणी गुणगुणत
एकदा फुल-टाईट होऊन डुलत
परत घरी येताना तू बघितलंस माये
कपाळावर हात हाणीत
मटकन बसलीस भुईवर
मान परत वर केलीच नाय तू माये
खाडकन उतरली माझी
आताही आत वणवा पेटलेला आहे
दारूशिवाय

## प्रिये

सारं ओवाळून टाकते मी राजा तुझ्यावरून
साऱ्या मानमर्यादा, बंधने, विरोध
यांना उल्लंघून येतेय मी
तुला माझ्या प्रेमात बुडवून टाकायला
दृष्टीस पडत नाही का तुझ्या
माझ्या नेत्रांना व्यापून उरणारी
तुझी ताम्रवर्णी तेजस्वी मूर्ती...
लई झालं. समाजलं सारं
आता गपगुमान माजं ऐकशीला नव्हं
नाय आपल्याला पसंत
कोनी कोनावर जीव वोवाळनं
आपन समदी मानसं
हातात हात पकडून संगाट चालायचं
तुझा कृपाळू, मायाळू, कनवाळू देव
आमास्नी उकिरड्यावं टाकूनशान गेला
कुना एकाच्या इश्कात बुडणार नाय हा पट्ट्या
समद्या दुनियेवं प्यार करनार आपन
समदी साथ-साथ जमनीवर पाय रोवून चालनार
पन पयल्यांदा विस्कोट करनार
जाळून, फेकून देनार आमच्या नरडीला नख लावणारं
शेकुटीजवळ वाईच बसावं

उगा उडी नाय टाकायची
हां, म्या बगतूया नव्हं तुज पिरेम
पन त्या पल्याड बी दिसतया नव्हं
'चंद्र, सूर्य, तारे, क्षितिजापार बघणारे तुझे नेत्र
झेपणार नाही तुझ्या बंगल्याबाहेरचं जग तुला'
तू तर जळशीलाच
पर माजी बी राखुंडी हुईल
इसर सारं, इसर मला
रड चार-दोन राती
मग नवीन बेष्ट सपान पडलं तुला
'चि.सौ. कां.... हिचे
मेंदी, संगीत, हळद इत्यादी इत्यादी...'

## साठे मॅडम

मराठीच्या सरांनी सांगितलं म्हणून लायब्ररीत पाय ठेवला
उगाचच अधून-मधून जाऊन, पेपर चाळून,
एखाद्या मासिकावर नजर टाकून बाहेर पडायचो
कधी स्टडी-रूममध्ये बसलो नाही, का पुस्तक हातात घेतलं नाही
डेस्कमागे एका बाजूला त्या बसलेल्या असायच्या
गप्प, आपलं काम करण्यात दंग
एकदा त्यांनी हाक मारली, अहो इकडे या जरा

एसवायला ना? मराठी? भूगोल? इतिहास?
मी आपला नजर चुकवत, हो ला हो
एमपीएससी? तयारी करताय ना?
एक तुच्छ 'छे' आणि 'पैशे नाहीत'
जाड चष्म्याआडून डोळे रोखत त्यांनी विचारलं
मीटिंगना जाता ना? द्रोणाच्या नावाने खडे फोडता का?
पुढे कधी सरकणार? एकलव्य नाही बनणार?
मिसरूड फुटल्यापासून कोणी थोबाडात मारली नव्हती
उठून एमपीएससीच्या पुस्तकांच्या रॅकजवळ घेऊन गेल्या
उद्यापासून कॉलेजच्या वेळात इथे दिसला पाहिजे
'थुकतो या प्रस्थापितांच्या नोकरीवर'
आधी एमपीएससी क्लिअर करा. मग थुंका की.
अडचण आली तर भेटा.
पुढचं सांगायला हवं का?

## साहेब

दोन-चार दगड भिरकावले गेले
दोन-चार काचा खळकन फुटल्या
पळा, पळाचा गलका सुरू झाला
पोलिसांनी पटाटा घावतील त्या पोरांना उचललं
मला कवा निळ्या गाडीत कोंबलं कळलंच नाय
बेरकी, जाणती पोरं म्हणली
'स्टेशनात बशिवतिला आन सांच्याला सोडतिला'

स्टेशनात बाकावर तीन तास बसून ढुंगाण दुखाया लागलं
तवा साहेब आले
एक नजर टाकत म्हणाले
आज काय आहे? सगळ्यांवर चार्जशिट दाखल करा.
सरकारी मालमत्तेचे नुकसान, जमावबंदी तोडली.
जाणत्या पोरांचे चेहरे उतरलेले, मी गप-गुमान तसाच
चार्जशिट लिहून झाल्यावर
साहेबांनी वेगळ बोलावलं
विचारलं, वसतिगृहावर राहतोस ना? एमपीएससी करणार का?
म्या नंदीबैलागत मान हालावली
द्या याला सोडून साहेब म्हणाले,
एकदा रेकॉर्डवर नाव चढलं
मग विसरा एमपीएससी.
पचेल तेवढंच खायचं आणि जमेल तेवढंच करायचं.
तवापासन मान खाली घालून तयारीला लागलो

## माझे सौभाग्य

बाबा हापिसर झालाय. आता रांगा लागतिला.
आई सगळीकडे सांगत हिंडे
मला हवी होती जीवनसाथी -
आईबरोबर राहणारी, शिक्षित, स्वतःचे विचार असलेली,
चळवळीची जाण असणारी, आपल्या पलीकडे पाहणारी
आईला फकस्त सौंसार करनारी

तालेवार घर, झोकात लगीन
आता हा सांधा कसा जुळायचा
त्रांगडच झाल आन लगीन अडलं
हळूहळू मुली यायच्या कमी झाल्या.
तिला मी माझं स्पष्ट सांगितलं
तर म्हणते कशी
माझेही काही विचार आहेत
संसाराची मला आवड आहे, माणसे हवी आहेत
पण मी पुढे शिकणार
चळवळ नाही, पण समाजासाठी काही करणार
आहात साथ द्यायला तयार?
आईला अवघड गेलं, पण जमवलं दोघींनीही
आता आम्ही क्रांतीची ज्वाला नाही
पण गारठलेल्याला ऊब आणि थकलेल्याला मदत
जरूर मिळते आमच्याकडून

## Mess

मेसमधलं जेवण-खाणं बेतास बात
नाव ठेवायला जागा नाही; नाव काढायला वाव नाही
बिनघोर पॉट भरतया यातच नवी पोर खुश
अचानक गरमागरम, नीट भाजलेल्या पोळ्या यायला लागल्या
पोरं तुटून पडायची

मी भटारखान्यात डोकावून पाहिलं
नवीन आजींचा हात भराभर फिरत होता
प्रत्येक पोळी फुटबॉलवाणी टम्म
आजी तुमची पोळी कशी व फुगती
आर, तुमी माह्या नातवावाणी.
अचानक आजी गायब झाल्या
दिसल्या काही वर्षांनी
रस्त्याच्या कडेला, वडा-पावाच्या गाड्यावर
हाताखाली माझ्याहून लहान पोरगा
आजी वळकलाव?
व्हय रं पोरा. इसरीन का हून?
माह्या पोल्या धेनात हायत्या नव्ह?
तुमी पोरं लय खायचा, राशन पुरायचं नाय
म्हनूनशान माह्या काडून टाकलं
हयो बग नातू, बारावी पास हाय
आमी दोगच बग आता
न्हेमीपरमान आजीच बडाबडा सुरू
याला नाय वस्तिगृहात घातला
आजीन नजर चुकावली
पुटपुटल्या, आमी ओपन हाय.
‘सरकारी जावई’ कानावर पडलं की अजूनही कानशिलं तापतात
मग आजीच्या नातवाची आठवण येते
बाबासाहेब, तुम्ही नक्की त्याच्यासाठी काही केलं असतं, होय ना हो?

सिनेमा

## ‘**जय भीम**’ : क्रूर व्यवस्थेविरुद्ध कायद्याचे शस्त्र

प्रमोद अहिरे

**विविधतेने** नटलेल्या या देशाची प्रतिज्ञा घेणाऱ्या मध्यमवर्गीय समाजाला ‘विविधता’ शब्दामुळे सामाजिक विषमता कधी दिसलीच नाही. याच देशात पोटाची भूक भागावी म्हणून उंदीर खाणारा समाजही आहे, यावरही त्याचा विश्वास नाही. डोळ्यांभोवती ढापणं घालून बैलावाणी गोल गोल फिरणाऱ्या, आपल्या खिडकीच्या बाहेर कधी डोकावून न पाहणाऱ्या चाकोरीबद्ध मध्यमवर्गीय समाजाला ह्या नव्या जगाची भणकही नसते. हा वर्ग एक तर भाबडा असतो किंवा अशा गोष्टी पाहून स्वतःला त्रास का करून घ्यायचा असा साधारण विचार करतो. म्हणून त्याला मदारी, डोंबारी आणि सिग्नलवरच्या भिकाऱ्याचं दुःखही कधीच दिसत नाही. स्वातंत्र्यानंतर जातीयता नष्ट झाली या भ्रमात तो वावरतो आहे. ‘आता असं काही राहीलं नाही’ म्हणत तो यावर सहजतेने पडदा टाकतो. या वर्गाला चित्रपटाच्या

---

लेखक नाशिकस्थित असून प्रगतिशील लेखक संघाचे जिल्हाध्यक्ष आणि शालेय शिक्षक आहेत.
ईमेल – pramodahire95@gmail.com

स्क्रिनसमोर आणून आसूड ओढण्याचे काम दाक्षिणात्य चित्रपटांनी केले आहे. पेरियरम पेरुमल, असूरन, कर्णन अशा जातवास्तव मांडणाऱ्या बहुचर्चित चित्रपटांच्या यादीत 'जय भीम' या तामिळ सिनेमाने आपले भक्कम पाय रोवले आहेत. बॉलीवूड सिनेमाने अशा विषयांना वरवरचा हात घातलेला असून ते अमीर-गरीब संघर्ष मांडत राहिले. काहींमध्ये जात दाखवूनही बचावात्मक पवित्रा घेतलेला दिसतो. नागराज मंजुळे यांच्या 'सैराट'च्या कडू गोळीवरही साखरेचे लिंपण आणि झिंगाट तडका होता. सुरुवात म्हणून या चित्रपटांचे आपण कौतुकही केले आहेच. बॉलीवूड सिनेमा जातवास्तवाबाबत बेधडकपणे स्टेटमेंट देत नाही ही खरी शोकांतिका आहे. अशा वेळी झापडबंद समाजाला जातवास्तवाचा आरसा दाखवून 'जय भीम' सारखा चित्रपट डोळ्यात झणझणीत अंजन घालून खडबडून जागे करतो, आपला प्रियतम देश इतका वाईट आहे याच यथार्थ दर्शन घडवतो व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'आय हॅव नो मदरलँड' असे का म्हटले असेल याचं भानही पुरवतो.

पोलिसांनी आदिवासी माणसांवर केलेल्या अनन्वित छळाची ही सत्यकथा दिग्दर्शक टी. जे. ग्यानवेल यांच्या चौकटीतून पाहिल्यावर अंगावर शहारे न आले तर नवलच! कोण आहेत ही माणसं? ही माणसं आहेत आपल्याच शेजारची. स्वातंत्र्याच्या पन्नाशी नंतरही जाती-जमातीचं सर्टिफिकेट नसलेली, रेशनकार्ड नसलेली, भूमीहिन, विटा बनवूनही स्वतःचं पक्के घर नसलेली, उंदीर खाऊन पोट भरणारी, मतदार यादीत नाव नसलेली, कधी फोटोसुद्धा न काढणारी एकंदरीत आपला चेहराच नसलेली,

व्यवस्थेकडून नागवली गेलेली ही माणसं!....ह्या माणसांवर ब्रिटिशकाळापासून आजतागायत गुन्हेगारी जमात म्हणून कपाळावर शिक्का मारलाय...खरं तर ही माणसं भुकेकंगाल असली तरी उंदराचं लहान पिल्लू खाणं म्हणजे नरकात जाणं मानतात, चिमण्यांना दाणे टाकतात, साप चावलेल्या शत्रूंनाही वाचवतात आणि विषारी सापालाही रानात सोडून देतात. ही सुंदर निरागसताच नैतिक मूल्य जपत असते. दैनंदिन व्यवहारात नैतिक मूल्य जपणाऱ्या याच समाजाला कायमरूपी चोर म्हणून गोंदण करुन ठेवलंय. हा विरोधाभास चित्रपटाने छानच टिपला आहे...

तामिळनाडूतील विल्लुपुरम जिल्ह्यात हे कथानक सुरू होते. सरपंचाच्या घरातून साप बाहेर काढणाऱ्या राजाकन्नूवर चोरीचा आरोप लावला जातो. हा गुन्हा कबूल करावा म्हणून पोलिस राजाकन्नूसह त्याच्या नातेसंबंधातील लोकांचाही थर्ड डिग्री वापरून सर्व तऱ्हेचा छळ करतात. या छळात राजाकन्नू मरण पावतो. पोलिसांच्या अंगलट हे प्रकरण येऊ नये म्हणून ते राजाकन्नू, इरातप्पन आणि मुसा कुट्टी यांना फरार म्हणून घोषित करतात. राजकन्नूची पत्नी संघिनी चळवळीतल्या चंद्रू वकिलाच्या मदतीने हेबियस कार्पस पिटीशनचा आधार घेऊन आरोपींना शिक्षा देऊन न्याय मिळवते, अशी ही संघर्ष गाथा चित्रपटाचे मुख्य कथानक आहे.

आंबेडकरी नायक, त्याच जातीची चळवळ, त्याच जातीतील माणसाला न्याय हा सरधोपटपणा टाळून आंबेडकरी नायक, कम्युनिस्टांची चळवळ, आदिवासींना न्याय अशा रचनेचा हा

चित्रपट असल्याने जातीअंताप्रमाणेच वर्गअंताची भूमिकाही किती महत्त्वाची आहे, याची समज दृढ करण्याचे काम अशा कलाकृतीतून निश्चितपणे होणार आहे. सर्वहारा, वंचित, गावकुसाबाहेरच्या समूहाची शोषणापासून मुक्ती करायची असेल तर डॉ. आंबेडकर, कार्ल मार्क्स, पेरियार यांच्या प्रमाणेच शोषणाविरूद्ध लढणाऱ्या सर्व शिलेदारांना बरोबर घेऊन चालावे लागणार आहे याचं भान चळवळीतील कार्यकर्त्यांना येणं आवश्यक आहे.

संविधानाला मानणारा, कम्युनिस्ट विचारसरणी असणाऱ्या वकील चंद्रूचा 'कायदा हेच शस्त्र' यावर कमालीचा विश्वास आहे. त्यामुळे तो संयत भूमिका जगतो. सत्यच आपल्याला वाचवू शकेल यावर त्याचा विश्वास आहे. 'सत्यमेव जयते' ब्रीदवाक्यावरील विश्वासामुळेच तो न्यायाची अपेक्षा करतो. तो चिटींग करत नाही की आडमुठेपणा करत नाही. ॲक्शन आणि रोमान्स यांची सवय झालेल्या प्रेक्षकाला सुपरस्टार सूर्याची या सिनेमातील भूमिका निश्चितच वेगळी असल्याचे जाणवेल. कर्णनमधील नायक हिंसेचे समर्थन करतो तर जय भीमचा वकील कायद्यालाच शस्त्र मानतो. वकिलीचे हुनर समाजाच्या भल्यासाठी कामाला आले तर त्यास प्रतिष्ठा मिळेल ह्या बाबासाहेबांच्या विचाराला तो प्रमाण मानतो. त्यामुळे तो गरोदर असलेल्या पीडित आदिवासी महिलेकडून कुठलीही फी घेत नाही. जय भीमचा नायक एक व्यक्ती नाही. चंद्रू, राजकन्नू, संघिनी, शिक्षिका मैत्रा आणि समुदाय हे सर्वच नायक म्हणून येतात. या निमित्ताने समूहच क्रांती करतो हे कम्युनिस्ट विचाराचं महत्त्वाचे सूत्र हा चित्रपट अधोरेखित करतो.

चोरीची ही खोटी केस नंतर इतकी गुंतागुंतीची होते की यातून बाहेर पडण्याचा मार्गच बंद होतो. पण कायद्याचे सखोलपणे वाचन करून, पुरावे जमवून चंद्रू वकिल पीडित महिलेला न्याय मिळवून देतो. खरं तर हा पूर्णपणे न्याय नसतोच. पोलिसांच्या छळछावणीत मृत्यू पावलेला पती परत कधीच येणार नसतो. पण त्याच्यावरचा चोरीचा आरोप धुऊन निघतो आणि एका प्रतिष्ठेच्या, आत्मसन्मानाच्या लढाईचा अखेर विजय होतो.

पोलिस खात्याची इभ्रत जाऊ नये म्हणून राजाकन्नूच्या पत्नीला पैशांची लालूच दाखवण्यात येते. याठिकाणी ती स्पष्टपणे 'माझ्या मुलीला मी या पैशांबाबत कोणत्या तोंडाने सांगू?' असा प्रश्न विचारत स्पष्टपणे नकार देऊन आपला स्वाभिमान जपते. हे प्रलोभन टाळून ती जेव्हा चालायला लागते तेव्हा ती जय भीम म्हणत नसली तरी तिच्या पावलागणिक जयभिमचा ध्वनी गुंजत राहिल्याचा भास होतो. चंद्रू वकील मोर्चा-अंदोलनातून व्यवस्थेला जसा प्रश्न विचारतो, तसा तो दैनंदिन व्यवहारातही विचारतो. सांस्कृतिक कार्यक्रमातील मुलांच्या वेशभूषा पाहून 'गांधी-नेहरू सारखे मोठे नेते आहेत पण आंबेडकर का दिसत नाही?' हा प्रश्न त्याला पडतो. 'कोणत्या जातीत चोर नसतात?' हा साधा प्रश्न उच्चजातीतील चोरांची जणू हजेरीच घेतो. पोलिसांनी खोट्या रचलेल्या घटनेलाही तो प्रश्न विचारतो. म्हणूनच त्याला गुंतागुंतीची केस सुटण्यासही मदत होते. एखाद्या घटनेची चिकित्सा करणे, प्रश्न विचारणे ही बाबच आंबेडकर, मार्क्स, पेरियार यांच्या भाषण-लेखनातून आलेली आहे हे समजून घ्यायला हवं.

लहान मुलांचे आक्रंदन, स्त्रियांचे टाहो फोडणे, जखमेवर हिरवी मिरची चोळणे, डोळ्यात लाल मिरचीची पूड टाकणे, महिलेस नग्न करणे, राजाकन्नूला घासही न गिळता येणे, त्याच्या छातीवर लाथ बसणे, पोलिसांच्या गाडीखाली खेळणे चिरडणे असे अनेक क्रूर प्रसंग बधीर झालेल्या मनाला आतून-बाहेरुन पुरते उसवून टाकतात. तोंडात चणे-फुटाणे टाकत हा चित्रपट पहाताच येत नाही, हे त्या चित्रपटाचे यश म्हणावे लागेल. चित्रपटाचा शेवट न्यायाने होत असला तरी हाडामांसाचे शरीर आणि संवेदनशील मनावर झालेली जखम कशानेही भरून येत नाही याची रुखरुखही लागून रहाते.

दलित साहित्यासारखा दलित सिनेमा हा शब्द फारसा रुळलेला नाही. संरचनात्मक चौकट तोडणाऱ्या दाक्षिणात्य सिनेमांमुळे या शब्दाला ओळख द्यायचं काम सुरू झालंय असं म्हणता येईल. असं असलं तरी सिनेमा चळवळ करत नाही. तर तिला पूरक असणारा विचार देण्याचं काम तो करू शकतो. चळवळीचे चाक पुढे रेटण्याचं काम चित्रपटाचे नसते तर या चाकाला वंगण देण्याचे काम यातून होत असते. जय भीमची रिंगटोन ऐकून संतापणारा उच्चजातीय समाज जय भीमसारख्या चित्रपटाचे काय करेल याची कल्पनाच न केलेली बरी! 'जयभिम' चित्रपट सत्य घटनेवर असणं आणि थिएटर ऐवजी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणं यामुळे विरोधकांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. मग कधी भाषिक वादाचा प्रसंग दाखवून विरोध दर्शवला गेला तर कधी बाबासाहेबांचा उल्लेख आणि फोटो नसल्याचा अपप्रचार करण्यात आला. बाबासाहेबांबद्दल कमालीचा भावनिक असलेला

समाजही या आरोपाला बळी पडला. प्रत्यक्षात एकही फ्रेम न चुकवता चित्रपट पाहिल्यावर चंद्रू वकिलाला बाबासाहेब दिसतात हेही समजेल. एका ठिकाणी मुलांच्या वेशभूषेत बाबासाहेब दिसत नाही म्हणून त्याचे मन खट्टू होते. म्हणजे तो बाबासाहेबांचा शोध घेतच राहतो. पीडितांना सनदशीर मार्गाने कायद्याचा आधार घेऊन न्याय मिळवून देणं हा बाबासाहेबांचा विचारच तो जगतो. प्रलोभन टाळून सत्याचा श्वास उरात घेऊन स्वाभिमानाने चालणारी संघिनी जणू जय भीमचाच जागर करते. शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे जेव्हा राजाकन्नू सांगतो त्याही वेळेला आंबेडकरी विचारच अधोरेखित होतो. खरं तर व्यक्तिपूजा आणि प्रतिकं यापेक्षा तत्त्वज्ञानाला अधिक प्राधान्य हा चित्रपट देतो. व्यक्तिपूजा नाकारणे हा आंबेडकरी विचार समजून घेत जय भीम हा नुसता बोलण्याचा विषय नसून तो अंगात मुरवून विचार आणि कृतीतून दिसला पाहिजे, हे सगळ्यांनीच समजून घ्यायला हवं.

परिवर्तनाचा वाटसरू

# संशोधनपर लिखाण

**नमस्कार.**

'परिवर्तनाचा वाटसरू'च्या या अंकापासून म्हणजे १६ एप्रिल २०२१पासून आम्ही संशोधनपर लिखाणाचा एक स्वतंत्र आणि वेगळा विभाग सुरू करत आहोत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारसपात्र अभ्यासपत्रिकांच्या यादीत २०१९मध्ये स्थान प्राप्त झाल्यापासून हा प्रस्ताव 'वाटसरू'च्या विचाराधीन होता. विविध क्षेत्रांत संशोधन करणाऱ्या प्राध्यापक आणि विद्यार्थी तसेच स्वतंत्र संशोधकांची प्रकाशनाचा चांगला अवकाश उपलब्ध होण्याची गरज यामुळे भागवली जाईल, असा आम्हाला विश्वास आहे. या विभागाद्वारे अकादमिक चर्चाविश्वात अधिक महत्त्वाचे आणि अर्थपूर्ण योगदान देण्याची 'वाटसरू'ची क्षमता दुणावेल, अशीही आम्ही अपेक्षा करतो.

संशोधनपर लेखन वाटसरूमध्ये प्रकाशनार्थ पाठवण्याची आणि त्या लिखाणाची प्रकाशनपूर्व चिकित्सा करण्याची एक पद्धत 'वाटसरू'ने आखून घेतली आहे. त्या द्विस्तरीय गोपनीय परीक्षण (peer reviewed) पद्धतीचे नियम पृष्ठ क्र. १४ वर दिलेले आहेत. लिखाण पाठवण्यापूर्वी ते अभ्यासावेत, ही विनंती. 'वाटसरू'मध्ये

लिखाण पाठवण्यासाठी विषयाचे किंवा क्षेत्राचे बंधन नाही. तसेच ते लेखनात दाखवलेल्या भाषिक किंवा चर्चात्मक सृजनशिलतेवरही नाही. आम्ही फक्त एवढीच अपेक्षा करतो की, लिखाणाचा उद्देश गंभीर असावा, लिखाणाची अकादमिक शिस्त पाळलेली असावी आणि समकालीन मराठी चर्चाविश्वात त्याद्वारे चांगले योगदान मिळावे.

समकालीन मराठी चर्चाविश्वात स-संदर्भ चर्चेची आणि आणखी महत्त्वाचे म्हणजे सर्वंकष आकलनाची कमतरता दिसते. अभिनिवेशी आरोप-प्रत्यारोपांमध्ये अडकून चर्चा पुढे जात नाही, असंही घडताना दिसतं. यापाठीमागे समाजमाध्यमांची भाऊगर्दी, चमकदार विधानांची आणि तात्काळ उत्तर देण्याची हौस, आपला मुद्दा तपासून पहाण्याची गरज न वाटणे असा बदललेला काळाचा महिमा दिसतो. उपरोक्त विभागामध्ये चर्चाविश्वाला ग्रासून असणाऱ्या या दोषांचा प्रादुर्भाव होणार नाही, अशी अपेक्षा करुया.

या स्वतंत्र विभागाची सुरुवात केल्यापासून आमच्याकडे अनेक संशोधनपर लेख जमा झालेले असून त्यांची परीक्षण प्रक्रिया सुरू झालेली आहे, हे सांगायला आम्हाला आनंद वाटतो. आमच्या भावी लेखक-वाचकांना या निमित्ताने विचारविश्व सघन होण्यासाठीच्या शुभेच्छा!

**- संपादक**

# लेख सादर करण्याची प्रक्रिया

१. आपले अप्रकाशित संशोधनपर लेख मायक्रोसॉफ्ट वर्ड फाईल स्वरूपात युनिकोड फॉण्ट्समध्ये (मंगल, एरियल युनिकोड, कोकिळा इ.) पृष्ठ क्रमांक आणि शीर्षक नमूद करून research.watsaru@gmail.com या ईमेल पत्त्यावर पाठवावे. ईमेलखेरीज अन्य पद्धतीने पाठवू नये. लेखकाचे नाव, पत्ता, कामाचे स्वरूप, ईमेल आयडी आणि संपर्क क्रमांक याची नोंद लेखाच्या शेवटी करावी.

२. संशोधनपर लेखांना विषयाचे बंधन नाही, परंतु शब्दमर्यादा २,००० ते ५,००० शब्द असावी.

३. संशोधनपर लेख हे वैचारिक लिखाण असल्याने त्यामध्ये भाषेचा प्रमाणित वापर, संदर्भांच्या शास्त्रोक्त पद्धतीचा उपयोग, विचारांचा स्वतंत्रपणा असणे गृहीत आणि गरजेचे आहे.

४. कुठल्याही प्रकारच्या वाङ्मयचौर्यास 'परिवर्तनाचा वाटसरू' निषेधार्ह मानतो आणि अशा प्रकारच्या लेखनास मुळीच प्रोत्साहन दिले जाणार नाही.

५. पीएच.डी. प्रबंधातील प्रकरणे पाठवू नयेत.

६. पूर्वप्रसिद्धी मिळालेले लेख या विभागात पाठवू नयेत.

७. संशोधनपर लेख प्रकाशित करण्यासाठी ‘वाटसरू’ दुहेरी गोपनीय परीक्षण पद्धतीचा अवलंब करतो. लेख प्रसिद्ध करण्यासाठी कुठलेही शुल्क वाटसरू आकारत नाही. या प्रक्रियेला जास्तीत जास्त चार महिन्यांचा कालावधी लागू शकतो. परीक्षक मंडळाने दिलेला निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

८. लेखाची पोचपावती आणि लेख प्रकाशनासाठी स्वीकारण्यात आल्याची किंवा न आल्याची माहिती लेखकांना ‘वाटसरू’कडून स्वतंत्रपणे आणि वेळोवेळी फक्त ईमेलद्वारे कळवली जाईल. त्यासाठी फोन किंवा इतर संपर्क साधनांचा वापर करू नये.

**संपादक**

# संदर्भविषयक मार्गदर्शक सूचना

‘परिवर्तनाचा वाटसरू’साठी संशोधनपर लेखनामध्ये लेखकाने इन टेक्स्ट पॅरेंथेटिकल ऑथर डेट सायटेशन (In Text Parenthetical Author-Date Citation) या संदर्भ पद्धतीचा अवलंब करावा. या पद्धतीनुसार प्रत्यक्ष लेखामध्ये आलेल्या संदर्भांचे आधार देणे अभिप्रेत असते. त्यामध्ये लेखकाचे आडनाव, संदर्भग्रंथाचे प्रकाशनवर्ष आणि थेट उद्धृत असेल तर पृ. क्र. नोंदविणे आवश्यक असते. उदा. (पाटील १९९७, पृ. ४३) संदर्भग्रंथाविषयीचे अन्य तपशील लेखाच्या शेवटी जोडलेल्या संदर्भयादीमध्ये देणे अपेक्षित आहे. उदा. (पाटील, चंद्रकांत (१९९७) : *चौकटीबाहेरचे चेहरे*, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.)

इंग्रजी व मराठी संदर्भयादी स्वतंत्र असावी. ही माहिती देताना क्रम ग्रंथ (स्वतंत्र, संपादित इ.), नियतकालिक, वर्तमानपत्र, अप्रकाशित कृती; प्रबंध इ., संकेतस्थळ व समाजमाध्यम असा असावा.

एकाच लेखकाची अनेक पुस्तके असल्यास तर संदर्भयादीमध्ये वर्षानुक्रम पाळावा.

लेखामध्ये एकाच साधनाचा संदर्भ लागोपाठ येतो तेव्हा ‘तत्रैव’

शब्द वापरून पृष्ठ क्रमांक द्यावा. उदा. (मांडके २०२०, पृ. २७), (तत्रैव २९)

संदर्भ सूची लेखकांच्या आडनावांनुक्रमे व नंतर वर्षांनुक्रमे द्यावी. जेथे एकाच लेखकाचे एकाच वर्षातील लेख अथवा ग्रंथाचा संदर्भ असेल तेथे उदा. २०१७ अ, २०१७ ब असा वापर करावा. जेथे लेखाचे अथवा ग्रंथाचे एकापेक्षा अधिक लेखक असतील तेथे पहिल्या लेखकाच्या नावानंतर 'व इतर' असे जोडावे. संदर्भ सूचीतील अन्य उल्लेख खालीलप्रमाणे असावेत. इन टेक्स्ट सायटेशन पुढे कंसात दिले आहेत.

**लेखकाचा ग्रंथ :** पाटील, चंद्रकांत (१९९७) : *चौकटीबाहेरचे चेहरे*, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद. (पाटील १९९७, पृ. ७८)

**संपादित ग्रंथ :** भोळे, भा. ल. व किशोर बेडकिहाळ (संपा) (२००३) : *बदलता महाराष्ट्र*, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा. (भोळे व बेडकिहाळ २००३, पृ. १७८)

**संपादित ग्रंथातील लेख :** भागवत, वंदना (२००९) : 'पुन्हा एकदा 'डॉल्स हाऊस'', गीताली, वि. मं. (संपा) *स्त्रीप्रश्न सोडवताना*, दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृ. ४१२–४१८. (भागवत २००९, पृ. ४१३)

**नियतकालिकातील लेख :** बाबर, अशोक (२०१५) :

‘‘ब’ बळीचा : एक भारतीय पेच’, *अस्मितादर्श*, वार्षिक विशेषांक, पृ. १०–२१ (बाबर २०१५, पृ. २०)

**वर्तमानपत्रातील लेख :** टेकाळे, डॉ. नागेश (२०२१) : ‘हिरवाई हेच खरे औषध’, *महाराष्ट्र टाईम्स*, १६ एप्रिल २०२१, पृ. ६ (टेकाळे २०२१, पृ. ६)

**अप्रकाशित कृती :** पवार, प्रज्ञा दया (२०१५) : ‘गो. पु. देशपांडे यांच्या नाटकांचा चिकित्सक अभ्यास’, (अप्रकाशित प्रबंध, मुंबई विद्यापीठ) (पवार २०१५, पृ. १८८)

**संकेतस्थळावरील लेख :** बांदेकर, प्रवीण दशरथ (२०२१) : ‘खुज्या सावल्यांचा काळ’

https://www.loksatta.com/lokrang-news/matt-spelling-mistake-for-printing-alumni-posters-banners-or-leaflets-akp-94-2452328/

(संकेतस्थळाला भेट २६ एप्रिल २०२१) (बांदेकर २०२१)

**समाजमाध्यम :** केशव वाघमारे (२०२१)

https://m.facebook.com/story.php?story_fbid=3962216370538487&id=100002504892114

(संकेतस्थळाला भेट २६ एप्रिल २०२१) (वाघमारे २०२१)

परिवर्तनाचा वाटसरू

इथेही उपलब्ध

## अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

## माणगावकर ए

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५

## युनिक बुक्स

युनिक ॲकॅडमी, देवीदास आर्केड, पंचवटी चौक, मोर्शी रोड,
अमरावती
दू. ०७२१ २६६७८१५

## पीपल्स बुक हाऊस

मेहेर हाऊस,
१५, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट
मुंबई ४११००१
दू. ०२२ २२८७३७६८

# भीमबेटका व सिंधू संस्कृती :

## दृश्य कलाकृतींमधील लिंगस्थाननिश्चिती

**३७**



Figure - 1 Venus of Bhimbetaka



Figure - 2 Seated woman of Bhimbetaka



Figure - 3 A Family Scene with a pregnant woman

Figure - 1 Venues of Bhimbetaka, reproduction of Yashodhar Mathpal with Brush on paper, 1984 source Mathpal, 1984
Figure - 2 Seated Woman, reproduction of Yashodhar Mathpal with Brush on paper, 1984 source Mathpal, 1984
Figure - 3 A family Scene with a pregnant woman, handmade sketch, Malla 2015




Figure – 4 Woman with Animals



Figure - 5 Mother goddess

Figure - 4 Woman with Animals or pregnancy, Drawing on paper By Kamat 1997, Prehistoric cave painting, Bhimbetka
Figure 5 Mother Goddess, Drawing on paper by Kamat 1997, Prehistoric cave painting, Bhimbetka originally photographed and kept in the Tribal Museum Chindwara
Source, Figure – 3 and 4- http://www.kamat.com/kalranga/rockpain/betaka.htm



Figure – 6 Terracotta Figurine of Indus Valley



Figure – 7 Seals of Animate Motifs

Figure - 6 Terracotta figurine of woman, 7000 BCE to circa 2500 BCE, Mehrgarh (Pakistan)
Source- https://toranas.wordpress.com/tag/mehrgarh/
Figure -7 Stone seals inscribed with animals and Indus script. Harappan Civilization, 3000-1500 BC
Source- http://www.thenagain.info/WebChron/India/Harappa.html

Registered
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP -37
R.N.I. No. MAHMAR/2001/09622 / Postal Regd. No. PCW/006/2021-2023
Posted at Pune PSO, GPO, Pune-411001
Published and posted on 1st and 16th of Every Month.
परिवर्तनाचा वाटसरू, १ डिसेंबर २०२१ Date of Publication & Posting : 1-12-2021

**कुटुंब / घरं कितीही सुरक्षित वाटत असले तरी मुलांचं लैंगिक शोषण करणारी एक अपप्रवृत्ती जवळच्या नातेवाईकांमध्येही असतेच. लहान मुलं या अपप्रवृत्तीचे बळी ठरतात. असा अनुभव लहान मुलांसाठी अपवादात्मक नाही; तर सार्वत्रिक आहे. मुलांना योग्य शिक्षण, चांगल्या सुविधा देण्यासोबतच 'हवेसे' वा 'नकोसे' स्पर्श ओळखायला शिकवणे आणि मुल मोठं होईल तसतसं त्याला लैंगिक शिक्षण देणे ही आपली जबाबदारी आहे.**

**अशा काही महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत चर्चा करणाऱ्या, शालेय मुली-मुलं, शिक्षक आणि पालक यांच्यासाठी लिहिलेल्या कमला भसीन यांच्या काश! मुझे किसी ने बताया होता!! या पुस्तिकेचा मराठी अनुवाद लवकरच प्रसिद्ध करत आहोत.**




**'नकोसा' स्पर्श नकोच**

२८ (सर्व पाने रंगीत) ।। मूल्य : ऐच्छिक

प्रकाशक : मुक्ता ।। संपर्क : ८०८०४६३४८३

ईमेल : muktaprabodhini@gmail.com

'परिवर्तनाचा वाटसरू' हे पाक्षिक मालक-प्रकाशक अभय कांता यांनी नर्मदा ऑफसेट, नारायण पेठ, पुणे ३० येथे छापून ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ए, कसबा पेठ, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.